भगव्या ध्वजावर कोयता-हातोडा हा लेख व त्यावरील संपादकीय वाचले.

सप्रेम नमस्कार

धर्म ही
सरंजामशाहीत
जन्मास आलेली
कल्पना.
राष्ट्र ही
भांडवलशाहीची
कल्पना
आणि समाजवाद ही
विषमता व
पिळवणूकीतून
जन्माला आलेली
कल्पना.
'भगव्या ध्वजावर....'
च्या लेखकाने
याचा अभ्यास
करावा ही
विनंती.

*अनिल बर्वे*

सप्रेम नमस्कार

परळ निवडणूकीत
जनसंघाने
एक पाऊल
मागे टाकून
समाजवादी
तरुण मनाला
धक्का दिला
या आपल्या मताचे
आश्चर्य वाटले.
हे वाक्य शिवसेनेवरील
आंधळ्या द्वेषाचे
निदर्शक आहे....

शिवसेनेने
समाजवादी धोरणे
जाहीर केलेली
नाहीत. पण
त्या दृष्टीने
कार्यास केव्हाच
सुरुवात केलेली
आहे....

*उदय सामंत*

सप्रेम नमस्कार

तरुण वर्ग
जनसंघाकडे
आकर्षिला
जात आहे
हा लेखकाचा एक
गोड गैरसमज आहे.
तरुण वर्ग आज
स्टंट बाजी असणाऱ्या
शिवसेनेसारख्या
संघटनेकडे जातो.
कारण या संघटनेला
घटना नसते.
कुठल्याच विचारांचे
बंधन नसते.

राष्ट्रवादी विरुद्ध
कम्युनिस्ट असली
खोटी द्वंद्वे
जनसंघ लोकांसमोर
उभी करून आपली
वाढ करू पाहतो
हे सत्य.

*वामन शेणॉय*

माणूस

शनिवार । १२ डिसेंबर १९७० । चाळीस पैसे

शनिवार, १२ डिसेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : त्रेचाळिसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

▫ 'भगव्या ध्वजावर कोयता-हातोडा !' हा लेख वाचला. जनसंघाचे स्वरूप जरा कंडवट रीतीने उघड केले आहे. जनसंघ हा जुनाट विचारसरणी मानणाऱ्या, कर्मठ उच्चवर्णीय हिंदूंचा पक्ष आहे. नवतरुण कट्टर हिंदुत्ववादी असूनही जनसंघात जाऊ इच्छित नाहीत. जनसंघीय आपली खुळचट, समाजवादविन्मुख विचारसरणी बदलावयास तयार नाही आहेत, हे कटू सत्य आहे. दुर्दैव आहे आम्हा हिंदूंचे ! वरील कारणांमुळेच, जनसंघाची वाढ खुंटलेली आहे.

म्हणूनच मुंबई व मुंबई परिसरातील राष्ट्रीय तरुण वर्ग (९५% हिंदू निश्चितपणे राष्ट्रीय आहेत, यात शंका नाही.) प्रचंड बहुसंख्येने शिवसेनेत सामील झाला आहे. कम्युनिस्टांचा साम्यवाद कितीही चांगला दिसत असला तरी तो आमचे स्वातंत्र्य संपुष्टात आणणारा आहे. आम्हांला गुलाम बनविणारा आहे. समाजवादविन्मुख राष्ट्रवाद, केव्हाही समाजवादी कम्युनिस्टांपुढे टिकाव धरू शकणार नाही हे आम्हांला पक्के ठाऊक आहे. आमचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठीच अस्सल समाजवादी राष्ट्रीय पक्ष हवा व तीच आमची उणीव आहे. तरीपण भारतात कम्युनिझम

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

आल्यास, तो आम्हा राष्ट्रवादी तरुणांच्या प्रेतांवरूनच आलेला असेल; त्यांच्याशी झुंजावे लागेल ते आम्हा राष्ट्रवादी तरुणांनाच !

'परळच्या परवाच्या निवडणुकीत तर जनसंघाने एक पाऊल मागे टाकून समाजवादी तरुण मनाला धक्का दिला' या आपल्या मताचे फार आश्चर्य वाटले. हे वाक्य आपल्या शिवसेनेवरील आंधळ्या द्वेषाचे निदर्शक आहे. समाजवादी तरुण कोण ? कम्युनिस्टांचे साठ-साठ वर्षे वयाचे बुढ्ढे कार्यकर्ते ? की म. कॉंग्रेसचे बेगडी समाजवादीय, स्वतःची तुंबडी भरणारे कार्यकर्ते ? समाजवादी तरुण कोण ? एकदा शिवसेनेशी, एकदा कॉंग्रेसशी, एकदा कम्युनिस्टांशी चुंबाचुंबी करणारे पी. एस्. पी. वाले ? शाबास ! म्हणजे ८ तोंडी रावणाचा पराभव करून शिवसेना निवडून आली ती कोणाच्या जोरावर ? शिवसेनेचे रात्रंदिवस खपणारे कार्यकर्ते कोण होते ? गुंड, चोर, रवींद्र सरोवरासारखे प्रकार करणारे, आयाबहिणींची इज्जत लुटणारे तरुण ? आणि अशा गुंड शिवसेनेला जनतेने निवडून कसे दिले ? आश्चर्य आहे !

एक मात्र खरे आहे, की शिवसेनेने समाजवादी धोरणे जाहीर केलेली नाहीत व तशी पोपटपंचीही अजून केलेली नाही. पण त्या दृष्टीने कार्यास केव्हाच सुरुवात केलेली आहे. तरुणांना पोकळ घोषणा देणारे समाजवादी नकोत. प्रत्यक्ष त्या दृष्टीने कार्य करणारा पक्ष हवा. तसाच तो राष्ट्रवादी हवाच हवा.

आम्ही धारातीर्थी पडलो तरी चालेल, पण आमच्या तिरंग्यावर लाल सावट (साम्यवादी असली तरीही) येऊ देणार नाही.

जयहिंद ! जय महाराष्ट्र !

१ डिसेंबर, १९७० **उदय अनंत सामंत,** कल्याण.

◻ दिनांक २ डिसेंबरचा 'माणूस' आज मिळाला व त्यामधील 'भगव्या ध्वजावर कोयता-हातोडा' ह्या लेखाच्या शीर्षकाने एकदम आकर्षून घेतले. पण हा लेख एकदम त्रोटक वाटला. ह्या लेखात उल्लेख केलेले विचार व तर्क ह्या आधीच्या कित्येक लेखांतून व्यक्त झालेले आहेत. त्यामुळे या लेखात काही नाविन्य वाटले नाही. 'हिंदू समाजवादी' या टोपण नावाने लेख लिहिण्याऐवजी, लेखकाने आपल्या खऱ्या नावाने लेख प्रसिद्ध करावयास हरकत नव्हती. कारण लेखात प्रकट केलेल्या विचारात आक्षेपार्ह असे काहीच नाही.

'तरुण वर्ग आज जनसंघाकडे आकर्षिला जात आहे' हा, लेखकाचा एक गोड गैरसमज आहे. तरुण वर्ग आज स्टंटबाजी असणाऱ्या शिवसेनेसारख्या संघटनेकडे आकर्षिला जातो, कारण या संघटनेला घटना नाही व कुठल्याच विचारांचे बंधन नाही; फक्त श्री. बाळ ठाकरे बोलतील त्याचे समर्थन करावयाचे ह्यापेक्षा जास्त विचारांना ह्या संघटनेत वाव नाही.

परंतु या लेखाआधीचे श्री. ग. मा. चे प्रस्तावनावजा संपादकीय आवडले. राष्ट्रवादी विरुद्ध कम्युनिस्ट असली खोटी परंतु स्टंट द्वंद्वे जनसंघ लोकांसमोर उभी करून आपली वाढ करू पाहत आहे, हे सत्य आहे. या विचारांची प्रचीती कामगार संघटनांमधून काम करणाऱ्या लोकांना आल्याशिवाय राहत नाही. 'लाल बावटा' म्हणजे देशद्रोही, रशियावादी, चीनवादी, नक्षलवादी असा सरळ सरळ प्रचार चाललेला असतो. परंतु या लोकांना मला एवढेच सांगावेसे वाटते की, साधारणतः १९४० ते १९५० च्या कालावधीत स्थापना झालेल्या या कामगार संघटनांमधून त्या वेळी भगव्या झेंडावाल्यांनी किती पुढाकार घेतला ? ह्या कामगार संघटना स्थापण्यात जर भगवा झेंडावाल्यांनी पुढाकार घेतला असता तर आज कामगार चळवळीचा झेंडा भगवा असता. परंतु अशा ऐन वेळी कामगारांशी हे भगवा झेंडेवाले विद्रोहच करीत होते व ह्या चळवळींतून सामील होत नव्हते. कारण त्यांचा सर्व भर सांस्कृतिक परिवर्तनावर होता.

असो ! या दोन्ही लेखांमुळे चांगलाच वाद निर्माण होईल यात शंका नाही; परंतु काहीतरी चांगले निष्पन्न व्हावे ही आशा.

३० नोव्हेंबर, १९७० **वामन शेणॉय, कल्याण.**

# हिंदू समाजवाद : एक फसवी प्रतिक्रिया

☐ समाजात नव्या विचारांचा उगम होतो तेव्हा त्याचे महत्व पटलेला परंतु जुन्याचा मोह न सुटलेला असा वर्ग त्या परस्पर विरुद्ध दोन विचारांत समन्वय साधावयाचा प्रयत्न करतो. 'हिंदू समाजवाद' हाही त्यांपैकीच एक फोल प्रयत्न होय. समाजवाद म्हणजे राजकीय तत्त्वज्ञान किंवा आर्थिक कार्यक्रम नसून तो एक जीवनविषयक शास्त्रशुद्ध भौतिक दृष्टिकोन आहे. समाजवादाचा जन्मच भौतिकवादाच्या विकासातून–यंत्रयुगातून–झालेला आहे तर धर्माचा उगम पुराण-कथांच्या (मायथॉलॉजी) च्या विकासातून झालेला आहे. तेव्हा समाजपरिवर्तना साठी धर्मपरंपरेचा आधार घेणे म्हणजे ऐतिहासिक आदर्शवादी होणे आहे. आहे हा समाज टिकवण्यासाठी साकार झालेला धर्म व समाजपरिवर्तनासाठी उगम पावलेला समाजवाद हे मूलतःच परस्परविरुद्ध असून समानतेचा लढा जसा सामंतवाद, भांडवलवाद, चातुर्वर्ण्य याविरुद्ध आहे तद्वतच अध्यात्माविरुद्ध, पर्यायाने धर्माविरुद्धही आहे. तेव्हा धर्म आणि समाजवाद यांची सांगड घालणे स्वप्नाळू-पणाचे किंवा फसव्या प्रतिक्रियावादाचेच लक्षण आहे. 'हिंदू समाजवाद' ही-सुद्धा एक फसवी प्रतिक्रिया आहे.

मार्क्सने शास्त्रशुद्ध समाजवाद सांगायच्या आधी युरोपातही रॉबर्ट ओवेनसारखे 'युरोपियन सोशॅलिस्ट' होऊन गेले परंतु समाजरचनेत हे 'स्वप्नाळू समाजवादी'

काहीही बदल घडवू शकले नाहीत. इस्त्राएलमधील 'ज्यू समाजवादी' मापई पक्ष हा समाजवादी पक्ष नसून 'स्टेट कॅपिटॅलिस्ट', पक्ष आहे. हिटलर व मुसोलिनी यांनीसुद्धा महत्त्वाचे उद्योग राष्ट्रीय केले होते म्हणून ते काही समाजवादी झाले नाहीत किंवा नासर किंवा ब्रह्मदेश हेही समाजवादी झाले नाहीत. 'ख्रिश्चन सोशॅलिस्ट पार्टी' हीसुद्धा अशीच भांडवलदारप्रणीत व 'वर्गीय व्यवस्थापने'-खालील पार्टी होती. तेव्हा 'हिंदू समाजवादी' त्या पक्षाचा वैचारिक आधार, जर ते समाजवादी होऊ पाहत असतील तर तो घेऊ शकणार नाहीत.

'भगव्या ध्वजावर कोयता-हातोडा' या लेखात लेखकाने जनसंघाच्या नकारात्मक व मुस्लिमविद्वेषी धोरणावर आणि त्याच्या 'सामंतवादी' धोरणावर जो प्रकाश टाकला त्याबद्दल लेखकाचे अभिनंदन. परंतु लेखकाने ८० टक्के हिंदू जनतेचा जसा विचार केला तसा २०टक्के अहिंदू जनतेचा विचार केलेला नाही. केवळ हिंदूना तेवढा समाजवाद लागू करावयाचा लेखकाचा मानस असल्यास न-कळे. केवळ मुस्लिमांच्या निर्गमनाने भारतीयांचे प्रश्न सुटणार नाहीत हे लेखकाने मान्य केले, परंतु भारतीय जनतेसमोरचे प्रश्न मात्र मांडलेले नाहीत. जर उपासमार, बेकारी, निवारा, अज्ञान व निकृष्ट जीवनमान हेच भारतीय जनतेसमोरचे प्रश्न लेखकाला अभिप्रेत असले तर ते हिंदू व अहिंदू या दोहोंसमोर समानच आहेत आणि लेखकाच्या दाव्याप्रमाणे विज्ञाननिष्ठेनेच हे प्रश्न सोडवायचे असल्यास हे प्रश्न संपूर्णतया भौतिक व आर्थिक असल्याने धर्माचा येथे त्यांचा काहीही संबंध नाही.

लेखकाने कम्युनिस्टांच्या 'राष्ट्रद्रोहा'बाबत जी अनावश्यक जागरूकता दाखवली आहे ती अवाजवी वाटते. कम्युनिस्टांची रक्तपिपासू व राष्ट्रद्रोही अशी प्रतिमा उभी करण्यात जे भांडवलदारी विचारांना यश आले त्याचा हा कदाचित परिणाम असावा. भारतातील कम्युनिस्ट हे भारतीय जनतेला समाजवादी जीवन जगता यावे म्हणून लढतात, चिनी जनतेकरता नव्हे. हां, जर मार्क्स, लेनिन, माओ आदी विचारवंत परकीय आहेत म्हणूनच जर त्यांना राष्ट्रद्रोही ठरवायचे असेल तर, मॅझिनी व गॅरीबाल्डी हे सावरकरांचे गुरूही परदेशीच होते आणि श्री. ग. मां च्या म्हणण्याप्रमाणे राष्ट्रवादही परकाच आहे. राष्ट्रवादाला जनतेचे प्रश्न सोडवताना किती महत्त्व द्यायचे याचाही विचार आता झाला पाहिजे. राष्ट्रवाद हा भांडवली समाजाच्या विकासातून जन्मास आलेला 'राजकीय विचार' आहे. त्याला सामाजिक स्थान काहीही नाही. या उलट धर्माला मात्र निश्चित सामाजिक स्थान आहे. तेव्हा जनतेच्या प्राणापेक्षा राष्ट्रवाद मोठा मानावयाचा का? जर राष्ट्रवादाच्या घोषाखाली आम्ही जनतेला उपाशी ठेवू लागलो, जर राष्ट्रवादाच्या नावाखाली जनतेला बेकार ठेवू लागलो तर चीन, व्हिएतनाम प्रमाणेच येथेही जनतेचे 'राष्ट्रद्रोही' उठाव होतील. 'राष्ट्र' या राजकीय कल्पनेचे

काही विशिष्ट गुण गृहीत धरूनही, ती भांडवलदारांचे शस्त्र बनल्याने तिला न्यूट्रलाइज केले पाहिजे.

राष्ट्रवादाची घोषणा देऊन इटालीच्या एकीकरणाचे भव्य काम मॅझिनी आणि गॅरी बाल्डीने पूर्ण केले. भारताच्या एकत्रीकरणाचे कामही राष्ट्रीय काँग्रेसने पूर्ण केले आहे. श्री. ग. मां. च्या म्हणण्याप्रमाणे पहिला टप्पा पूर्ण झाला. आता प्रश्न असा की देशात 'मुसोलिनीला' जन्म द्यायचा की समाजसत्तावादाला? राष्ट्रवाद हा जनतेशी एकनिष्ठ असेल आणि जर तो 'विज्ञाननिष्ठ' असेल तर समाजवादाच्या जन्मासाठी त्याचा लय झालाच पाहिजे आणि जर तो सत्ताधारी सामंतवादाचा व भांडवलवादाचा रक्षणकर्ता असेल तर त्याचा नाश केला पाहिजे.

एका छोटयाशा पत्रात या विचारांची उकल करता येणे शक्य नाही. परंतु 'भगव्या ध्वजावर'...च्या लेखकास माझी विनंती आहे की मानवीसमाजाच्या विकासात निर्माण झालेल्या या तीन टप्प्यांचे स्वाभाविक विशद लेखकाने अभ्यासावे. धर्म ही सरंजामशाहीत जन्मास आलेली कल्पना तर राष्ट्र ही भांडवलशाहीची कल्पना आणि समाजवाद ही विषमता व पिळवणुकीतून जन्माला आलेली कल्पना. मानवाच्या नैसर्गिक विकासक्रमानेच आपणांस जायचे असेल तर धर्म व राष्ट्र या कालबाह्य कल्पनांचा त्याग करून निर्भेळ समाजवादच अंगिकारला पाहिजे.

५ डिसेंबर, १९७० — अनिल बर्वे, पुणे

□ स. प. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे (नॅशनल सर्व्हिस कोअर) केल्या जाणाऱ्या कार्याबद्दल आपल्या दि. २-१२-१९७० च्या 'माणूस'च्या अंकात श्री. सुभाष देशपांडे यांचा लेख प्रसिद्ध झालेला आहे. लेखातील पुष्कळसा तपशील वस्तुस्थितीला धरून नाही, दिशाभूल करणारा आहे. योजनेचा कार्यवाह या नात्याने संबंधितांचा गैरसमज होऊ नये म्हणून हा खुलासा करीत आहे.

१. 'नगरच्या कॉलेजातील डॉ. हळबे हे या योजनेचे संस्थापक' — हे विधान खरे नाही. डॉ. हळबे नगरच्या कॉलेजात या योजनेचे प्रमुख म्हणून काम पाहतात.

२. '३८ विद्यापीठातील ४०,००० विद्यार्थ्यांना बळेच या योजनेत ओढण्यात आले' — हे विधान तर वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे. केंद्र सरकारची ही योजना अजून तो प्रायोगिक अवस्थेत आहे. योजनेत सामील झालेले विद्यार्थी सक्तीने आलेले नसतात. स्वेच्छेने आलेले असतात.

३. 'शासनाने या योजनेसाठी चार कोटी रुपये मंजूर केलेत' — एवढ्या रकमेची एका वर्षासाठी तरतूद करण्यात आलेली नाही.

४. '...जिल्हा परिषदेने दोन ट्रक्स दिले' — जिल्हा परिषदेने आपणहून एकच ट्रक उपलब्ध करून दिला होता.

५. '...पण ही योजना (कुटुंबनियोजनविषयक पाहणीची) बहुधा जिल्हा परिषदे-

कडून लादली गेली-दोन ट्रक फुकट दिले होते ना दगड नि माती वाहायला !...' हे विधान तर अत्यंत बेजबाबदारपणे केलेले आहे. कुटुंबनियोजनविषयक पाहणीची योजना जिल्हा परिषदेने लादली नाही, हे मुद्दाम स्पष्ट करणे आवश्यक आहे. लोकसंख्याविषयक प्रश्नाचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास कसा करता येईल, 'पाहणी'चे (survey) तंत्र कसे अवगत करून घेता येईल हे महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला समजावे म्हणून महाविद्यालयानेच ही योजना आखली. दुसऱ्या कोणीही लादली नाही. तसेच या कामासाठी आवश्यक तेवढी समज असलेल्याच विद्यार्थी व विद्यार्थिनींची निवड केली होती. सरसकट सर्वच विद्यार्थी हे काम करीत नव्हते. तसेच लेखामध्ये पाहणीसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीतील सर्वच प्रश्न न देता काही प्रश्न सुटे करून उदाहरणादाखल दिलेले आहेत. ही गोष्ट फारच अप्रस्तुत आहे. या संदर्भात उपस्थित केलेले मुद्दे म्हणजे विकृत मनोवृत्तीचा, विकृत विचारपद्धतीचा उथळ आविष्कार आहे असे वाटते.

हा खुलासा आपल्या 'माणूस'मध्ये प्रकाशित व्हावा, किंबहुना प्रकाशित होणे आवश्यक आहे असे वाटते. कळावे.

**४ डिसेंबर, १९७०** **वि. रा. शिरगुरकर,**
राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख, पुणे.

¤ दि. २ डिसेंबरचा 'माणूस' वाचला. निरर्थक परळ निवडणूक आणि सरकारी कर्मचाऱ्यांचा संप ह्या दोन महत्त्वाच्या बाबींवर काहीही न लिहिता 'बोरकर', 'कलकत्ता' ह्यांना, स्पष्टपणे सांगायचे तर अवास्तव महत्त्व दिले गेले आहे. अंक चांगला चालतो म्हणून कृपया Standard सोडू नका.

'दूरचे तारे' आणि 'हिंदू समाजवादी' Excellent. अंकात फापटपसारा फार आहे. राजकीय लेखांसाठी माणूस प्रसिद्ध असताना, उगीच काहीतरी फालतू मजकूर वाचकांच्या गळ्यात मारू नका.

**३ डिसेंबर, १९७०** **अविनाश जंग, कोल्हापूर**

¤ सकाळचे १० वाजले आहेत. आठ वाजता वाचनालयात गेलो होतो. दैनिकातील बातम्या वाचल्यानंतर मासिकांच्या टेबलाकडे दृष्टि वळली. माणूसचा दिनांक २ डिसेंबर ७० चा अंक दिसला. श्री. रवींद्र पिंगे यांचा बोरकरांवरील लेख मनाला आल्हाद देणारा वाटला. संपूर्ण वाचला आणि रात्रीपासून निर्माण झालेले निराशेचे वातावरण वितळू लागले.

लेख फारच चांगला आहे. मी आहे प्रवासी. पण तुम्हाला लागतो पत्ता म्हणून खालील हंगामी पत्ता दिला आहे.

**३ डिसेंबर १९७०** **ल. द. दीक्षित. सातारा**

रंगभूमी—
अर्थात फ्रान्सची

सौ. निर्मला पुरंदरे

# एका ज्वलंत प्रश्नावरील प्रभावी नाटक

जगात रंगभूमीवर सर्वांगानं नवनवीन प्रयोग होत आहेत. भारतात महाराष्ट्र, बंगाल, गुजराथमध्ये नेपथ्य, भूमिका, संगीत, प्रकाशयोजना वगैरेंवर अभ्यास केला जातो. नाटक हे समाजजीवनाचे महत्त्वाचे अंग आहे याची ही प्रचीती म्हणावी लागेल.

फ्रेंच माणूस नाटकवेडा किती आहे हे अजून कळलं नाही. बहुतेक नाट्यप्रयोग पॅरिसमध्ये चालू असतात. पण इतर शहरांमध्ये त्यांचा म्हणावा तसा धडाका नाही. घरी टेलिव्हिजन असला की नाटकाला जायचा त्रास कोण घेईल ? हेही नाटकं सर्रास न होण्यामागचं कारण असू शकेल.

सध्या 'पालखी'चा मुक्काम पॅरिसच्या पश्चिमेला सुमारे ४०० कि. मीटर्स दूर असलेल्या Rennes या गावी आहे विद्यापीठ, सांस्कृतिक कार्यक्रम, गिरण्या, कामगारवर्ग मोठ्या प्रमाणावर असलेलं हे शहर. जुने रस्ते—वाडे पाहून पुण्यातील कसबा पेठेची आठवण न झाली तरच नवल. आपल्याकडील कर्वे इन्स्टिटयूटसारखंच सामाजिक कार्यकर्त्यांसाठी येथे एक शिक्षण केंद्र आहे. सध्या मी तेथे काम करते.

फ्रेंच सरकारतर्फे मोठमोठ्या गावांतून Maison de la Culture ( सांस्कृतिक केंद्रं ) चालवली जातात. अद्ययावत इमारती. एकाच इमारतीत चित्रपटगृह, नाट्यगृह, प्रदर्शनासाठी हॉल, रेकॉर्डस् लायब्ररी, रेस्टॉरंट ही सर्व करमणुकीची ठिकाणं असतात. तिकिटांचे दर माफक असले तरी इमारतींचा थाटच एवढा असतो की कामगार वर्गातील हौशी लोक इमारतीत शिरायला धजत नाहीत. निकोल. अॅलँ. मारीआन यांबद्दल तक्रारीच्या सुरात बोलत होती. म्हणे, एवढं चांगलं थिएटर बांधायला नको असं वाटतं. गोरगरीब हा थाटमाट पाहून बिचकतात.

आज प्रथमच फ्रेंच नाटक पाहायला आले. नाटकाचा बराच बोलबाला झालाय. विषय समाजातील कुतूहलाचा. प्रथम प्रयोग झाले. त्यांवर उलटसुलट चर्चा झाली. Rennes येथे हा प्रथमच प्रयोग.

युरोपभर चर्च, धर्मगुरू, धर्म, पारंपारिकता यांबाबत विद्यार्थिवर्गात, तरुण पिढीत एक नापसंतीची लाट आली आहे. धर्मशिक्षण समाजाभिमुख नाही असा सूर आहे.

कॅथॉलिक चर्च भिक्षूंनी (धर्मप्रसारक–धर्मगुरू) लग्न करू नये या आग्रहाचं आहे. भिक्षूंचाही याबाबतीत असंतोष आहे. त्यावर चर्चा चालू आहेत. या कडक निर्बंधामुळे अनेक वेळा त्याविरुद्ध घटना घडतात.

अशाच एका सत्य घटनेतून L'INFAME (असह्य, untolerable, unspeakable) या नाटकाचा जन्म झाला. Roger Planchon यांनी स्वत: हे नाटक लिहिलंय, दिग्दर्शन व प्रमुख भूमिकाही त्यांचीच.

३ डिसेंबर १९५६ रोजी एका भिक्षूने आपली प्रेयसी, नऊ महिन्यांची गर्भवती असताना तिचा खून केला. या प्रसंगाने त्या काळात खूप मोठं वादळ उठलं होतं. चर्चचे कायदे, समाजाची प्रतिक्रिया, पोलिसांची कारवाई व स्वत:चं मन यांच्या भोवऱ्यात सापडलेल्या त्या भिक्षुणीनं (Guy) अनेक उलट सुलट विधानं केली. चर्चनं अर्थातच अतिशय त्रयस्थ भूमिका घेतली होती. 'तो वेडा आहे' हे विधान करून चर्च बाजूला झालं. गीला शिक्षा झाली.

Roger Planchen आपल्या निवेदनात म्हणतात, 'या घटनेवर मला काहीही मत मांडायचं नाही. परंतु समाजानं आणि चर्चनं या निमित्तानं या प्रश्नावर विचार करावा अशी माझी विनंती आहे.'

नाटकातील सर्व पात्रांनी आपापल्या भूमिका उत्तम प्रकारे सादर केल्या. परंतु सर्वात लक्षात राहिलेली भूमिका स्वत: Roger Planchon यांचीच. 'मी भिक्षू आहे' हा मनावरचा संस्कार ते विसरू शकत नाहीत. हातून घडलेल्या घटनेमुळे मनाची झालेली उलघाल, काही वेळा समर्थन काही वेळेला धि:कार आणि जवळ जवळ मनाचा तोल गेलेली ही भूमिका त्यांनी उत्कृष्टपणे सादर केलीय.

Roger Planchon चाळिशीचे आहेत. आजपर्यंत त्यांनी ७ नाटकं स्वत: लिहिली व दिग्दर्शित केलीत. नामांकित नाटककारांच्या चाळीस नाटकांची दिग्दर्शनं केलीत. गेली १३ वर्षे Nancy येथील कलाकेंद्राचे संचालक म्हणून ते काम करत आहेत. विनोदी भूमिका ते उत्कृष्टपणे सादर करतात, अशी त्यांची प्रसिद्धी आहे.

नेपथ्याचा एक नवीन प्रयोग म्हणजे पडदा एकदा सुरुवातीला उचलला गेला की शेवटपर्यंतच्या लहान लहान प्रवेशांचं साहित्य उचलणं, आणून मांडणं हे सर्व प्रेक्षकांसमोरच होतं. किंचितसा अंधार केला जातो. अतिशय झटपट प्रयोगातील नटनटी स्टेजवरच किंचित मागील बाजूस एका बाकावर बसलेली असतात. नेपथ्य अतिशय साधं, सुटसुटीत होतं.

नाटकातील संवाद, सत्य परिस्थितीची पार्श्वभूमी व समाजाचा हा एक ज्वलंत प्रश्न या सर्वांमुळे संपूर्ण प्रयोग पाहत असताना प्रेक्षक वर्गावर एक विलक्षण दबाव आल्याचं जाणवत होतं. त्या भिक्षूच्या मानसिक परिस्थितीबद्दल अनुकंपा, सहानुभूती मनात घेऊनच प्रेक्षक परततो.

□ □ □

# पूर्व पाक-काळाचं थैमान

'इतस्तत: विखुरलेल्या प्रेतांना तुडवल्याशिवाय दोनशे पावलंदेखील धडपणे चालणं मला शक्य झालं नाही....संपूर्ण विभागात, तडाख्यात सापडलेल्या जनावरांचे खच मैलोगणती विखुरले गेले होते...दृष्य भयानक होतं...काळानं हिरावून नेलेल्या बछडयांच्या प्रेतांवर, धाय मोकलून रडणाऱ्या मातापित्यांचा टाहो हृदयविदारक होता...माझे पाय अक्षरश: थरथरत होते...'

- पूर्व पाकिस्तानात बंगालच्या उपसागरातल्या सैतानी लाटांनी, राक्षसी वादळानी नुकतंच प्रचंड थैमान मांडलं. त्यातल्याच मानपुरा बेटातनं प्रत्यक्ष परिस्थिती पाहून आलेल्या, गुलाम मलिक ह्या पत्रकारानं वरीलप्रमाणे, काळाच्या ह्या अस्मानी-सुलतानीची नोंद केली, तर पटुकहाली ह्या बेटावरून पाहणी करून आलेल्या अधिकाऱ्यानं, त्या तेरा मैलांच्या पट्ट्याचं, 'कुठल्याही मानवी अस्तित्वाचं चिन्ह शिल्लक नसलेली भयानक दफन-भूमी' असं वर्णन केलं. हातिया बेटातल्या एका खेडयात कित्येक प्रेतं दफन केल्यावाचून पडून राहिली होती. तिथला खेडूत, जवळजवळ ओरडूनच वार्ताहिरांना म्हणाला, 'पाच हजार प्रेतांचं सामूहिक दफन आम्ही केलं. आता हात दुखू लागले आहेत. अधिक खड्डे खणण्याचं त्राणच आता उरलेलं नाही...'

पूर्व पाकिस्तानला बसलेल्या ह्या भयानक तडाख्यात सरकारी घोषणेनुसार, आतापर्यंत दीड लाख लोक मृत्युमुखी पडले असावेत. परंतु अद्यापही प्रेतं हाती लागत आहेत, बेपत्तांचे आकडे फुगत आहेत. पाकिस्तानी व अन्य वृत्तपत्रीय अंदाजानुसार हा आकडा ६-७ लक्षापर्यंत जायची शक्यता आहे. तर प्रत्यक्ष जागी जाऊन, वस्तुस्थितीचा अंदाज घेऊन पाकिस्तान टाइम्सनं दहा लक्षांना काळानं हिरावून नेलं असावं असं सूचित केलं आहे. काळानं दाखवलेल्या अति भयानक रौद्रावतारात ह्या तडाख्याची गणना करावी लागेल, आणि १८८७ सालातल्या चीनमधल्या पीत नदीच्या तडाख्याखालोखाल नंबर दोनचा संहारक तडाखा असंच ह्या तडाख्याचं वर्णन करावं लागेल. (१८८७ साली पीत नदीनं पन्नास हजार चौरस मैलांच्या टापूत थैमान घातलं नि तीस ते चाळीस लाख लोकांना जल-समाधी दिली!)...

बंगालच्या उपसागरानं दिलेला हा पहिलाच तडाखा असं मात्र मुळीच नाही. १८७६ च्या चक्रीवादळानं दोन लक्ष जीवांचा बळी घेतला होता; तर गेल्या १५-२० वर्षात कमीतकमी ८-९ वेळा उपसागरानं रौद्र स्वरूप धारण करून लक्षावधींना बेघर केलं होतं; तर कित्येकांना ह्या जगातून नाहीसं केलं होतं. परंतु हे

माहित असूनही ह्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याची कुठलीही तयारी पाक-सरकारनं केलेली नव्हती. डाक्क्याहून प्रसिद्ध होणारं 'मॉर्निंग न्यूज' म्हणतं, ... 'ज्यावेळी हजारोंच्या विनाशाचे मथळे वृत्तपत्रातून झळकत होते, त्यावेळी स्थानिक प्रशासन मात्र आशियाई मोटार शर्यत स्पर्धकांचं स्वागत करण्यात मश्गुल होतं... खाद्यान्न व औषधं ह्यांची मदत, जगाशी सर्वस्वी संबंध तुटलेल्या बेटांवर पोचायला आठवड्याचा अवधी लागला...तर कित्येक ठिकाणी सरकारी दिरंगाईतनं बाहेर पडून मदत पोचण्यापूर्वीच, टॉयफाईड व कॉलरा ह्यांचं थैमान सुरू झालं होतं...'

त्याहीपेक्षा भयानक म्हणजे, परराष्ट्रांनी देऊ केलेल्या मदतीबाबत पाकिस्तान शासनानं दाखवलेली अनास्था! भारताबाबतचे किस्से तर प्रसिद्ध झाले आहेतच. पण ब्रिटीश, अमेरिकन आदी राष्ट्रांची मदत घेऊन निघालेली विमानं, पाक-वैमानिकच चालवतील असाच अट्टाहास पाक-सरकारनं धरला नि मदत वेळेवर पोचण्यात अडसर निर्माण केला. प. जर्मनीचं १५० खाटा असलेलं, सुसज्ज फिरतं शुश्रूषागृह, जय्यत तयार होतं. परंतु पाक शासनानं प. जर्मनीला उत्तरही धाडलं नाही! तर डाक्क्यातल्या 'रेडक्रॉस' प्रतिनिधीचा संदेश मुख्य केंद्रावर पोचायला तब्बल चोवीस तास लागले! काळाच्या थैमानात, पाक शासनाची ही तऱ्हा.

पूर्व पाकची वृत्तपत्रे म्हणूनच म्हणत आहेत की, '...पूर्व पाकबद्दलचा, इस्लामा-बादच्या मनातला आकसच पाक शासनाच्या ह्या वागणूकीच्या मुळाशी आहे!'

## पश्चिम जर्मनी-मैत्रीची तहान!

प. जर्मनी–एक निडर राष्ट्र, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात, अक्षरशः धुळीला मिळालेलं. त्यातच दुभंगलेलं. वेगवेगळ्या दबावाखाली दाबलं गेलेलं. पण त्या राखेतनंही हे राष्ट्र पुन्हा उभं राहिलं. जिद्दीनं उभं राहिलं. बर्लिनची डोकेदुखी ह्या राष्ट्रामागे लागलेली आहे. तो वाद संपण्याऐवजी, गुंतागुंत दिवसेंदिवस वाढत आहे. नि कदाचित् तेवढ्याच साठी आज जर्मनीनं आपल्या शेजारी राष्ट्रांबरोबरचे संबंध सुधारण्याचा धडाका लावलेला आहे. त्यातल्या त्यात युरोपीय कम्युनिस्ट राष्ट्रांबरोबरचे संबंध सुधारण्यासाठी त्यांची धडपड चालू आहे. त्यातनंच त्यांचा मॉस्कोबरोबरचा करार अमलात आला. हंगेरी, झेकोस्लावाकिया आणि बल्गेरिया-बरोबर लौकरच त्यांची बोलणी सुरू होत आहेत. नि ह्या साऱ्यातनंच दडपण येऊन की काय, पण पूर्व जर्मनीच्या वॉल्टेर उल्ब्रिच् ह्यांनी प. जर्मनीशी बोलणी सुरू करण्यास संमती दिली आहे.

प. जर्मनीनं उघडलेल्या ह्या नव्या आघाडीचाच एक भाग म्हणजे पोलंड-बरोबर तिनं परवाच केलेला मैत्रीचा करार! वास्तविक पोलंड आणि जर्मनी म्हणजे एकमेकांचे कट्टर द्वेष्टे! हजारो वर्षांचं शत्रूत्व ह्या शेजारी राष्ट्रांमध्ये

कायम धगधगत असलेलं ! दुसऱ्या महायुद्धात पोलंडवरून रणगाडे फिरवताना, एकेका पोलिश नागरिकाला, स्त्रीला, बालकाला वेचून काढून क्रूरपणे ठार करण्याचा आदेश हिटलरने दिला होता. त्याबरहुकूम, नाझींनी साठ लक्ष पोलिश नागरिकांना कंठस्नान घातलं होतं ! ह्या पार्श्वभूमीवर, प. जर्मनीचे प्रमुख विली ब्रॅण्ड्ट् ह्यांनी मैत्रीचा हात पुढे केला. पोलंडनं तो स्वीकारला. ह्या करारसंबंधी बोलताना चॅन्सेलर विली ब्रॅण्ड्ट् म्हणतात, '...अधिक चांगल्या पायावर उभ्या राहणाऱ्या नव्या युरोपची ही नांदी आहे. युरोपियन्स आता अधिक काळ आपसात भांडत राहू शकणार नाहीत...युरोपला खंडित राखू शकणार नाही. नव्या पिढीच्या ह्या आकांक्षा आहेत. भूतकाळ त्यांच्या माथी मारून आम्ही त्यांना निराश करणार नाही...'

प. जर्मनी-पोलंडच्या ह्या करारानं ह्या दोन राष्ट्रातल्या सरहद्दीचा वाद निकालात निघाला. काही अंशी प. जर्मनीने पोलंडचे मुद्दे मान्य केले. तर त्या बदलात पोलंडमध्ये अडकलेल्या सुमारे एक लक्ष जर्मनांना प. जर्मनीत परतण्याची मुभा पोलंडने देऊ केले आहे...

प. जर्मनीची पावलं ह्या दृष्टिनं पडत आहेत. इतर राष्ट्रांचाही प्रतिसाद त्यांना मिळत आहे. पण बर्लिन प्रश्नावर अमेरिका-रशिया दोघेही ताठ आहेत. नि निर्णय त्यांच्याच हातात आहे, हे दुर्दैव जर्मनीचं ! ◻ ◻ ◻

## राष्ट्रध्वज

गेल्या वर्षी मार्था मेयर्स ह्या सतरा वर्षाच्या अमेरिकन विद्यार्थिनीनं अमेरिकेचा राष्ट्रध्वज, एका मोर्च्यात भाग घेताना, निषेध म्हणून जाळला. तिच्यावर खटला भरला जाऊनं तिला सहा महिन्याची सजा झाली. ह्या शिक्षेविरुद्ध तिनं केलेलं अपील, सुनावणीला निघालं. तेव्हा वरिष्ठ न्यायाधीशांनी तिला देशभक्तीपर चार शब्द सुनावले. शिवाय एक अभिनव शिक्षा फर्मावली. न्यायाधीशांनी सुचवलं की, मार्थानं मोठ्या आकाराचा अमेरिकन ध्वज हातात घेऊन तीन मैल रपेट करावी. त्या तरुणीनंही शिक्षा शिरसावंद्य मानून ह्या ' स्वातंत्र्य मोर्च्या 'ला मान्यता दिली. भल्या पहाटे, कडाक्याच्या थंडीत, ती बंडखोर विद्यार्थिनी, आपल्या कृत्याचं परिमार्जन म्हणून पंधरा पौंड वजनाचा तो राष्ट्रध्वज, ताठ मानेनं छातीसमोर धरून तब्बल तीन मैल चालत गेली !!

...आपल्याकडेही भावनेच्या भरात राष्ट्रध्वज, घटना जाळल्याचे प्रकार घडतात. पण...??

# फुलगाव येथील एक व्रतस्थ गुरुजी

वि. शं. पारगावकर

त्या दिवशी सकाळीच श्र.. आणि सौ. माजगावकर घरी आले. हे त्यांचं येणं जितकं निराळं होतं तितकच ते अनपेक्षित होतं. माणूसचे संपादक म्हणून आणि मित्र म्हणून माजगावकर अनेक वेळा घरी आले होते. परंतु आजचा त्यांचा थाट निराळाच होता ! लग्न वगैरेच्या आमंत्रण मोहिमेवर निघण्याचा पोषाख दोघांच्या अंगावर होता. पण आश्चर्य असे की हातात मंगल पत्रिका किंवा चांदीची वाटी वगैरे काही नव्हते. मी विचारले,

'आज कुठल्या मोहिमेवर ?'

ते हसले आणि म्हणाले,

'आज 'माणूस 'चं नाही; घरचं कार्य काढलं आहे.'

मी फक्त प्रश्नार्थक मान हलविली. आणि पुढे म्हटलं,

'हातात चांदीची वाटी वगैरे आयुधे काही दिसत नाहीत ?'


'छोटूची मुंज काढली आहे. पण त्या जुन्या आयुधांच्या साह्याने नाही.'

मी हसलो, आणि ते पुढे सांगू लागले.

'परवा संध्याकाळी फुलगावला जायचं. तुमचं घर, आणि आपली मित्र मंडळी. स्वतंत्र मोटार ठरविली आहे. दुसरे दिवशी सकाळी मुंज आहे. संध्याकाळी परत निघायचं !'

त्यांच्या बोलण्यात भावनेपेक्षा तर्कशास्त्रच अधिक होतं. हे फुलगाव ह्यानी कोठून काढलं ? का काढलं ? लोक लग्ना–मुंजीसाठी फारतर तुळजापूर, आळंदी निवडतात. माजगावकरांनी हे ऐतिहासिक खेडं निवडलं होतं. दुसऱ्या बाजीरावचं हे खेडं. ना. सं. इनामदार यांच्या 'मंत्रावेगळा' या कादंबरीत या खेडयाचे उल्लेख असल्याचें मला आठवले. आणि दुसरीही एक गोष्ट लक्षात आली. चेष्टेच्या सुरात मी म्हणालो,

'बरोबर आहे. आळंदी वगैरे धार्मिक ठिकाणांच्या ऐवजी तुम्ही हे ऐतिहासिक ठिकाण निवडलं. माझ्या लक्षात आलं–'



श्री. धोत्रे गुरुजी व बाबासाहेब पुरंदरे । सत्कारप्रसंगी

'काय ?' माजगावकरांनी हसत हसत विचारलं.

'बाबासाहेब पुरंदरे यांनी सुचविलं असेल हे ठिकाण ! ऐतिहासिक.'

'नाही. ते माझे मेव्हणे आहेत. ते सुचवूही शकले असते. पण त्यांनी नाही सुचविलं. तुम्ही सर्वांनी आलं पाहिजे. कानिटकर, मराठे, श्री. ज. जोशी आणि पुंडलीकही बरोबर आहेत. मजा करू. मुंज हे निमित्त आहे. मी त्या गावाविषयी आताच सांगत नाही. पण तुम्हाला खास करून आवडेल अशी मी खात्री देतो.'

'येतो.' अशी कबूली घेऊन माजगावकर निघून गेले.

दुसरे दिवशी संध्याकाळी पाच वाजता आमची मोटार सर्वांना घेऊन फुलगावाकडे निघाली. हे गाव नगर रस्त्यावर आहे. लोणीकंदपासून पश्चिमेकडे एक कच्ची सडक जाते. फाट्यापासून हे गाव दोन मैल आत आहे.

सूर्यास्ताच्या वेळी आम्ही तेथे पोहोचलो. आम्ही जेथे उतरलो होतो ते श्री. तात्या कुळकर्णी यांचे शेत होते. शेतावरच त्यांनी घरही बांधले होते. गावापासून

ते पाव मैलावर होते. ते शेत आणि विटा सिमेंटमध्ये बांधलेले घर पाहून मी थक्क झालो. शिवाय तेथे विजेची रोषणाई केलेली होती. मला काकासाहेब गाडगीळांची आठवण झाली. ते म्हणाले होते, ' आपल्या खेड्यात लवकरच वीज आणि रेडिओ दाखल होतील.'

त्याप्रमाणे खरोखरच खेड्यात वीज आणि रेडिओही दाखल झाले होते ! आम्ही गेलो तेव्हा हिरव्या, तांबड्या, पिवळ्या लाईटमध्ये ते घर सजले होते आणि रेडिओ-वर भीमसेन जोशी यांचे गाणे लागले होते ! नुकतीच दिवाळी झाली होती. आणि पहिल्या मोटारने आलेली माजगावकरांच्या आणि कुलकर्ण्यांच्या घरची मंडळी कामाला लागली होती. लहान मुले फटाके, भुईनळे उडवीत होती. चौहूकडून डोंगर होते. शेताच्या उत्तरेकडून भीमा नदी वाहात होती. भोवती हिरवीगार शेती होती.

शहरापासून आम्ही दूर होतो आणि तरीही हवं तेवढं शहरी वातावरण होतं. तात्या कुलकर्णी आणि त्यांचे तीन बंधू यांची ही कर्तबगारी. यांनी वर्ष दोन वर्षे अहोरात्र खपून दगड गोट्यांनी भरलेल्या माळरानाला ही मन प्रसन्न करणारी शोभा प्राप्त करून दिली होती.

रात्री जेवणं वगैरे झाली आणि समोरच्या मंडपात रोषणाई झालेली दिसली. मी माजगावकरांना विचारलं,

' आता काही कार्यक्रम दिसतोय.'

' होय. फुलगावला श्री. धोत्रे म्हणून एक शिक्षक आहेत. त्यांचा आपण सत्कार करणार आहोत. सत्कार होईल आणि मग पुंडलीक, जोशीबुवा, कानिटकर, मराठे यांना ' कथाकथन ' करण्यास सांगू. रात्री बारा वाजेपर्यंत. चालेल ना ?'

' वा ऽ चांगलं आहे.'

' धोत्रे गुरुजींचा गेल्याच वर्षी आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रीय पातळीवर राष्ट्र-पतींच्या हस्ते गौरव झालेला आहे. छोटूची मुंज आळंदीला तुमच्या अपेक्षेप्रमाणे ज्ञानेश्वरांच्या पायाशीही करता आली असती. पण तीन नद्यांचा आणि तीन परं-परांचा संगम असलेले हे स्थळ आहे. आळंदी येथून ५ । ६ मैलावर आहे. पैठणची एकनाथांची पालखी या गावावरून येथे मुक्काम ठेवून आळंदीला जाते. ही एक धार्मिक परंपरा. संभाजी महाराजांचा वध झाला ते ठिकाण येथून एक दीड मैला-वरच आहे. ही ऐतिहासिक परंपरा. तिसरी शैक्षणिक परंपरा. धोत्रे यांचे घराणे गेली शंभर वर्षे या ठिकाणी मोफत विद्यालय चालवीत आहे. या पंचक्रोशीतील चार पिढ्यांना ज्या घराण्याने विनामूल्य निरपेक्षप विद्यादान केले त्या घराण्याविषयी पूज्यभाव व्यक्त करणं हे आपले कर्तव्य आहे. या घराण्याची थोर परंपरा निःस्वार्थ बुद्धीने आजही धोत्रे गुरुजी चालवीत आहेत. त्यांचा आशीर्वाद बटूला मिळावा, ते खरे व्रतबंधन होईल असे मला वाटले म्हणून ही योजना.'

धोत्रे गुरुजींच्या सत्काराचा कार्यक्रम यथासांग पार पडला. त्यांना शाल आणि

चांदीची समई आणि सौ. धोत्रे यांना सौभाग्याहेर अर्पण करण्यात आला आणि ज्यांच्या शेतात आम्ही मुक्काम ठोकला होता आणि वास्तूत मुंज होणार होती त्या श्री. तात्या कुलकर्णी यांचाही सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांतर्फेही जमलेल्या लेखक मंडळींचे पुष्पगुच्छ देऊन हार्दीक स्वागत करण्यात आले.

धोत्रे गुरुजींनी सत्काराला उत्तर देताना अगदी छोटंसच भाषण केलं. पण ते अतिशय नेमकं आणि प्रभावी होतं. हजार दीड हजार लोकवस्ती असणाऱ्या खेड्यातील एक शिक्षक इतकं औचित्यपूर्ण, इतकं थेट हृदयाला भिडणारं, शालीनतेनं उजळलेलं भाषण करू शकतो याचं मला फार आश्चर्य वाटलं.

जाड काळ्या फ्रेमचा चष्मा, डोक्यावर काळेच परंतु विरळ केस, अंगात पांढरा शुभ्र नेहरू शर्ट आणि तितकेच शुभ्र धोतर अशी त्यांची गौरवर्णी मूर्ती तेथील परिसरात शोभून दिसत होती. शहरातील शाळेतल्या कुठल्याही शिक्षकापेक्षा हे गुरूजी कोणत्याही दृष्टीने कमी नव्हते. उलट फार अधिक होते. फार मोठे होते असे मला वाटले

एखाद्या निबिड अरण्यात एखादं देऊळ असावं आणि त्यामध्ये एक नंदादीप शांतपणे तेवत रहावा असे धोत्रे गुरूजींकडे पाहून वाटत होते.

आणि तसेच तात्या कुलकर्णी यांचे विषयीही !

अस्सल शेतकरी व्यक्तिमत्व. मोठा जबडा, रुंद मनगट, शांत जलाशयासारखे वाटणारे डोळे. आणि मितभाषणी स्वभाव. उपस्थितांच त्यांनी स्वागत केले. पण अक्षरशः एक-दोन मिनिटात. बोलणं हा माझा धर्म नाही. मी कृती केली पाहिजे. असंच जणू त्यांच्या बोलण्या-वागण्यावरून वाटत होतं.

त्याच वेळी मला वाटलं ही दोन माणसं अगदी निराळी आहेत. त्यांची कार्यक्षेत्रे निराळी आहेत. ती साधी माणसे नाहीत तर कृतिवीर आहेत. त्यांच्याशी गप्पा मारल्या पाहिजेत. त्यांचं मन जाणून घेतलं पाहिजे असं मनानं घेतलं.

एकीकडे समारंभ चालू होता. मी या दोन व्यक्तींशी आपल्या उद्या होणाऱ्या गप्पात कशी मजा येईल याची चित्रे रंगवीत होतो.

आम्ही रात्री एक वाजता झोपलो. झोपण्यापूर्वी माजगावकर म्हणाले,

'उद्या पहाटे उठणार का ?'

'नाही. मी घरी असतो तर सातला उठलो असतो. इथं फार तर थोडं लवकर उठेन. पण पहाटे नाही.'

'किती लवकर उठाल ?'

'फार तर पावणेसात म्हणा.'

तेथील सर्वजण हसले. माजगावकर पुढे म्हणाले,

'मुंज साडेनऊ वाजता आहे. तेव्हा सकाळी तसं तुम्हा लोकांना काही काम नाही. तुम्ही सकाळी अंघोळ वगैरे उरकून इथून दीड मैलावर तुळापूर म्हणून गाव आहे तिथे जाऊन या.'

'तिथं काय आहे ?'

'तुळापूरला संभाजी महाराजांची समाधी आहे. शिवाय तिथं भीमा-भामा व इंद्रायणी या तीन नद्यांचा संगम आहे. संगमेश्वराचं मोठं छान देऊळ आहे. नदीला सुंदर घाटही आहे.'

बाबासाहेब पुरंदरे यांनी या सर्व परिसराची ऐतीहासिक माहिती सांगितली होतीच. मला बाबासाहेबांचं बोलणं आठवलं. मी म्हटलं,

'पण वढूलाही महाराजांची समाधी आहे ना ? वढू येथून किती दूर आहे ?'

'जवळच आहे. तुम्ही वढूलाही पायी जाऊ शकाल, किंवा मोठ्या रस्त्याने जायचं असेल तर तात्यांची जीप घेऊन जा. तुम्ही दोन्ही ठिकाणे सहज पाहून येऊ शकाल.'

कानिटकर, जोशीबुवा वगैरे मंडळींनी सकाळी प्रथम तुळापूरला जायचं व मग वढूला जायचं कबूल केलं. अर्थात सकाळचं फराळाचं सामान बरोबरच बांधून द्या असं पुंडलीकांनी सुचविलं !

वढू आणि तुळापूर दोन्ही ठिकाणची समाधी पाहिली. खरी समाधी वढूला आहे असं अलीकडे कागदपत्रातून सिद्ध झालं आहे म्हणतात. असेलही परंतु वढू येथील संभाजी महाराजांची समाधी मी पाहिली परंतु स्थानमहात्म्याचा जो एक परिणाम असतो तो काही माझ्या मनावर झाला नाही. या समाधीच्या आसपास नदी नाही. जवळपास झाडी नाही. दहन करायला ज्या खुणा आपण गृहित धरतों त्या इथे कुठेही दिसत नाहीत. उघडचा बोडख्या जागी ही समाधी आहे.

त्या उलट तुळापूर येथील समाधीची जागा आहे. भीमा-भामाच्या आणि इंद्रायणीच्या संगमाजवळ एका किनाऱ्याला ती आहे. जवळ मोठं विशाल महादेवाचं देऊळ आहे. बरीचशी झाडी आहे. खाली नदीचा घाट आहे. आणि याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुरार जगदेवच्या शहाजीमहाराजांच्या काळात अस्तित्व असलेल्या रुद्रनाथ महाराजांची समाधी येथून अगदी जवळच आहे. या महाराजांनी तेथे जिवंत समाधी घेतली असे म्हणतात. त्या समाधीजवळच आणखीही एका महाराजींची समाधी आहे.

शिवाय त्याच परिसरात आणखी लहानमोठ्या कितीतरी समाध्या आहेत. म्हणजे हे ठिकाण पूर्वी दहनभूमी म्हणूनच प्रसिद्ध असावे असे वाटतें.

दुपारी जेवण वगरे करून आम्ही श्री. धोत्रे गुरुजींकडे गेलो. त्यांनी हसतमुखाने स्वागत केलं. त्यांच्या शाळेचे नाव 'हरि उध्दव धोत्रे मोफत विद्यालय' असे आहे. एकशे दहा वर्षापूर्वी त्याची स्थापना धोत्रे गुरुजींच्या आजोबांनी केली. ती अगदीं परोपकार बुद्धीने. तें मुलांकडून फी घेत नसत आणि तोच शिरस्त आजतागायत चालू आहे. शाळेसाठी येणारा बहुतेक खर्च धोत्रे घराणे करते. आता जिल्हा परिषदेचे काही अनुदान त्या शाळेला मिळते पण तें पुरेसे थोडेच असणार ?

एका खेड्यात एकशे दहा वर्षे विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण देण्याचे कार्य एका घराण्याने देश सेवा म्हणून सतत आपल्या अंगावर घेतलेले आहे ही गोष्ट खरोखरच फार अपूर्व आहे. हे एक आदर्श उदाहरण तर आहेच; पण त्याही पेक्षा घोत्रे गुरुजींनी हे बाजीरावांचे फुलगाव एक स्फूर्तिस्थान बनवून टाकले आहे. आजच्या स्वार्थी वृत्तीच्या आणि प्रत्येक गोष्टीत लाचखाऊ वृत्तीच्या समाजात आजचे 'आनंदनाथ त्र्यंबक घोत्रे' या गृहस्थांनी आपले सर्व आयुष्य, केवळ या एकाच ध्येयासाठी खर्ची घालावे ही या देशात एक फार मोठी घटना आहे असे वाटते.

मी त्यांना विचारलं,

'एकशे दहा वर्षे तुमचे घर येथे कार्य करीत आहे. तुमच्या तीन पिढ्या येथे जगल्या तेव्हा या गावात तुमची जमीन जुमला असलेच!'

'छे हो! कसली आलीय जमीन!'

'का? खेड्यात तर जमीनीशिवाय दुसरं उत्पन्न काय?'

'आमचे नातेवाईक मुंबईला असतात. त्यांचा व्यापार आहे. त्यातून माझ्यासाठी आणि या शाळेसाठी पैसा साठविला जातो.'

'पण येथे थोडीशी जमीन असायला काय हरकत होती?'

'आमच्या पूर्वजांपासून त्या बाबतीत धोरण पक्कं ठरविलं आहे. की जमीन तेथे घ्यायची नाही.'

'पण का?'

'कारण जमीन घेतली की लक्ष विचलीत होईल. शिक्षणावरचं लक्ष कमी होण्याची भीती. म्हणून उत्पन्नाचे तसे पाश नकोत!'

'वाऽ!' ही देखील अलीकडच्या मनाला धक्का देणारी गोष्ट होती.

घोत्रे गुरुजींची वाट फार शुद्ध वाटली.

शाळा म्हणजे एक घरच आहे. घोत्रे घराण्याचे हे घर. शाळेच्या सोयीप्रमाणे घराच्या आतल्या स्वरूपात बदल केला आहे. निरनिराळे वर्ग तयार केलेले आहेत. वर्गात फर्निचर नाही. ओसऱ्या हिरव्यागार शेणाने सारविलेल्या आहेत. आणि घोत्रे गुरुजींचे घरही या शाळेतच आहे. विद्यार्थ्यांना तो शाळा वाटत नसून घरच वाटते. शाळेला तेव्हा सुटी होती तरी मला तिथे काही विद्यार्थी भेटले. ते घोत्रे गुरुजींच्या या शाळारूपी घराशी इतके समरस झालेले दिसले की मला ते खरोखरच त्यांच्या नात्याचे, घरातलेच वाटले.

सातवीचा अभ्यास पूर्ण करून येथील मुले पुण्याला येतात. तेव्हा त्यांना प्रवेश कसा मिळतो माहीत आहे का? त्यांचे मार्क्स पाहून सर्व साधारण पद्धतीप्रमाणे त्यांना प्रवेश मिळत नाही. तर तो घोत्रे गुरुजींचा विद्यार्थी आहे ना? मग त्याला प्रवेश मिळालाच पाहिजे अशी प्रवेशाचे वेळी भावना असते!

पुण्यासारख्या, शिक्षणाचं माहेर घर समजल्या जाणाऱ्या शहरात 'हरी उद्धव घोत्रे मोफत विद्यालयाला' स्थान आहे.

हरी उद्धव घोत्रे हे आजच्या आनंदनाथ घोत्रे यांचे आजोबा. शाळेचे संस्थापक. त्यांचा मोठा फोटो शाळेत दर्शनी भागाला लावलेला आहे. माणूस फार जबरदस्त असावा असे फोटोवरून लक्षात येते. डोक्यावर पगडी. कपाळावर भस्माचे पट्टे. अंगात बंदाचा सैल अंगरखा. त्यावर रेशमी काठाच्या पंचाची घडी. पायात कोकणी जोडा आणि हातात काठी. फोटोच्यावर लिहिलं आहे 'हरि उद्धव घोत्रे गावठी शाळा मास्तर' परंतु अशी अक्षरे लिहिली नसती तर हे गृहस्थ कोणी मामलतदार किंवा प्रांत असावे असा यांचा एकंदर रुबाब आणि व्यक्तिमत्वही दिसते.

परंतु आपण असं म्हणू की एखाद्या प्रांताच्या थाटातच यांनी ही शाळा सुरू केली! ही गोष्ट इ. स. १८६० सालची. त्या साली फुरगाव सारख्या खेड्यात शिक्षणाची काय परिस्थिती असावी देव जाणे! आज या विसाव्या शतकात आणि स्वातंत्र्यानंतरच्या बावीस वर्षात शिक्षणाची परिस्थिती काय आहे ते आपण डोळ्यांनी पाहतोच. खरे शिक्षण कोणते? आणि त्याचे महत्त्व काय? या प्रश्नाची उत्तरं अजून आमच्या राज्यकर्त्यांना, शिक्षणतज्ञांना आणि पालकानाही सापडलेली नाहीत. व्यक्तिमत्वाच्या विकासाबरोबरच राष्ट्राच्या विकासालाही कारणीभूत होईल असे शिक्षण शाळा-कॉलेजातून आजही मिळत नाही. आणि अशा शिक्षणाचा पाया प्राथमिक शाळांतून रचला जात नाही. अजून दिशा, मार्गच सापडत नाही. तर त्या काळात इ. स. १८६० साली फुरगावसारख्या खेड्यात 'हरि उद्धव घोत्रे मोफत विद्यालय' काढताना त्या हरिला तेव्हा कोणती स्वप्ने पडली असतील बरे!

मोडी, मराठीचा कित्ता गिरविणे हे तेव्हाचे शिक्षण!

या घोत्रे यांच्याच एका नातेवाइकांनी, संभाजी महाराजांच्या समाधीच्या जीर्णोद्धाराविषयी कोल्हापूरच्या महाराजांना एक विनंतिपत्र, पद्यात पाठविले होते. तुळापूर येथील समाधीचे तेव्हाचे जे केविलवाणे रूप त्यांना दिसले ते पाहून त्यांच्या मनाला फार यातना झाल्या. त्यासाठी काही करावे म्हणून हे पत्र त्यांनी तेव्हा लिहिले होते. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, जीर्णोद्धाराचे तर सोडूनच द्या त्या पत्राचे उत्तर देखील त्यांना मिळाले नव्हते!

आता विचार करा, जो स्वधर्मासाठी आणि स्वदेशासाठी समर्पित झाला, हुतात्मा झाला, त्या शंभुराजाच्या समाधीची ही अनास्था. तर शिक्षणाविषयीची तेव्हा केवढी अनास्था असेल? शाळा काढणे आणि शिक्षण देणे हा तेव्हा वेडेपणाच समजला जात असेल. आणि ती शाळाही खेड्यात?

पुढे पंचवीस वर्षांनी राष्ट्रीय शिक्षणाची या महाराष्ट्रात लाट उसळली. टिळक, आगरकर वगैरे मंडळींनी शाळा स्थापन केली. पण ती पुण्यासारख्या शहरात. परंतु

हरि उद्धव घोत्रे यांनी त्याहीपूर्वी हे काम सुरू केलं आणि ते एका खेडेगावात!

देश स्वतंत्र झाल्यानंतर त्याग हा जीवनातून लुप्त होत गेल्याचे दिसते. त्याग केलाच पाहिजे अशी आता कोणाचीच अपेक्षा नाही. त्याग शब्दाचा अर्थातही मी आता बदल करू इच्छितो. त्याग म्हणजे व्रती जीवन. प्रत्येक जीवनाचं एक व्रत असलं पाहिजे. ते व्रत त्याने संभाळलं म्हणजे झालं.

हे व्रत मला घोत्रे गुरुजींच्या जीवनात दिसलं.

त्यांना मी विचारलं.

आता काळ इतका बदलला आहे. मानवी जीवन अंतर्बाह्य बदलू पहात आहे, विज्ञान आणि तंत्र विद्येनं खेड्यात देखील प्रवेश केला आहे. अशा वेळी तुमचं हे व्रत तुम्हाला जुनाट नाही का वाटत ?

घोत्र गुरूजी थोडा वेळ काहीच बोलले नाहीत. पण त्यांचे डोळे विलक्षण चमकू लागले. थोड्या वेळाने माझ्याकडे याच चकाकत्या दृष्टीने पाहात ते म्हणाले,

"मी रिकामा बसलेला असतो तेव्हा मला कधी कधी असं वाटतं. मनात अंधारून येतं आणि वाटतं आपण जे काही करीत आहो याला आज काही अर्थ आहे का ? कामानिमित्त मी पुण्या-मुंबईला जातो. तिथली मोठ मोठाली विद्यापीठे, महाविद्यालये पाहातो. उंच उंच दहा मजली रंगी बेरंगी इमारती पाहातो. आणि मग गावी येता तेव्हा मग माझा गाव, माझं घर, माझी शाळा हे सारंच मला थिटं थिटं वाटू लागतं. जुनाट वाटू लागत—! '

घोत्रे गुरूजी मध्येच बोलायचं थांबले. मग स्वतःशीच किंचित हसले, ते हसण फार निराळ वाटलं. आणि मग स्वतःशीच बोलल्याप्रमाणे बोलले,

"पण हे वाटणं फार वेळ टिकत नाही. तुमच्या सारखे लोक येतात. हे जे काही उभं आहे त्याकडे पाहून भारावून जातात, त्यांच्या डोळ्यात ज्योती पेटलेल्या दिसतात. मग दिल्लीश्वरासही माझी आठवण होते. ते मला बोलावून घेतात. पाठीवर शाबासकी देतात. मग वाटतं आपली ही वास्तू आडरानात असेल पण ती जिवंत आहे. तिच्यात चैतन्य आहे. या देशातील हजारो खेड्यात ज्ञानाचे नंदादीप सतत तेवत ठेवले पाहिजेत. असाच एक छोटा दीप मी तेवत ठेवला आहे. त्याची ज्योत लहान असेल पण ती ज्योत सतत जळत ठेवण्याची गरज आहे. ही तेवती ज्योत माझ्या हातात आहे ही भावना झाली की मग निराशा कुठल्या कुठे पळून जाते. मला फार बरं वाटतं आणि नव्या उत्साहाने मी कामाला लागतो!"

मी गुरुजींकडे पाहिलं. त्यांचा चेहरा अतिशय शांत, प्रसन्न दिसत होता. मला वाटलं हा गृहस्थ नुसता शाळा मास्तर नाही तर आजच्या विसाव्या शतकातील हा एक व्रतस्थ ऋषी आहे.

□ □ □

# दोन अध्यक्षांबरोबर

## मेजर-चमनलाल दत्ता

जनरल चौधरींना बढती मिळाली, त्याआधी थोडे दिवस राष्ट्रपती ले. ज. कुमारमंगलम् सैन्यात किती लोकप्रिय आहेत याची चौकशी करीत होते.

त्याच दिवशी ' न्यू स्टेट्स्मन अँड नेशन 'चे संपादक किन्सली मार्टीन राष्ट्रपतींना भेटण्यासाठी आले होते. त्यांनी राष्ट्रपतींना १९५३ मधली नेहरूंशी झालेल्या मार्टीनसाहेबांच्या मुलाखतीची आठवण सांगितली. बी. बी. सी. च्या ' लंडन फोरम 'साठी ही मुलाखत घेण्यात आली होती. त्यांनी नेहरूंना चीनच्या सरहद्दीवरील वाढत्या धोक्याविषयी पृच्छा केली होती. चीनला घरी एवढे प्रश्न आहेत की आमच्याकडे नजर फिरविण्यासाठी चीनला वेळच नाही असे नेहरूंनी मार्टीन यांना सांगितले. आणि त्याशिवाय भारताचे चीनशी घनिष्ट मैत्रीचे संबंध आहेत असेही सांगितले. त्यामुळे चीनी आक्रमण अशक्य आहे असे नेहरू म्हणाले.

ही आठवण सांगून मार्टीन यांनी मे. दत्ता यांना विचारले, ' एकपक्षी युद्धबंदी जाहीर करून चीनने आता सैन्यही मागे काढून घेतले आहे. भारतीय लष्कर त्यांचा पाठलाग करून त्यांना पार हाकलून लावेल काय ? तुम्ही काय करणार आहात आता ?'

**पुस्तक परिचय**
**भाग दुसरा**

---

**बाबूमिया**

दत्तांनी मार्टीनना प्रतिप्रश्न विचारला, 'पण तुम्ही ह्या ठिकाणी असता तर तुम्ही काय केले असते ?'

मार्टीन म्हणाले, 'मी त्यांचा पाठलाग करणार नाही !'

हा विवाद्य मुद्दा होता.

चीनने काहीही म्हटले तरी भारताने युद्धबंदी स्वीकारू नये या मताचे काही दिल्लीचे लष्करी अधिकारी व अमेरिकन लष्करी मिशनचे मुख्य जनरल अडम्स होते. परदेशीय युद्धतज्ज्ञांचेही तसेच मत होते. चिनी सैन्याचा पाठलाग करून त्यांच्याशी झुंजले पाहिजे अशी त्यांची विचारसरणी होती.

त्यामागील त्यांची कारणे पुढीलप्रमाणे :

१. थंडीची सुरवात झाली होती. चिन्यांची संदेशदळणवळण वाहुक रेषा भलतीच लांब होती.

२. पश्चिम युरोप व अमेरिका यांच्याकडून शस्त्रसंभार आपण घेतलेलाच आहे. आपल्या भूदलास 'कव्हर' म्हणून अमेरिकन हवाई दलाने आश्वासन दिलेले होते. मग झुंजण्यास कोणती हरकत होती ?

३. आशियातील छोट्या मोठ्या राष्ट्रांचे पुढारीत्व भारताकडे होते. भारत चीनसमोर हारले तर त्यांचा आपल्यावरील विश्वास पार निघून जाईल व ते भविष्यात राजकीय घटनांसाठी चीनकडे बघू लागतील.

४. चीनने आपला बराचसा मुलुख लाटला होता. तो या युद्धाद्वारा अनायासे आपण परत मिळवू शकलो असतो.

५. नेहरू या युद्धातील मारामुळे राजकीय क्षेत्रात उंची गमावून बसले होते. हे युद्ध पुढे रेटून जय मिळाला असता तर नेहरूंना आफ्रिका व आशिया येथे मानाचे स्थान पुन्हा प्राप्त झाले असते.

६. चीन व रशिया यांच्यात वैमनस्य वाढत होते. त्या दृष्टिने नेहरूंना मॉस्कोस चिनी स्वारीबाबत समजावता आले असते. रशियास पाहुण्याकडून साप मारवून घेणे उलट पथ्यावर पडले असते ! कदाचित त्याने गुप्तपणे मदतही केली असती. (महायुद्धावेळी दोस्त राष्ट्रांना रशियाने अशीच गुप्त मदत करून हिटलरला वाकविला होता !

७. युद्धामुळे, समजा, पुढे वाटाघाटीची वेळ आली असती तर भारत बलवान ठरून 'डिक्टेटिंग टर्म्स'च्या स्थितीत असता.

८. नेहरूंचेच शब्द वापरायचे झाल्यास भविष्यातील कोणत्याही युद्धासाठी आपण जास्त तयार झालो असतो, सज्ज राहिलो असतो.

मेजर दत्ता यांचे हे निरीक्षण अगदी खरे आहे. त्यावेळच्या संरक्षण मंत्र्यांच्या चिटणीसांनी मला नंतर सांगितले होते, 'अरेरे, देवाने आपल्याला दिलेली उत्कृष्ट

संधी आपण घालविली, कमसे कम राष्ट्रीय शिस्त तर देशास शिकविण्यास मिळाली असती !'

मेजर दत्ता राष्ट्रपतींच्या तेजपुरच्या भेटीविषयी लिहितात :

## 'ही भेट गुप्त होती'

युखारीस्ट काँग्रेसच्या आधी मी राष्ट्रपतींना भेटलो होतो त्यावेळी त्यांनी मला या तेजपूरच्या भेटीचा दुःखद तपशीलवार सांगितला होता. मेजर दत्तांचे हे वर्णन व मी राष्ट्रपतींच्या तोंडून ऐकलेले वर्णन खूपच जुळते – आज राष्ट्रपतींनी नेहरू-राधाकृष्णन् संबंधाविषयी काहीही (नकारात्मक) जाहीर केले तरी.

चिन्यांची गढवाल तुकडीशी मोठी भयंकर लढाई झाली. चिन्यांनी त्यानंतर तावांग जिंकून घेतले. त्यानंतर राष्ट्रपती तेजपूरला हेलीकॉप्टरने गेले. आठ नोव्हेंबर रोजी सकाळी हेलीकॉप्टरने राष्ट्रपती तेजपूरहून दारांग झांग येथे पोचले. सारा हाहाःकार त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी अवलोकन केला.

तेथे त्यांना जनरल कौल व पठाणीया भेटले. राष्ट्रपतींनी पठाणीयांना विचारले, "आता चिनी काय करतील असे तुम्हास वाटते ?"

"चिनी पो शींगा लापासून बोमडीला येथे थडकतील व दारांग झाँग व बोमडीला यांच्या मध्ये अडथळा आणतील –" पठाणीयांनी राष्ट्रपतींना सांगितले.

तेजपूर येथे राष्ट्रपतींनी सरकारवर कडक टीका केली : "भारताची ही अशी स्थिती का झाली ? सरकारची अंधश्रद्धा व निष्काळजी यांच्यामुळे भारताची ही अशी स्थिती झाली आहे."

त्यावेळी सैन्याचे मनोधैर्य पार खचले होते. त्यांना समजवून सांगणेही अशक्य होते ? त्यांना का काही समजत नव्हते ?

मात्र आपल्यात अशा वेळी राष्ट्रपती आज हजर आहेत हे पाहून त्यांना बराच धीर आला.

राष्ट्रपतींची तेजपूर भेट गुप्त राखण्याचा आम्हास हुकूम आला होता असे मेजर दत्ता सांगतात. ती भेट गुप्त ठेवण्याची सर्व कोशीश करूनदेखील चिनच्या कानी ह्या भेटीचे वृत्त गेलेच असेही ते कबूल करतात. "आम्ही ज्या दिवशी दिल्लीस परत फिरलो त्याच दिवशीच्या रात्रीच्या रेडियो पीकींगच्या बातमीपत्रांत राष्ट्रपतींच्या भेटीचा चीनने उल्लेख केला होता."

मेजर दत्तांनी हा मुद्दा चांगला मांडला आहे. सरकार कदाचित याच्याशी सहमत होणार नाही. मागे दंगलींच्या वेळी रेडियो पाकिस्तान दंगली आता कोठे होणार याची आगाऊ माहिती देई व शंभरातून पंचाहत्तर वेळा ही बातमी खरी ठरे. हे माझे निरीक्षण मी डे. प्राईम मिनिस्टरना सांगीत होतो. तेव्हा त्यांना ते खोटे वाटले. ह्या "खोटचा वाटण्या"स ट्रीटमेंट काहीच नाही. आमच्या झोपाळुपणाच्या प्राचीन रोगावर प्रत्यक्ष धन्वंतरी उतरला तरी काय होणार ?

पठाणीयांचा कयास बरोबर ठरला !

त्यांनी सांगितल्याप्रमाणे १६ नोव्हेंबर रोजी चिनी बोमडीलाच्या दिशेने आगेकूच झाले. १७ व १८ नोव्हेंबर रोजी आपल्या ४८ व्या ब्रिगेडवर त्यांनी हल्ला केला. बोमडीला आणि दारांग झांग यांच्या रस्त्यावर चिन्यांनी अडथळे उभे केले. बोमडीला येथे आपल्या सुरक्षित वाटणाऱ्या ठाण्यांवर त्यांनी जोरदार हल्ले केले. बोमडीलाच्या उत्तरेस कर्नल जयसिंग प्रतिकूल परिस्थिती असूनसुद्धा मोठ्या धैर्याने लढले. त्यावेळी जयसिंग लढलेच नाही, आपली ठाणी तशीच चिन्यांना 'बहाल केली' असा खोटाच आरोप त्यांच्यावर लादला गेला होता.

त्या वेळी राष्ट्रपतीभुवन देशोदेशीच्या पाव्हण्यांनी व अधिकाऱ्यांनी गजबजलेले राही·

बेनेडीक्टॉव्ह हा रुसी परराष्ट्रमंत्री व गालब्रेथ हे अमेरिकन राष्ट्रदूत राष्ट्रपतींना भेटले. प. जर्मनी, इजिप्त, इराण, बर्मा, ब्रिटन व सिलोन यांचेही राष्ट्रदूत त्या वेळी राष्ट्रपतींना भेटून गेले.

कृष्णमेनन यांनी एकच गीत आळवायचे नक्की केले होते, रशिया तटस्थ राहिला आहे. रशियाने साम्यवादी चीनला मदत केली नाही. मात्र भारतास रशियाने मदत दिली.

हा भाग खरा नाही.

रशियाने भारतास लष्करी मदत दिली म्हणजे काय केले? सहा मिग्–२१ इंटरसेप्टर्स रशियाने आपणास दिले.

पण त्यापैकी तीन तर 'मोडलेल्या अवस्थेत' समुद्रमार्गे भारताकडे येत होते–

'तास' या वृत्तसंस्थाद्वारे रशियाने आपली परराष्ट्रनीती विशद केली होती: भारत-रशिया मैत्रीचे त्या निवेदनात गीत आळविले होतेच. त्याशिवाय विश्वशांतीसाठी मॉस्को जीव टाकीत असल्याचा आविर्भाव आणून चीन व भारत यांच्यात शांततामय वाटाघाटी घडून याव्यात अशी इच्छा प्रदर्शित केली होती. थोडक्यात, मेननसाहेबांनी रशियास जे 'गुड कॉंडक्ट' सर्टिफिकेट देऊन टाकले होते ते एवढे खरे नव्हते.

रशियाच्या उलट पश्चिम युरोप, यु.के. व अमेरिका यांची नीती होती. अर्थात कारण उघड होते. चीन हा त्या सर्वांचा प्रच्छन्न शत्रू होता. (आज चीनने त्या तिघांपैकी दोघांना आपल्या बाजूस वळवून घेतले आहे लक्षात ठेवणे. त्याउलट आज रशिया व अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पश्चिमी राष्ट्रे भारतविरोधी बनली आहेत !)

भारत पश्चिमेस का वळला ?

चीन छातीवर बसलेला व रशिया तर आश्वासनांशिवाय दुसरी मदत करीत

नाही ! राहता राहिली पश्चिम !

अमेरिकेचे जनरल पॉल ॲडम्स् व ब्रिटीश जनरल हल यांच्या नेतृत्वाखाली भारताकडे लष्करी मिशने ताबडतोब रवाना झाली.

अमेरिकेने ७·६२ मिलीमीटर्सच्या बोअरच्या रायफली जपानातून धाडल्या.

## पाकिस्तानचे धोरण

२५ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपतीभुवनात एक सत्कार समारंभ होता. पाकिस्थानी हाय कमिशनर आया हिलाली विदेश खात्याच्या एका भारतीय अधिकाऱ्यास म्हणाला, "भारतास जो शस्त्रांचा पुरवठा होत आहे तो तर पहा ! तुम्ही लोक तर एवढ्याचे केवढे करीत आहात ? ही मोठी गंमत आहे ? ही शस्त्रे तुम्ही नक्की पाकिस्थानाविरुद्ध वापरणार–"

'पाकिस्तानाने भारतास मदत तर केली नाहीच. उलट तुर्कस्तानास असे समजावले की भारतास मदत करण्यासाठी जी लष्करी अमेरिकन नाटोची विमाने भारताकडे चालली आहेत त्यांना तुर्कस्तानाने कोणच्याही प्रकारचे हवाई सहाय्य दिले न पाहिजे ! तुर्कस्तानाने हा सल्ला मानला ! म्हणून अमेरिकेस पॅसिफिक-मध्ये असलेल्या हाँगकाँगच्या शस्त्रसंभारातून (store) कलकत्ताद्वारा ही शस्त्रास्त्रे धाडण्याची पाळी आली !'

"डमडम येथे तीन सी–१३० विमाने थडकली. त्यांतील एक सार्जंट खाली उतरला. त्याने आणलेल्या शस्त्रांचे स्वागत करण्यासाठी विमानतळावर ही मोठी हिंदी लष्करी अधिकाऱ्यांची पलटण हजर होती. त्यास पाहून त्या सार्जंटने उद्‌गार काढले, ' बाप रे, आणीबाणीचा प्रसंग या इथे दिसतो आहे, सरहद्दीवर नाही !"

अमेरिकन व ब्रिटीश लष्करी अधिकारी बहुधा राष्ट्रपतीभुवनात राहत. आपले अधिकारी व ते तेथील कॅबेनेट रुममध्ये भेटत व चर्चा करीत. मोतीसागर हे

सरदारगृह

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय

हीरक-महोत्सवानिमित्त विविध सुखसोयी

अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह

सरदारगृह प्रा. लि.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

मंगलकार्ये व मेजवान्यांची उत्तम व्यवस्था

त्यावेळी चीफ ऑफ जनरल स्टाफ होते. आक्रमकांसमोर लढायचे कसे याचा व्यूह नक्की करण्याचे श्रेय त्यांना जाते. भारताने शस्त्रांची जी मागणी केली होती ती दोन्ही मिशन्सना फार मोठी वाटली. त्याचबरोबर ह्या दोघांनी पाकिस्तानबरोबर भारताने काश्मीरचा प्रश्न सलोख्याने मिटवून टाकावा–तिबेट सामोपचाराने दिला ना तसाच काश्मीर द्या–असा राजकीय दाब आणण्याचा खूप प्रयत्न केला. त्यांचे म्हणणे चीनचा धोका दोघांनाही आहे. त्यामुळे चीनसमोर दोघांनी एक संयुक्त आघाडी उघडावी व ह्या आघाडीने हिमालयात चिन्यांशी संयुक्तपणे सामना द्यावा. काही परकीय लष्करी तज्ञांनी पूर्व बंगाल भारताने घ्यावा व काश्मीर पाकिस्तानला द्यावे असाही एक पर्याय सुचवून पाहिला. अमेरिकन मिशनबरोबर १४ नोव्हेंबर रोजी व ब्रिटीश मिशनबरोबर २७ नोव्हेंबर रोजी भारतीय लष्करी अधिकाऱ्यांचा समझौता झाला. ,ऑस्ट्रेलिया, कॅनडा, फ्रान्स, इटाली, मलेशिया, न्यूझीलंड आणि पश्चिम जर्मनी या राष्ट्रांनी याशिवाय शस्त्रे, सामुग्री व कपडे धाडून भारतीय सेनेस चीनसमोर सुसज्ज बनविले.

ही साधनसामुग्री चीनच्या हल्ल्यानंतर झाली. त्याआधी काय घडले ?

२० ऑक्टोबर रोजी नाकांचू नदीवर चिन्यांनी भारतीय ठाणी काबीज केली त्यावेळची राष्ट्रपतींची मन:स्थिती जाणून घेण्यासारखी आहे.

चिन्यांनी नाकांचू नदीवर दाखल होऊन राजपूत व गुरखा रायफल्स् या दोन तुकड्यांना घेरून घेतले. या नदीवरील दुसरा व तिसरा पूल चिन्यांनी काबीज केला व ब्रिगेडियर दळवींचा साफ पराभव केला.

'राष्ट्रपतींनी मला बोलावले व राष्ट्रपतीभवनातील टेलिप्रिंटरवर सारखी नजर ठेवण्यास फर्माविले. शत्रूच्या हल्ल्याची प्रत्येक ताजी बातमी मी त्यांना सांगितली पाहिजे असा त्यांचा हुकूम होता. 'लढाखमध्ये ढोला ठाण्यावर सारे शांत होते; मात्र अधूनमधून गोळीबार होई, असा टेलिप्रिंटरचा संदेश मी राष्ट्रपतींना पोचविला एवढ्यात टेलिप्रिंटरवर फ्लॅश झाला की महत्त्वाची युद्धाची बातमी येत आहे. मी टेलिप्रिंटरपाशी अधीरतेने उभा राहिलो, 'मेजर चमनलाल दत्ता लिहितात,' अर्ध्या तासाने संदेश आला, 'चीनच्या सरहद्दीवरील सैन्याने फार मोठ्या प्रमाणावर नेफा व लडाख या विभागात हल्ला चढविला आहे. भारतीय लष्कर सर्वत्र पीछेहाट स्वीकारीत आहे.'

## हे वृत्त मध्यरात्री आले

त्या रात्री राष्ट्रपती व त्यांचा सारा स्टाफ कोणीही झोपी गेले नव्हते. झोप कशी येणार ?

दुसऱ्या दिवशी नेहरू राष्ट्रपतींना भेटावयास आले होते. त्यांच्या मागोमाग उपराष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन, स्वर्णसिंग व लालबहादूरशास्त्री राष्ट्रपतीभुवनात आले. चीफ ऑफ स्टाफ जनरल थापर विमानमार्गे नेफा येथे गेले होते. राष्ट्रपती-

भवनात त्यावेळी राज्यपाल संमेलन भरणार होते. आता ते भरणे शक्यच नव्हते.

प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विषाद लिहिलेला होता. नेहरू तर जणू एका रात्रीतच म्हातारे झाले. भारतीय लष्करास काय झाले? आघाडीवरून येणारी प्रत्येक बातमी चिंताजनक असे. २३ ऑक्टोबर रोजी नेफाहून राष्ट्रपती परत फिरले. त्यांनी दिलेला अहवाल असाच निराशेने भरलेला होता.

दत्ता लिहितात की राष्ट्रपतींना या चीनी हल्ल्याचा वास आधीच आला होता. राष्ट्रपतीभवनात ही बातमी सर्वांना ठाऊक होती. जुन्या दिल्लीत आझाद पार्कमध्ये युनायटेड चेंबर ऑफ ट्रेडर्स असोसिएशन या संस्थेच्या बैठकीत राष्ट्रपतींनी जाहीर केले होते की आठ सप्टेंबर १९६२ च्या आधी जी परिस्थिती होती ती कायम ठेवण्याच्या अटीवर भारत चीनशी वाटाघाटी करण्यास तयार आहे. राष्ट्रपतींनी या विधानाचे सविस्तर स्पष्टीकरण केले नव्हते. ते मोटारीत बसणार एवढ्यात त्यांना कोणी विचारले, 'ही सूचना वास्तव आहे. खरं ना?'

खरं म्हणजे पंडितजींना विचारल्याशिवाय अशी महत्त्वाची सूचना राष्ट्रपतींनी करावयाचे हे धाडस जरा विचार करण्यासारखे होते. कारण यात एका मोठ्या धोरणाचा समावेश झालेला आढळतो : श्रेष्ठ कोण? नेहरू का राधाकृष्णन्?

राष्ट्रपतींनाही या प्रमादाची जाणीव झाली असावी. कारण ते सारखे पं. नेहरूंची प्रतिक्रीया समजली काय याची पृच्छा करीत होते.

२२ ऑक्टोबर रोजी नेहरूंनी या सूचनेस ऑल इंडिया रेडियोवरून पाठिंबा दिला. मात्र पेकींगने ती सूचना फेटाळून लावली. चिनी आक्रमणानंतर एकदाही राष्ट्रपतींनी या सूचनेसंबंधी जाहीर भाष्य केले नाही. २६ ऑक्टोबर रोजी आणी-बाणीचा समय जाहीर करण्यात आला.

दत्तांचे म्हणणे असे की राष्ट्रपतींना भारतीय राजकारणात स्वतंत्र धोरण आखण्याची फार मोठी महत्वाकांक्षा होती. डॉ. राधाकृष्णन् स्वत:साठी राजकीय प्रतिमा उभी करण्यामागे होते. राजकीय नीतीबाबत जाहीरपणे ते स्वत:स जे सत्य वाटेल ते मांडीत होते आणि खाजगी वर्तुळात आपल्या मतास पाठिंबा देणाऱ्यांची साथ ते शोधीत होते. नेहरूंच्या मतांपेक्षा त्यांची मते वेगळी होती. आम्हा स्टाफवाल्यांना स्पष्ट दिसू लागले होते की नेहरू व राधाकृष्णन् यांचे बनत नव्हते. दोघांच्यात घर्षण उत्पन्न झाले होते. अगोदर दोघात स्नेहभाव होता तो आता पार ओसरला होता. शिल्लक होता तो फक्त शिष्टाचार.

खाजगी गप्पागोष्टी करताना डॉ. राधाकृष्णन् सरकारवर खूप टीका करीत, विशेषत: राष्ट्रीय प्रश्न हाताळताना सरकारच्या धोरणावर. ते रशियात राजदूत असतांना आणि नंतर उपराष्ट्रपती असताना प्रधानमंत्र्यांना आपण वेळोवेळी देशावर आलेल्या संकटांची सूचना देत होतो ही गोष्ट ते पुन्हा पुन्हा सांगत. डॉ. राधाकृष्णन् यांनी पंडितजींना एकदा बजावले होते की लक्षात ठेवा, तुम्ही शेख

अबदुल्लांना पाठिंबा देत आहात ! शेख अबदुल्लास काश्मीरच्या राजकारणातून दूर करा, हाफीझ महमद इब्राहीम यास काश्मीरचा सदर-इ-रियासत बनवा व सदर-इ-रियासत युवराज करणसिंग यांना काश्मीरचे मुख्य मंत्री बनवा असा सल्ला राष्ट्रपतींनी नेहरूंना दिला होता. काश्मिरी मुसलमान प्रजेस त्यांचा आवडता शेख अबदुल्ला केंद्रीय मंत्री आहेत हे पाहून कोण आनंद झाला असता ? काश्मीरची खरी सूत्रे नेहरूंचे विश्वासू करणसिंग यांच्या हाती गेली असती. त्यामुळे भारताचाही फार मोठा फायदा झाला असता.

डॉ. राधाकृष्णन् म्हणत, 'आता परीणाम पहा, शेख अबदुल्लास एवढे लाडावून ठेवले आहे. त्यामुळे सरकारला अबदुल्लास सुधारणे अशक्य होऊन बसले ! आणि आता त्यास फार उशीर झाला आहे !'

## नेहरू-राधाकृष्णन् संबंध

१९४८ साली युद्धबंदी स्वीकारण्याबद्दल व काश्मीरच्या राजकारणाचा खेळखंडोबा करण्याबद्दल डॉ. राधाकृष्णन् नेहरूंनाच जबाबदार धरतात. नेहरूंना जग काय म्हणेल याची फार चिंता लागून राहिली होती. मात्र स्वतःच्या देशाची ती चिंता वहाण्यात नेहरूंनी उपेक्षाच केली.

राष्ट्रपती व प्रधान मंत्री यांच्यातील घर्षण रोजच्या रोज वाढत होते. त्यांच्यामधील सौजन्य पार घटत चालले होते. एकदा राष्ट्रपतीभवनातील एका 'अॅट होम' मध्ये नेहरू उशीरा आल्यावर डॉ. राधाकृष्णन् यांनी लगेच घड्याळाकडे बघितले. पूर्वी राजकीय प्रश्नांवर किंवा समस्यांवर दोघांचे थोडेफार एकमत असे. तेही हळूहळू दूर जाऊ लागले. शेवटी १९६२ च्या शेवटच्या काही महिन्यात चिनी आक्रमणाच्या काळात दोघातील अंतर कधीच दूर होणार नाही असे दिसू लागले.

एका 'अॅट होम' पार्टीच्या वेळी राष्ट्रपती जायची तयारी करीत होते. राष्ट्रपती जायच्या आधी प्रधान मंत्र्यांनी त्यांना निरोप देण्याची राष्ट्रभवनाची प्रथा आहे. तेथील हिरवळीवर प्रधान मंत्री इतरांशी गप्पा मारीत होते. मेजर दत्ता नेहरूंजवळ गेले व त्यांना म्हणाले, "साहेब, राष्ट्रपती उठून चालले आहेत."

हिंदू आपला शब्द पाळीत नाहीत असा केवळ मुसलमानांचाच नाही, इतरांचाही समज दिसतो. जगात भारताचे हसे त्यामुळे होते. कोणाही अमेरिकन वा युरोपियन लेखकाचे भारताविषयी पुस्तक वाचा, त्यात भारतीय माणसास integrity नसते, असा पूर्वग्रह हमखास आढळतो. मेजर दत्ता यांचे याविषयी काय मत आहे ते त्यांच्याच शब्दात पुढे वाचा :

"राष्ट्रपतींना अमेरिकन राजदूत गॉलब्रेथ जवळजवळ रोज भेटत. पंधरा नोव्हेंबर रोजी ते राष्ट्रपतीभवनात अचानक साडेअकरा वाजता रात्रौ आले. प्रोटोकॉलचे सारे नियम त्यांनी धुडकावून लावले. राष्ट्रपतींना ते त्यांच्या अभ्यासिकेत भेटले. खोलीत शिरल्यावर गॉलब्रेथ म्हणाले, 'तुमच्या बाजूस आयूब हा

सर्वात चांगला पुढारी आहे !" काश्मीरच्या राजकारणात पाकिस्तान व भारत यांनी सहकार्य करावे व सहमत व्हावे अशी सूचना घेऊन गॉलब्रेथ आले होते व मध्यरात्रीपर्यंत राष्ट्रपतींशी चर्चा करीत बसले होते. आयूबला नेहरुंना त्रास द्यायची जराही इच्छा नाही पण त्याच्या प्रजाजनांनी, विशेषत: आझाद काश्मिरी जनतेने त्याच्यावर राजकीय दाब आणला आहे की काहीही करून पाकिस्तानने भारतावर स्वारी करावी अशी आयूबची वकिली गॉलब्रेथ करीत होते. पुढे प्रेसिडेंट केनेडीस लिहिलेल्या पत्रात आयूबखानांनी आपण काश्मीरच्या खोऱ्यावर स्वारी करून जाणार आहोत याची कबुली दिलेली आढळते. आयूबने लिहिले होते की भारताने तेथून एक डिव्हीजन जरी काढल्याचे दाखविले तरी प्रत्यक्षात ती डिव्हीजन पंजाबात भारताने हटविली होती. थोडक्यात सत्ता-तुला जशीच्या तशीच राहिली होती ! आयूबने पत्रात लिहिले होते की भारताशी व्यवहार करताना हे लक्षात असू द्या की भारताचा आश्वासनांचा भंग करण्याचा जुना व प्रदीर्घ इतिहास आहे !

" चिन्यांनी भारतीयांना हाग्या मार दिल्यावर पाकिस्तानीयांसाठी भारतापासून काश्मीर हिरावून घेण्यासाठी सुवर्णसंधी आली होती. पाकिस्तानने असे करू नये म्हणून भारत-पाक वाटाघाटी ठरविण्याची जबाबदारी काही राष्ट्रांनी आपल्या शीरावर घेतली. स्वर्णसिंग व भुट्टो यांच्यात त्यानुसार वाटाघाटींच्या चार बैठकी घडल्यादेखील. तोपर्यंत "काश्मीर ही समस्याच नाही," अशी आपली भूमिका होती. पण आता ही भूमिका आपण बदलत होतो, त्या समस्येची चर्चा करण्यास आपण तयार होतो ! रशियाने यूनोत व यूनोबाहेर इतके दिवस आपणास काश्मीरच्या आपल्या भूमिकेस पाठिंबा दिला होता. आपण भूमिका बदलली हे पहाताच रशिया सावध झाला ! बेनेकिडॉव्ह आता राष्ट्रपतींना वरच्यावर भेटू लागले. एका प्रसंगी त्यांनी राष्ट्रपतींना सुनावले, 'आमच्या धोरणाचा आम्हास पुनर्विचार करावा लागेल—विशेषत: काश्मीरविषयक राजनीतीचा. आपण पाकिस्तानशी काश्मीरविषयक चर्चा सुरू करणार आहात हे चांगले नाही.'

रशियास भारत वाटाघाटीत कच्चा आहे, तो नेहमी गमावून बसतो, कमावीत काही नाही याची खात्री असावी.

किंवा ही पश्चिमी राष्ट्रांनी दिलेल्या शस्त्रांची "किंमत" आहे असे त्यांना वाटत असावे.

आणि असे वाटले तर त्यात चूक काय आहे ?

## जनरल आणि नॉलेज

मेजर दत्ता लष्करी अधिकारी असूनही लष्करी बड्या मंडळींची टिंगल करण्यास मागेपुढे पहात नाहीत. दत्ताजींनी लष्करी अधिकाऱ्यांच्या सांगितलेल्या गोष्टी मनोरंजक व विनोदी आहेत.

राष्ट्रपतीभवनात उत्कृष्ट पेंटिंग्ज् लावलेली आहेत. इंग्लंडची राणी राष्ट्रपतींची पाव्हणी होती. तिला ती पेंटिंग्ज् फार आवडली. तिच्या शेजारी एक भारतीय जनरल उभा होता. त्यास राणी म्हणाली, 'काय सुंदर आहेत ही पेंटिंग्ज्.'

'खरंच–'

'तुम्ही मोना लीसा पाहिले आहे का?'

हा जनरल 'जनरल' होता पण 'नॉलेज्'च्या दृष्टीने शून्य होता. त्याने मोना लीसा हे नाव कधी ऐकले नव्हते. कोणी काहीतरी पुटपुटले. जनरलसाहेबांनी 'लेडी' एवढाच शब्द ऐकला. लगेच त्यांनी राणीला सुनावले, 'हो हो, ती फारच सुंदर लेडी होती, राणीसरकार मी तिचे बरेच खेळ पाहिले आहेत!'

मिस्कीलपणे दत्ता लिहून जातात, 'The Queen was photographed immediately after this, and the picture which resulted was I believe one of the best taken of her.'

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांच्या पत्नी व दुसरे एक जनरल यांचीही अशीच मजेदार गोष्ट दत्तांनी सांगितली.

मे १८, १९६१ रोजी सौ. जॉन्सन (लेडी बर्ड) दिल्लीत एका दिवसासाठी उतरल्या होत्या. त्यांच्याजवळ वेळ फारच अपुरा होता. त्यामुळे त्यांच्याजवळ भरगच्च कार्यक्रमांची गर्दी झाली होती. त्यात राष्ट्रपतींच्या नातू व नाती यांची ओळख व्हावी असा हट्ट धरला गेला. यांची एकंदर संख्या अकरा! वये चौदा ते एकवीस या दरम्यान. ही फैय्यर एकदाची सौ. जॉनसमोर आणली गेली. पण बेटा एक देखील हसेना का बोलेना! सौ. जॉन्सन काय रडणार?

तेथील एका एडीसीने शेवटी शांतताभग केला व विचारले, 'मिसेस् जॉन्सन्, कमांडर ॲलन शेफर्ड अवकाशातून एक लूप मारून आला तो दिवस तुमचा मोठा भाग्याचा असेल, नाही का?'

लगेच सौ. जॉन्सन् खुलल्या. युरी गागारीन भारतात येऊन गेला आहे ते त्यांना ठाऊक होते. मोठ्या अभिमानाने त्यांनी कमांडर शेफर्डविषयी माहिती त्या एडीसीस सांगितली.

जवळच एक जनरलसाहेब उभे होते. ते काही बोलतील या भीतीने त्यांची बायको त्यांची पँट खेचून डोळ्याने खुणावू लागली की आपण आता चूप बसावे! पण जनरलला सौ. जॉन्सनशी 'बोलून घ्यायचा मोह' आवरेना. एडीसीने सौ. जॉन्सनला 'लूप' का काहीतरी सांगितल्याचे त्यांच्या लक्षात होते. त्यावेळी 'लूप'च्या जाहीरातीची नुकतीच सुरवात झाली होती. भारताच्या लोकसंख्येची समस्या सर्वत्र चर्चिली जात होतीच.

'हां, मिसेस् जॉन्सन्, मला वाटते, त्याचा प्रयोग अमेरिकेत भलताच यशस्वी झाला आहे!'

'कर्नल, काय म्हणालात आपण?' सौ. जॉन्सननी त्यांना विचारले. त्यांना जनरल कशाविषयी म्हणत आहेत ते कळलेच नाही.

अध्यक्ष जॉन्सनने बायकोची चूक सुधारली, 'कर्नल नाही, जनरल–'

अमेरिकेत अध्यक्षाच्या आजूबाजूस सारे कर्नल्स् असतात.

सौ. अध्यक्षांनी पुन्हा विचारले, 'माफ करा, आपण काय विचारलेत, जनरल?'

जनरलसाहेबांच्या बायकोचा चेहरा गोरामोरा झाला. त्यांना वाटले की आपले पतिदेव आता बाँबस्फोट करणार?

झाले तसेच.

जनरलसाहेब म्हणाले, "मी म्हणालो की अमेरिकेत आता तो भलताच लोकप्रिय झाला आहे व आता अमेरिकेची लोकसंख्या घटत आहे.'

त्यानंतर संभाषण होणे अशक्य होते.

अध्यक्ष व सौ. अध्यक्ष अवघडलेल्या मन:स्थितीत तेथून उठले व शयनगृही निघाले.

मेजर दत्ता स्त्रीमनाचे व स्त्रीशरीराचे (चेहेऱ्याचे?) उत्तम निरीक्षक असावेत. सौ. केनेडींविषयी ते लिहितात, 'त्यांचा चेहेरा त्रिकोणी होता. आणि दोन डोळ्यांच्यामधील अंतर फारच लांब होते. भारतीय स्त्रीपेक्षा त्या उंच वाटल्या. त्यांचे शरीर खेळाडूप्रमाणे लवचिक होते. मात्र त्यांच्यातील स्त्रीत्व अत्यंत मोहक होते– विशेषत: त्यांनी एकदा बोलायला सुरूवात केली की, मृदु व खालच्या आवाजात त्या बोलत. आणखी हळू त्या बोलू लागल्या की जणू त्यांचा कंठ दाटून आला असे वाटे. त्यांचे बोलणे ऐकत असता असे वाटे की ही रमणी कोठल्याशा स्वप्नातून आपल्याशी बोलत आहे! खरोखर, सौ. केनेडी ही एक अत्यंत आकर्षक सुंदरी होती!'

इंग्लंडच्या राणीविषयी दत्तांनी जे लिहून ठेवले आहे ते मूळातूनच वाचले पाहिजे. दत्ता लिहितात, 'What we saw was quite different from her photographs. She was short, barely 5 foot 1 inch and skinny. The skin under her eyes was wrinkled, and her face was heavily made up whenever she appeared in public. In the lifts, she often glanced at herself in the mirror.'

## 'ड्यूक'चे आकर्षण!

मोठ्या माणसांच्या स्वभावातील बारीक छटा न्याहाळायची मला स्वत:ला फार हौस आहे. माणसाच्या मनाचा अभ्यास केला तर आपल्याला जगणे सुसह्य

होते असा माझा अनुभव आहे. दत्तांना हाच नाद असावा असे त्यांच्या लेखनावरून वाटते.

इंग्लंडची राणी व फिलिप्स ह्यांना कोठल्याशा समारंभास जायचे होते. फिलीप्स् पोलो खेळत बसला. बिचारी राणी! दोन दोन मिनिटांनी मनगटी घड्याळाकडे बघे व चरफडे, ' ह्यांचे हे असेच आहे. नेहमीच उशीर लागतो त्यांना –' शेवटी राणी एकटीच समारंभासाठी जायला निघाली. ती गाडीत बसणार एवढ्यात ड्यूक धावत धावत आले व एकदाचे दोघेजण समारंभास जायला निघाले.

ड्यूक राणीपेक्षा जास्त सुंदर व आकर्षक आहेत. त्यामुळे स्त्रीवर्गात व पुरुषवर्गात ते सारखेच हवेहवेसे वाटतात. २५ जानेवारी १९६१ रोजी राष्ट्रपतीभवनातील हिरवळीवर हे राजदांपत्य निरनिराळ्या पाव्हण्यांशी गप्पा मारीत होते. राणी एका दिशेने व ड्यूक दुसऱ्या. एवढ्यासाठी की सर्व लोकांशी बोलता यावे.

सुंदर पोशाख केलेली एक तरुणी ड्यूकची जणू वाटच पहात होती. ड्यूक सरळ तिच्यासमोर उभे राहिले व त्यांनी तिचे नाव विचारले. ती मोठी खूष झाली. एका दमात ती ड्यूकना म्हणाली, " राजेसाहेब, मी लहानपणापासून आपली ' फॅन ' आहे. पेपरात जेवढे जेवढे तुमचे फोटो येतात ते मी सारे गोळा करून ठेवते. मी तुम्हाला बरेच वेळा पत्रे लिहिली. पण तुम्ही एकासही उत्तर धाडले नाही. दोन वर्षापूर्वी तुम्ही आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदेसाठी आला होतात. पतियाळा येथे माझ्या बहिणीचे लग्न होते. म्हणून मी तुम्हास पाहू शकले नाही. आज माझा मोठा भाग्याचा दिवस आहे. "

दत्तांचे पुढील वर्णन वाचकांच्या फार काळ लक्षात राहील : " The woman paused for breath at this point. Before she could get started again. The Duke looked at her steadily and with all the charm at his command, took both her hands firmly in his, and said : " My dear beautiful young lady, how do you feel now ? "

एखादा गंभीर विषय सांगता सांगता दत्ता हळूच काही रहस्यभेद करतात व पुन्हा आपल्या विषयाकडे वळतात. त्यांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे :

## काही रहस्यभेद

१ : गागारीनची वागणूक, चालणे, बोलणे सारे वर्णन केल्यावर दत्ता लिहितात, मला सौ. केनेडींच्या एडीसींनी काय सांगितले ते आठवते आहे. युरी गागारीन हा काही पहिला अवकाशातील माणूस नव्हे! हा मान दुसऱ्या रशियन माणसास जातो. पण हा रशियन अजून पृथ्वीभोवती त्याच्या आकाशयानात बसून घिरट्या घालीत आहे. त्याच्या आकाशयानास पृथ्वीवर परत आणणे जमले नाही! सुप्रसिद्ध विमाने बांधणारा इल्युशियन त्याचा हा मुलगा होय !!

२ : सहा ऑक्टोबर १९६२ रोजी मेक्सिकोचे अध्यक्ष मॅटेओस राष्ट्रपतीभवनात

आले. यांची सारी टीमच्या टीम विनोदी होती ! पण या मेक्सिकोन्सना भारतीय अन्न आवडत नसे. हे लोक तक्रार करीत, त्यात पुरेसे तिखट (मिरच्या) नाही म्हणून ! त्यांच्या बाथरूममध्ये हे लोक मिसळ शिजविताना आम्ही त्यांना पकडले! त्यामुळे आम्हाला दुःख होई. हे प्रकरण कर्नल सिंग ह्या कंट्रोलरना आम्ही रिपोर्ट केले. त्याविरुद्ध त्यांनी काहीही केले नाही. ते म्हणाले, "If they don't like our food they can lump it."

हे वाचून मला कैरोतील आपल्या खोलीत बटाट्याची भाजी पकविणाऱ्या लाल बहादूर शास्त्र्यांची आठवण झाली. कैरोतील एडीसींना त्यावेळी लाल बहादूरांचा असाच राग आला असला पाहिजे. थोडक्यात, मानवी मन जगाच्या पाठीवर सर्वत्र सारखे हेच खरे.

३ : डॉ. राजेंद्रप्रसादांच्या वेळी राष्ट्रपती भवनातील अन्न तद्दून खराब असे अशी तक्रार दत्ता करतात. त्या वेळी एक केटरींग सुपरवायझर, सुमारे वीसावर आचारी, अद्ययावत् यांत्रिक साधनांनी—कुकिंग रेंज, फ्रीज वगैरे—ते स्वयंपाकघर वसविलेले होते तरीदेखील ! ते अन्न शेवटी इतके बेचव होऊ लागले की कंट्रोलरने शेवटी एका एडीसीला पकडले व त्याच्याकडे मेनू व जेवणातील इतर पदार्थ काय असावेत याची व्यवस्था सोपविली. आरमारातून आलेल्या या एडीसीने ही व्यवस्था हाती घेताच तावडतोब जेवणाचा दर्जा सुधारला. राष्ट्रपती भवनातील अन्न डॉ. राधाकृष्णन् यांच्या अमदानीत उत्कृष्ट होते...त्यांची सून, डॉ. गोपाल यांची पत्नी, हिला फार चांगले पाकशास्त्राचे ज्ञान होते. तिला घर सजविण्याच्या बाबतीत चांगली 'टेस्ट' होती. आल्याबरोबर धूळ आकर्षिणारी खादी बदलून टाकून त्या जागी तिने रेशमी पडदे लावले, खाली तळघरात काही उत्कृष्ट शोभेचे ग्लास पडले होते, त्यांची साफसुफी करून पुन्हा त्यांच्या मानाच्या जागेवर त्यांना ठेवण्यात आले. सौ. गोपाल यांनी भारतीय दृष्ट्या आवश्यक पण अद्ययावत् असे बदल राष्ट्रपती भवनात घडवून आणले...डॉ. राधाकृष्णन् यांचे सर्व गोष्टींवर बारीक लक्ष असे. ते अधून मधून निरनिराळ्या विभागांना अचानक भेट देत व एखादे वेळेस एखादा पंखा वा दिवा उगीचच जळत असल्यास त्यास जबाबदार असणाऱ्या नोकरास शिक्षा होई.

४. सहावे जॉर्ज राजे आपल्या एडीसींमध्ये भारतीय महाराजांना ठेवीत ! दुसऱ्या महायुद्धात युरोपियन आघाडीवर चर्चिलच्या तैनातीस तीन महाराज होते. या पार्टीबरोबर एकदा काही ब्रिटिश अधिकारीदेखील होते ! एका रात्री जेथे मुक्काम होता तेथे फक्त दोनच चांगल्या इमारतींची सोय होती. त्यावेळी राजेसाहेब, चर्चिल व इतर ब्रिटिश अधिकाऱ्यांची सोय ह्या इमारतीत लावण्यात आली. पण त्या तीन महाराजांना नोकरांच्या खोलीत कुडकुडत ती रात्र काढावी लागली !

राष्ट्रपतींच्या तैनातीस काही महाराज 'ऑनररी' एडीसी म्हणून दिले आहेत. पण सर्वांचेच रक्त भारतीय पडल्यामुळे हा विशेषाधीकार कधी वापरला जात नाही.

५. राष्ट्रपतीभवनात एका एडीसीची दादागिरी फार वाढली होती. तो मोठा उध्दट होता, वाटेल ती शिवीगाळ करीत असे, बायकांशो गैरवर्तन करी व मोठा मसाला टाकून इकडचे शब्द तिकडे पोचविण्याचा धंदा करी. जेव्हा हे कोणी सांगितले अशी चौकशी करण्याची पाळी येई, तेव्हा तो चक्क खोटे सांगे, मला ह्यातील काहीही ठाऊक नाही! परदेशी पाव्हण्यांच्या हास्याचा हा विषय झाला होता. बॉलरूम डान्सिंगची यास कोण खाज! पण यास काही नाचता यायचे नाही, त्याची पार्टनर त्याला अर्ध्यातून सोडून जाई.

थोडक्यात, राष्ट्रपतीभवनात जा का आणखी कोणच्या सरकारी कचेरीत जा, पळसाला पाने तीनच!

'दोन राष्टपतींबरोबर' या पुस्तकात आणखी मनोरंजक अशी खूपच माहिती आहे. पुढाऱ्यांचा स्वभाव व मनोविज्ञान कळून घेण्यासाठी ज्यांना त्यांच्या सूक्ष्म छटा अवलोकन करण्याचा नाद आहे त्यांना तर हे पुस्तक म्हणजे अशा माहितीची खाणच वाटेल.

'बिटवीन दि लाईन्स' नंतर ह्या पुस्तकाने आणखी एक निरोगी प्रथा सुरू होणार आहे. मोठ्या पुढाऱ्यांच्याजवळ राहणाऱ्या चिटणीस, आचारी, न्हावी वगैरे लोकांना मोठ्या मंडळींच्या बराचशा बारीक हालचालींचे सहज ज्ञान होऊ शकते. आजवर युरोप-अमेरिकेत अशा प्रकारची चरित्रे हे हाताखालचे लोक लिहीत व त्यांचा खप चिक्कार असे. ही प्रथा भारतात दत्ताजोंनीं सुरू केली आहे. नाही नाही म्हणत या मोठ्या मंडळींची लफडी त्यांनीं चक्क चव्हाट्यावर आणलीं आहेत.

हीं प्रथा आता बंद होणार नाही.

भारतीय पुढाऱ्यांनो, सावधान.

भविष्यात आम्ही अशा पुस्तकांचे जास्तजास्तच स्वागत करणार!

# समाप्त




लेखांक : चोवीस

रेनॉचे सरकार बोर्दो शहराच्या आसऱ्याला आले होते. पॅरिसमधून बाहेर पडणाऱ्या सरकारला आसरा देण्याची जबाबदारी फ्रान्सच्या नैऋत्य किनाऱ्यावरील हे बंदर

तिसऱ्यांदा पार पाडीत होते. १८७१ मध्ये जर्मन सेनेने पॅरिसमध्ये प्रवेश केला तेव्हा बोर्दो हीच फ्रान्सची हंगामी राजधानी झाली होती. १९१४ मध्येही फ्रेंच सरकारला याच शहराने निवारा दिला होता आणि १९४० मध्ये पुन्हा एकदा फ्रेंच सरकारचा सारा लवाजमा बोर्दोमध्ये येऊन दाखल झाला होता.

मागच्या दोन्ही वेळपेक्षा यावेळची परिस्थिती वेगळी आहे हे बोर्दो शहरास जाणवले होते. चौदा जूनला सरकार तिथे येऊन पोहोचले; परंतु तत्पूर्वी पॅरिसमधून पळालेले हजारो फ्रेंच नागरिक बोर्दोमध्ये एखाद्या जत्रेसारखे लोटले होते. या निर्वासितांचे भेदरलेले चेहरे पाहून बोर्दो शहराचे चैतन्य हरपले. पराभवाच्या काळपर छायांनी हे शहर झाकळून गेले होते. 'आम्हास निवारा हवाय', 'आम्हास खायला हवंय' अशी केविलवाणी याचना करणारे निर्वासित बोर्दोतील प्रत्येक उपाहारगृहाचा दरवाजा ठोठावत होते. जे अगोदर येऊन पोचले ते भाग्यवान ठरले. बोर्दो शहराने त्यांची तुटपुंजी का होईना पण थोडीशी सोय केली. मागाहून जे निर्वासित तेथे येऊन दाखल झाले त्यांना सार्वजनिक उद्यानातील बाकांवर रात्री काढाव्या लागत होत्या. तेथेही त्यांना निवांत झोप लागत नव्हती. मध्येच ते दचकून जागे होत होते. जर्मन सैन्य येथे येऊन तर पोचणार नाही ना, जर्मन विमानं आपला पाठलाग करीत येथे बॉंब वर्षाव करणार नाहीत ना या काळजीची वेडीवाकडी वलये प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर नाचत होती.

राष्ट्राध्यक्ष लेब्रन, प्रधानमंत्री रेनॉ, त्याचे इतर सहकारी आणि दोनदोनशेहून अधिक संसद सदस्य यांची सोय करता करता बोर्दो शहराची दमछाक झाली होती. रेनॉ बोर्दो येथे येऊन पोचला तेव्हा संध्याकाळचे साडेसहा वाजले होते. दिवसभराच्या प्रवासामुळे तो दमला होता. तरीही बोर्दोस येऊन पोचताच त्याने आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय सुरु केला. आपले बहुतेक सारे सहकारी भकास चेहरा करून बसलेले आहेत ही गोष्ट रेनॉला आवडली नाही. फ्रान्स ही लढाई हरलेला आहे ही वस्तुस्थिती त्याचे अंतर्मन नाकारू शकत नव्हते. आपले सैन्य कोठेच टिकाव धरू शकत नाही हा अनुभव त्याचे अंतःकरण कुरतडून टाकत होता. आपल्या देशाची प्रतिकारशक्ती हरपून जावी आणि ज्याने त्याने 'आपण उगाच हे युद्ध ओढवून घेतले' अशी संभावना करावी, ही गोष्ट या स्वाभिमानी प्रधानमंत्र्याच्या सत्वशील मनाला टोचत होती. फ्रेंच सैन्याच्या गेल्या दहा-पंधरा दिवसातील नामुष्कीमुळे स्वतः रेनॉही काहीसा हादरला होता. परंतु तरीही आपल्या सहकाऱ्यांची व सेनानींची लाचार वृत्ती त्यास सहन होत नव्हती. पॅरिस येथे त्यास तोच अनुभव आला होता. तूर्स येथे तेच घडले होते. आणि बोर्दोमधील परिस्थितीही वेगळी नव्हती आपले पायदळ शत्रू सैन्याचे तडाखे खाऊन बेजार झालेले असले तरी आपल्या नौदलाला अद्याप साध्या ओरखडा सुद्धा गेलेला नाही; त्यामुळे मोरोक्को ट्युनिशिया आणि अल्जेरिया या उत्तर आफ्रिकेतील आपल्या अंकित देशाच्या आश्रयाने आप-

त्याला युद्ध चालू ठेवता येईल असा रेनॉ यास विश्वास वाटत होता. शिवाय अमेरिका आताच युद्धात उतरलो तरी आतापर्यंतच्या अपयशाचे विजयात रूपांतर करता येईल असे त्याचे मन त्याला दिलासा देत होते.

आपले हृद्गत ज्याच्याशी बोलावे असा आपल्या मंत्रिमंडळामध्ये एकटा द गॉलच आहे हे रेनॉला माहित होते. त्यामुळे त्याने बोर्दो येथे पोहोचताच प्रथम द गॉलला बोलावून घेतले.

द गॉल रेनॉस म्हणाला, "गेले तीन दिवस शरणागतीशिवाय दुसरी कोणतीच भाषा ऐकू येत नाही. त्या भाषेचा मला अगदी उबग आला आहे. इतरांचं मत काहीही असो, जर्मनीविरुद्धचं युद्ध या अशा अवस्थेत थांबवायला माझा सक्त विरोध आहे. तुम्ही जर इथं आणखी काही दिवस राहिला तर तुम्हासही पराभवाच्या आणि शरणागतीच्या गर्जनांमध्ये बुडून जावं लागेल. म्हणून म्हणतो आपण ताबडतोब अल्जेरियाला जाऊ या. विचारात वेळ घालवण्याइतकी शत्रूनं आपल्यास सवड ठेवलेली नाही. जे काही ठरवायचे असेल ते लवकर ठरविलं पाहिजे."

"होय; मलाही तसच वाटतं" रेनॉच्या स्वरात निश्चय जाणवत आहे असे पाहून द गॉलला बरे वाटले. तो म्हणाला, "तसे असेल तर मी उद्याच लंडनला जाऊन फ्रेंच सरकार उत्तर आफ्रिकेमध्ये हलविण्यासाठी ब्रिटीश नौदलाचं सहाय्य मागतो. मी तिथून सारी व्यवस्था करतो. पुन्हा आपली भेट कुठं होणार आहे ?"

"अल्जेरियात आपण भेटणारच आहोत."

रेनॉचा निरोप घेऊन द गॉल लंडनला जायची तयारी करू लागला. आपले हे प्रयाण त्यास इतर मंत्र्यांपासून गुप्त ठेवणे भाग होते. त्या दिवशी रात्री द गॉल 'हॉटेल स्प्लेंडिड'मध्ये सहज गेला होता. तेथे त्याला मार्शल पेतॉं भेटला. द गॉलने पुढे जाऊन पेतॉंशी हस्तांदोलन केले. पण पेतॉं त्याच्याशी एक शब्द देखील बोलला नाही. मार्शल पेतॉं याचे हे वर्तन आत्मनिष्ठ द गॉलला आवडले नाही. हॉटेलमधून बाहेर पडताना तो स्वतःशी पुटपुटला– "या म्हाताऱ्यांचे जन्मात तोंड पहाणार नाही."

रेनॉ संध्याकाळी बोर्दो येथे येऊन पोचला असल्याची बातमी कळताच ब्रिटीश राजदूत सर रोनाल्ड कँपबेल आणि जनरल स्पीअर्स त्याला भेटायला गेले. स्पीअर्स म्हणाला, "फ्रान्सनं जर्मनीशी स्वतंत्रपणे तह करू नये असं चर्चिल यांनी तुम्हास कळवायला सांगितलं आहे."

खरे म्हणजे, चर्चिलचा हा आश्वासक निरोप कळल्यानंतर रेनॉचा चेहरा उजळून निघायला हवा होता. परंतु यावेळची परिस्थिती अगदी वेगळी होती. एका बाजूस युद्ध चालू ठेवण्याचा चर्चिलचा आग्रह आणि दुसऱ्या बाजुला युद्ध ताबडतोब थांबविण्याची सहकाऱ्यांची मागणी या कात्रीत रेनॉ सापडला होता. येत्या दोन दिवसांमध्ये आपले आपल्या सरकारचे आणि फ्रान्सचे भवितव्य निश्चित होणार आहे हे

रेनॉस बोर्दो येथे आल्यापासून कळून चुकले होते. उपप्रधानमंत्री पेताँ आणि सर-सेनानी वेगान्द यांच्याशी आपल्याला मुकाबला करायचा आहे आणि यावेळी बहुतेक सारे मंत्री, इतकेच काय पण राष्ट्राध्यक्ष लेब्रन देखील पेताँ-वेगान्द यांच्या बाजूने उभा राहील याचा रेनॉला अंदाज आलेला होता. त्यामुळेच कँपबेल आणि स्पीअर्स यांच्याशी बोलताना, रेनॉच्या मनश्चक्षूंसमोर निराळेच रंग तरळत होते.

दुसऱ्या दिवशी म्हणजे पंधरा जूनच्या दूपारी अडीच वाजता वेगान्दची स्वारी बोर्दोमध्ये येऊन पोचली. मार्शल पेताँचा मुक्काम सध्या ग्रँड हॉटेलमध्ये आहे हे कळताच तो तडक तिकडे गेला. त्यावेळी पेताँ आणि एडमिरल दार्ला यांच्या गप्पा रंगात आलेल्या होत्या. बुथिलिग् आणि बोर्दो हे दोघे मंत्रीही तेथे हजर असल्याचे पाहून वेगान्दला आश्चर्य वाटले. कारण मंत्रिमंडळामध्ये हे दोघेजण 'रेनॉची माणसे' म्हणून ओळखली जात होती. बुथिलिग् आणि बोर्दो हे पेताँचे बोलणे लक्ष-पूर्वक ऐकण्यात गढून गेल्याचे आढळताच वेगान्द सुखावला. मंत्रिमंडळाच्या बैठको-मध्ये आतापर्यंत भरभक्कम असलेली रेनॉची बाजू आता ढासळू लागली असली पाहिजे हे वेगान्दने ताडले. वेगान्दचा अंदाज चुकीचा नव्हता. रेनॉचे सरकार कोस-ळण्याचा संभव आहे याची चाहूल लागताच बुथिलिग् आणि बोर्दो यांची पावले वेगळ्याच दिशेने पडू लागली होती. ते पेताँच्या छावणीत दाखल व्हायला अधीर झाले होते.

दार्ला नेमका कोणत्या बाजूने उभा आहे याचा मागोवा घेण्याचा पेताँचा प्रयत्न सुरू होता. दार्ला म्हणजे एक स्वतंत्र प्रकरणच होते. फ्रेंच नौदल ही जणू काही आपली खाजगी मालमत्ता आहे अशा थाटात तो वापरायचा. आपण काय करा-यचे यासंबंधी आपल्यास कोणीही सूचना करता कामा नये अशी त्याची अपेक्षा असायची. त्याच्या मनात काय चालले‌ले आहे याचा थांगपत्ता लागणेही अवघड होते. शनिवारी दुपारी तो पेताँशी गप्पा मारीत होता आणि त्या दिवशी सकाळीच प्रतिनिधीसभेचा अध्यक्ष हेरिओ यांच्याशी बोलताना तो म्हणाला होता, "जर्मनीशी तह करून युद्धातून मोकळं होण्याचा पेताँ आणि वेगान्द यांचा विचार दिसतोय. तसं घडलं तर मी माझं नौदल घेऊन फ्रान्समधून बाहेर पडेन."

आतापर्यंतच्या युद्धात फ्रेंच नौदल कोठेही गोवले गेलेले नसल्यामुळे त्याचे सामर्थ्य अबाधित होते. त्यामुळे रेनॉ आणि वेगान्द यांपैकी दार्ला कोणाच्या बाजूने उभा राहतो यावरच बरेचसे अवलंबून होते. दार्ला जर आपले नौदल घेऊन उत्तर आफ्रिकेमध्ये निघून गेला तर युद्ध-स्थगितीची घोषणा करणे वेगान्द आणि पेताँ यांना अशक्य होणार होतें. हिटलरने फ्रान्स जवळ जवळ जिंकल्यासारखाच होता. आता त्याची नजर फ्रेंच नौदलाच्या रोखाने भिरभिरत होती. फ्रेंच नौदल आपल्या हुकमतीखाली यावे, निदान तें ब्रिटीशांच्या बाजूने तरी उभे राहता कामा नये अशी फ्रान्सकडून ग्वाही मिळाली तरच हिटलरला फ्रान्सशी तह करण्यात मातब्बरी वाटणार होती.

रेनॉ आणि पेताँ यांच्या लढतीत दार्ला याला महत्व आले होते ते यापाईच.

शनिवारी सकाळी रेनॉ याने दार्ला याला बोलावून घेऊन, 'तू आपलं नौदल घेऊन उत्तर आफ्रिकेचा किनारा गाठावा.' असे त्याला सांगितले होते. त्यावेळी दार्लाने होकारार्थी मान हलविली होती. आणि दुपारी पेताँला भेटल्यानंतर दार्लाची भाषा बदलली. संध्याकाळी तो रेनॉला भेटला तेव्हा म्हणाला, "फ्रेंच नौदल हलविणं मला शक्य होणार नाही."

राष्ट्रावर जीवन-मरणाचा प्रसंग आला असतानाही माणसे व्यक्तिगत स्वार्थाकरिता काही तासांच्या आत आपला निर्णय बदलतात हे पाहून रेनॉला कमालीचा संताप आला. परंतु यावेळी रागावून सारेच फिसकटणार होते. त्यामुळे तो समजुतीच्या स्वरात दार्ला याला म्हणाला, "ॲडमिरल, आपण आपलं उर्वरित सैन्य आणि युद्धसाहित्य घेऊन उत्तर आफ्रिकेला जावं असं मी ठरविलं आहे. हे सारं काम वेगानं कसं पार पाडता येईल याचा तपशीलवार आराखडा द गॉलनं तयार केलेला आहे. तुम्हाला फक्त त्याची कार्यवाही करायची आहे."

आपल्या लेखी प्रधानमंत्र्याला काहीही किंमत नाही हे दाखविण्यासाठी दार्ला उत्तरला, "ही योजना हास्यास्पद आहे."

दार्लाच्या निर्णयात इतका अनपेक्षित बदल झाल्याचे हेरिओ याला कळले तेंव्हा तो म्हणाला, "कोणत्या दिशेनं पोहावं हे या दर्यासारंगाला चांगलंच कळतंय की!"

शनिवारी दुपारी पेताँ, वेगान्द, बुथिलिए आणि बोदों यांची जी बैठक भरली होती तिच्यात केवळ युद्धतहकूबीचाच विचार झालेला आहे असे नव्हे तर युद्धतहकूबीच्या घोषणेचा मसुदाही तयार करण्यात आलेला आहे. हे जेव्हा रेनॉला

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।
डोंगरे
बालामृत
के. टी. डोंगरे ॲण्ड कं. प्रा. लि. मुंबई-४.

कळले तेव्हा त्याने पेतांला बोलावून घेऊन 'खरा प्रकार काय आहे' यासंबंधी चौकशं केली. आपला हा प्रश्न ऐकून पेतां गांगरून जाईल आणि काहीतरी गुळमुळीत उत्तर देईल असे रेनॉं याला वाटत होते. परंतु आता रेनॉंचे नेतृत्व झुगारून द्यायचे यासबधी पेतांचा निश्चयच झालेला होता. त्यामुळे रेनॉंचा प्रश्न ऐकताच पेतां उद्गारला, "जर्मनीवरोबरचं युद्ध थांबविण्यात आल्याची घोषणा करण्यात आली पाहिजे हे माझं मत कायम आहे. सरकारनं देश सोडून उत्तर आफ्रिकेत जाणं मला मंजूर नाही. तुम्ही आणि तुमचं सरकार तिकडं गेलं तरी मी इथंच राहणार आहे."

पेतां निघून गेल्यावर रेनॉं निराळ्या दिशेने विचार करू लागला. फ्रेंच सरकारनं युद्धस्थगितीची घोषणा केली तर फ्रान्सला आपले सारे शस्त्रसामर्थ्य हिटलरच्या स्वाधीन करावे लागणार होते. त्याऐवजीं लष्करानं युद्धविरामाचा प्रस्ताव मांडला तर फ्रान्समधील लढाई थांबेल आणि त्याबरोबरच युद्ध चालू ठेवण्याचा फ्रेंच सरकारचा अधिकार अबाधित राहील हे त्याला जाणवले. म्हणून त्याने वेगान्दला बोलावून घेऊन सांगितले, "आपला लष्करी प्रतिकार कोसळला आहे हे मला मान्य आहे. म्हणून सरसेनानी या नात्यानं तू जर्मन सेनानीला युद्धविराम करण्याबाबत विनंती करावी. डच सेनानीनं तसंच केलं होतं. त्यामुळे हॉलंडची राणी व्हिलेमिना आणि डच सरकार यांना हॉलंडमधून पळून जाऊन लंडन गाठता आलं. हॉलंडमधील लढाई थांबलेली असली तरी डच सरकार काही युद्धातून बाहेर पडलेलं नाही. त्याप्रमाणे मी आपलं सरकार घेऊन उत्तर आफ्रिकेत जातो. जास्तीत जास्त सैन्य आपल्याला फ्रान्सबाहेर नेणं शक्य व्हावं म्हणून तू युद्धविरामाचा जर्मन सेनानीबरोबरचा पत्रव्यवहार काही दिवस रेंगाळत ठेव."

वेगान्द हट्टालाच पेटला होता. तो उत्तरला, "सरकारला फ्रान्सबाहेर जाता येणार नाही."

"अल्जेरिया फ्रेंच साम्राज्याचाच भाग आहे की?"

"नाही; तसं नाही. सरकार इथं देशात असणं आणि अल्जेरियात असणं यात बराच फरक आहे."

"सरसेनानी या नात्यानं तू युद्धविराम घोषित करावा असं मला वाटतं."

"ते अशक्य आहे. फ्रेंच सेनेचा मी माझ्या हातानी अपमान करणार नाही. माझ्या सैनिकांची अप्रतिष्ठा व्हावी ही गोष्ट मी कशी मान्य करीन?"

"तसं असेल तर प्रधानमंत्री म्हणून मी तुला तसा हुकूम देतो."

"मी असला हुकूम मानणार नाही."

जनरल वेगान्द याला पहिल्यासूनच प्रजासत्ताक मान्य नव्हते. तो राजसत्तेचा पुरस्कर्ता होता. राजसत्तेची शान प्रजासत्ताकाला लाभणे कधीच शक्य नाही असे भूतकाळात रमणारे त्याचे मन मानीत होते. त्यामुळे रेनॉं याने हॉलंडच्या राणीचे

उदाहरण द्यावे ही गोष्ट त्याला आवडली नाही. यानिमित्ताने आपल्या प्रधानमंत्र्याला दुरुत्तरे करण्याची संधी तो दवडणार नव्हता. वेगान्द म्हणाला, "हॉलंडची राणी व्हिलेमिनी हिला देशाबाहेर पळून जावं म्हणून डच सेनानीनं युद्धविराम जाहीर करण्याचं पाप स्वतःकडे घतलं हे मी समजू शकतो. परंतु प्रधानमंत्री म्हणजे काही राजा नव्हे. राजघराण्याचा देशावर वंशपरंपरागत अधिकार चालतो. प्रधानमंत्र्याचं स्थान तसं नसतं. फ्रेंच प्रजासत्ताकानं गेल्या सत्तर वर्षात शंभर प्रधानमंत्री आल्याचं आणि गेल्याचं पाहिलं आहे. त्यामुळे उद्या तुम्ही फ्रान्स सोडून पळालो तर देश नवा प्रधानमंत्री निवडेल."

रेनॉला दुरुत्तरे करण्याच्या निमित्ताने आपल्याला प्रजासत्ताकाची निर्भत्सना करता येत आहे याचा वेगान्दला कोण आनंद होत होता! या युद्धात फ्रान्सचा पराभव झाला हे चांगले घडले असे मानणाऱ्यांपैकी तो एक होता. या पराभवाच्या निमित्ताने आपल्याला केवळ रेनॉच नव्हे तर प्रजासत्ताक राजवटच उलथून पाडता येईल असे त्यांच्या, लष्करी छावणीत वाढलेल्या मनाला वाटत होते.

वेगान्दचे हे उत्तर ऐकल्यानंतर त्याला बडतर्फ करण्यावाचून गत्यंतर नाही हे रेनॉला समजून चुकले. त्यासाठी राष्ट्राध्यक्ष लेब्रनची संमती मिळविणे आवश्यक होते.

शनिवारी संध्याकाळी लेब्रनच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक भरली. त्यावेळी नेहमीच्या प्रथेप्रमाणे वेगान्द शेजारच्या खोलीत येऊन बसला होता. या बैठकीमध्ये रेनॉने आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट शब्दात विशद केली.

तो म्हणाला, "कोणत्याही परिस्थितीत फ्रान्सनं या युद्धातून बाहेर पडता कामा नये. मात्र त्याबरोबरच सध्याची लढाई चालू ठेवणं आपल्या लष्कराला अशक्य आहे हे मला मान्य आहे. म्हणून सरकारनं देशाबाहेर पडावं आणि लष्करानं युद्धविराम घोषित करावा असा मी पर्याय सुचवितो. त्यामुळे दोन्ही उद्देश सफल होतील. सरकारला देशाबाहेरून युद्धही चालू ठेवता येईल आणि लष्कराचा संहारही वाचू शकेल."

पेतांप्रमाणेच शोतां हाही रेनॉच्या मंत्रिमंडळात उपप्रधानमंत्री होता. कसेही करून एकदाचे युद्ध थांबवा या वेगान्द-पेतां यांच्या मताचा तोही पुरस्कर्ता होता. त्यामुळे रेनोचे भाषण सुरू असताना तो म्हणाला, "आपल्या लष्कराची सध्याची अवस्था लक्षात घेता एक दिवसदेखील युद्ध चालू ठेवणं आपल्याला शक्य नाही हे प्रधानमंत्र्यांनी लक्षात घ्यावं."

रेनॉ उत्तरला, "ते मलाही मान्य आहे. म्हणून तर सरसेनानीनं युद्धविराम घोषित करावा असं मी सुचवित आहे. उलट सरकारनं युद्ध थांबविण्याचं ठरविलं

तर तसा करार व्हायला किमान चार दिवस लागतील आणि तेवढ्या अवधीत आपलं आणखी सैन्य गारद होईल."

रेनॉचे म्हणणे मंत्रिमंडळाला पटू लागल्याचे चिन्ह दिसू लागले. पेतॉनेदेखील संमतिदर्शक मान हलविल्याचे पाहताच रेनॉ त्याला म्हणाला, "तुम्ही बाहेर जाऊन वेगान्दची समजूत काढा. लष्कराचा विनाश टाळण्याचा सरसेनानीनं युद्धविराम जाहीर करणे एवढा एकच मार्ग आहे. तसं करण्यानं सरसेनानींची अप्रतिष्ठा होते असं कुणी मानायचं कारण नाही."

रेनॉच्या सूचनेप्रमाणे पेतॉं वेगान्दला भेटायला गेला. पंधरा एक मिनिटे त्या दोघांचा विचारविनिमय सुरू होता. त्यानंतर पेतॉं आत येऊन म्हणाला, "वेगान्द आपलं मत बदलायला तयार नाही."

वेगान्दला सरसेनानीपदावरून दूर करण्याचा रेनॉचा विचार अधिकच दृढ झाला.

वेगान्दचा हट्ट कायम आहे हे कळताच शोतॉं याला पुन्हा जोर चढला. तो म्हणाला, "जर सरकार उत्तर आफ्रिकेमध्ये नेण्यात आलं तर लोकांचा सरकार-संबंधी गैरसमज होईल आपल्याला शत्रूच्या हाती सोपवून मंत्रिमंडळ सुरक्षित ठिकाणी गेलं असं लोक म्हणू लागतील. म्हणून जर्मनी आपल्याशी कोणत्या अटींवर युद्धतहकुबी करायला तयार आहे याची आपण चौकशी करावी. जर जर्मनीच्या अटी वाजवी असतील तर ब्रिटनही युद्धतहकुबीसंबंधीचा आपला सध्याचा हट्ट मागं घेईल असं मला वाटतं. बरं, जर जर्मनीनं अपमानास्पद अटी सुचविल्या तर सरकारनं उत्तर आफ्रिकेत जाऊन युद्ध चालू ठेवणं रास्त ठरेल. लोकही रागावणार नाहीत."

शोतॉंची सूचना वरकरणी साळसूद वाटत होती. परंतु वस्तुतः फ्रेंच सरकारनेच जर्मनीपुढे शरणागती स्वीकारावी या वेगान्द याच्या मताचाच त्याने गोंडस शब्दांच्या आवरणाखाली पुरस्कार केला होता. शोतॉंला काय सुचवायचे आहे हे रेनॉने ताडले तो म्हणाला, "शरणागतीच्या अटींबाबत विचारणा करणं म्हणजे आपण शरणागती स्वीकारायला तयार आहोत अशी अप्रत्यक्ष कबुली देण्यासारखंच आहे कारण एकदा का वाटाघाटी सुरू झाल्या की त्या चक्रव्यूहातून बाहेर पडणं कोणालाच जमत नाही. शिवाय सरकार शरणागतीला तयार आहे असं एकदा जाहीर झालं की लोकांचं आणि सैनिकांचं उरलसुरलं अवसानही खचून जाईल. मग सरकार उत्तर आफ्रिकेत हलविण्याची शक्यता कायमची नाहीशी होईल. सरकार शरणागतीला तयार असताना आपण नाहक कशासाठी लढायचं असं सैनिक म्हणू लागतील."

शोतॉंच्या मायावी जाळ्यात रेनॉ सापडला नसला तरी युद्ध थांबवायला अधीर झालेले मंत्री विरघळू लागले होते ही गोष्ट शोतॉंला माहित असल्यामुळे "आपल्या सूचनेसंबंधी या बैठकीत मतदान घेण्यात यावं" असे त्याने सुचविले. शोतॉंचा

अंदाज खरा ठरला. तेरा मंत्र्यांनी शोताँच्या बाजूने आणि सहा जणांनी विरोधी मत नोंदविले.

मंत्रिमंडळातील बहुमत आपल्या पाठीशी नाही हे रेनॉ याला कळून चुकले. तो म्हणाला, " अशा परिस्थितीत प्रधानमंत्रिपदाचा राजीनामा देण्याशिवाय मला गत्यंतर नाही. "

रेनॉचा हा निर्णय ऐकताच राष्ट्राध्यक्ष लेब्रन हादरला. तो म्हणाला, " तू राजीनामा दिलास तर मीही देईन. "

राष्ट्राध्यक्ष लेब्रनने राजीनाम्याची भाषा बोलावी हे पाहून शोताँ चपापला. आपण फार समजूतदार आहोत असे लेब्रनला भासविण्यासाठी तो म्हणाला. " आपण जर्मनीकडे युद्धस्थगितीच्या अटींबाबत विचारणा करावी की नाही य बाबत आपण ब्रिटनचा सल्ला घ्यावा असं मी सुचवितो. "

लेब्रन म्हणाला, " हे पटलं. "

युद्ध चालू ठेवण्याबाबत रेनॉला केवळ मंत्रिमंडळातच विरोध होता असे नव्हे. घरातही त्याचा छळवाद सुरू होता. त्याची मूर्ख प्रेयसी हेलेन त्याला सांगत होती– " पॉल, तू माझं ऐक. युद्ध थांबविल्याची तू घोषणा कर. "

रेनॉ आपले ऐकत नाही हे पाहिल्यानंतर हेलेन अमेरिकन वकिलातीतील फ्रीमन मॅथ्यू याच्याकडे गेली अन् हुंदके देत म्हणाला, " मॅथ्यू, तुम्ही तरी आता पॉलची समजूत घाला. "

मंत्रिमंडळामध्ये रेनॉला विरोध वाढत आहे हे पाहून पिएर लाव्हल खूष झाला होता. ही संधी साधून पेताँकडे प्रधानमंत्रिपद यावे यासाठी काय करू अन् काय नको असे त्याला झाले होते. पेताँ प्रधानमंत्री झाला की फ्रान्समधील प्रजासत्ताक राजवट नाहीशी होऊन राजेशाही वा लष्करशाही येईल या कल्पनेने तो पेताँचा पाठीराखा झाला होता. पण आपल्या मनात काय आहे हे कोणालाही कळू नये म्हणून लाव्हल स्वत: मागे राहिला. त्याचा हस्तक म्हणून राफाएल आलिबर्त नावाचा राजनिष्ठ संसदसदस्य बोर्दोमध्ये वावरत होता.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर आपल्या कचेरीत येताच रेनॉ याने रुझवेल्टला तार धाडली–' जर्मनीपुढे बिनशर्त शरणागती स्वीकारणे किंवा उत्तर आफ्रिकेत जाऊन लढा चालू ठेवण एवढे दोनच पर्याय फ्रान्सपुढे आहेत. तुम्ही कोणते धोरण स्वीकारता यावर आमचा निर्णय अवलंबून आहे. "

त्यानंतर रेनॉने जनरल स्पीअर्सची भेट घेऊन शोताँ याच्या सूचनेसंबंधी चर्चिलचे मत काय आहे ते विचारून घ्यायला सांगितले. रेनॉ आणि स्पीअर्स यांचे बोलणे होत असतानाच रेनॉने तूर्स येथून रुझवेल्टला धाडलेल्या तारेचे उत्तर त्याच्या हातात पडले. ते उत्तर वाचताच रेनॉचा चेहेरा उतरला. तो स्पीअर्सला म्हणाला, " अमेरिका युद्धात उतरायला तयार नाही. "

रविवार सोळा जून उजाडला.

चर्चिलकडून कोणते उत्तर येते हे जाणून घ्यायला रेनॉ अधीर झाला होता. दुपारी बारा वाजता मंत्रिमंडळाची बैठक भरणार होती. तोपर्यंतही चर्चिलचे उत्तर आलेले नव्हते. अशा परिस्थितीत रेनॉवर दडपण आणण्यासाठी पेताँ याने राजीनामा देण्याची धमकी द्यायचे तंत्र अवलंबले. मंत्रिमंडळाच्या बैठकीला प्रारंभ होताच त्याने आपले राजीनाम्याचे पत्र वाचून दाखविले. 'फ्रान्स सोडून जाऊ इच्छिणाऱ्या सरकारशी आपण संबंध ठेवू इच्छित नाही' असे त्याने म्हटले होते.

मध्यंतरीच्या काळात जनरल वेगान्दने राष्ट्राध्यक्ष लेब्रन याची भेट घेऊन युद्ध थांबविणे फ्रान्सच्या हिताचे कसे आहे हे त्याला सर्व आघाड्यांवरील माघारीचे वृत्तान्त वाचून दाखवून पटवून दिले होते. त्यामुळे पेताँ याने आपला राजीनाम्याचा निर्णय जाहीर करताच लेब्रन म्हणाला, "आपला प्रतिकार पूर्णपणे कोसळला असल्याचं सरसेनानीनं मला कळविलं आहे. अशा परिस्थितीत युद्ध थांबविण्यात आल्याचं सरकारनं जाहीर करावं हे बरं."

"सरकारनं नव्हे, सरसेनानीनं तसं जाहीर करावं हा माझा आग्रह कायम आहे," रेनॉ म्हणाला.

"पण तसं करायला वेगान्द तयार नाही," लेब्रनने खुलासा केला.

वेगान्दला बोलाविण्यात आले. तो म्हणाला, "सैन्याची अप्रतिष्ठा होईल असं मी काहीही करणार नाही."

"समजा सरकारनं शरणागती स्वीकारली तरी त्यात सरकारबरोबर लष्कराचीही मानहानी होणार आहे," रेनॉने वेगान्दला सुनावले.

वेगान्द उत्तरला, "योग्य वेळ येईल तेव्हा मी या प्रश्नाचं जरूर उत्तर देईन."

दुबळ्या लेब्रनच्या अंगात यावेळी कोठून बळ संचारले होते, कोणास ठाऊक; पण तो वेगान्दला म्हणाला, "या प्रश्नाचं उत्तर आता, इथं मिळालं पाहिजे."

वेगान्द बोलेना.

रेनॉ म्हणाल, "स्वतः पुढाकार घ्यायला तुला संकोच वाटत असेल तर प्रधानमंत्री या नात्यानं तुला तसा लेखी आदेश द्यायला मी तयार आहे."

वेगान्दने नकार दिला.

रेनॉ आणि वेगान्द यांची तपासणी सुरू असतानाच शोताँ याच्या सूचनेसंबंधी चर्चिलचे उत्तर बोर्दो येथे येऊन पोचले. चर्चिलने म्हटले होते—"फ्रान्सने जर्मनीशी स्वतंत्रपणे तह करायला आमचा विरोध अद्यापही कायम आहे. परंतु जर युद्ध चालू ठेवणे फ्रान्सला सर्वस्वी अशक्य झाले असेल तर फ्रान्सने प्रथम आपले नौदल आमच्या ताब्यात द्यावे आणि मगच जर्मनीकडे युद्धविरामाच्या अटींबाबत विचारणा करावी."

आपले नौदल ब्रिटनच्या ताब्यात द्यायला दार्ला तयार होणार नाही हे सर्वांना माहित होते. तरीही त्याचे मत अजमावायला वेळ मिळावा म्हणून संध्याकाळी पाच

वाजता पुन्हा भेटण्याचे ठरले.

मध्यंतरीच्या काळात आणखी एक महत्त्वपूर्ण घटना घडली.

फ्रान्सने उत्तर आफ्रिकेतून आपला जर्मनी-विरोधी लढा चालू ठेवावा यासाठी ब्रिटनची मदत मागण्यासाठी लंडनला गेलेल्या द गॉलचा रेनॉला फोन आला.

द गॉल सांगत होता–" फ्रान्स आणि ब्रिटन या दोन देशांचं संघराज्य स्थापन झालेलं आहे अशी घोषणा करायला चर्चिल तयार आहे. आपणही तसं जाहीर करावं. फ्रँको–ब्रिटीश संघराज्य या नावानं जन्माला येणारं हे नवं राष्ट्र दोन्ही देशांचं संरक्षण, परराष्ट्रसंबंध आणि आर्थिक कार्यक्रम याबाबतचं धोरण ठरवील ते उभय देशांवर बंधनकारक राहील. या एकीकरणामुळे ब्रिटीश नागरिकाला फ्रान्सचं नागरिकत्व मिळणार असून फ्रेंच नागरिकास ब्रिटीश नागरिक म्हणूनही संबोधिण्यात येईल. हे असं झालं की फ्रान्सनं युद्ध चालू ठेवायचं की नाही हा प्रश्नच उरत नाही. संघराज्याचं सरकारच सारी सूत्रं आपल्याकडे घेईल."

ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या एकीकरणाची ही सर्वस्वी अनपेक्षित अन् अभिनव सूचना ऐकून रेनॉ इतका आनंदला की तो द गॉलला म्हणाला, " ही योजना राबविण्यासाठी मी प्राण पणाला लावायला तयार आहे."

पाच वाजता मंत्रिमंडळाची बैठक भरली. ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या एकीकरणाची सूचना ऐकताच सारे मंत्रिमंडळ हरखून जाईल आणि चटकन त्या योजनेला मंजुरी देईल अशी रेनॉ याची अपेक्षा होती. परंतु एकटा रेनॉ सोडला तर बाकीच्या मंत्र्यांनी या योजनेची कुचेष्टाच सुरू केली. पेतॉं म्हणाला, " फ्रान्सनं आपलं मांडलिक बनावं यासाठी ब्रिटननं हा डाव टाकला असून त्याला प्रधानमंत्र्यांनी बळी पडावं याचं मला आश्चर्य वाटतं."

नंतर, जर्मनीकडे शरणागतीच्या अटींबाबत विचारणा करण्याचा शोतॉंचा प्रस्ताव विचारार्थ पुढे आला. या प्रस्तावाला एकटा रेनॉ तेवढा विरोध करीत होता. तासभर कडाक्याची चर्चा होऊनही रेनॉ आपला आग्रह मागे घ्यायला तयार नाही. शेवटी लेब्रन म्हणाला, " आज रात्री दहा वाजता पुन्हा मंत्रिमंडळाची बैठक भरेल आणि त्यावेळी अंतिम निर्णय केला जाईल."

आठच्या सुमाराला रेनॉ लेब्रनच्या भेटीला गेला. रेनॉ म्हणाला, " फ्रान्सनं युद्ध चालू ठेवलंच पाहिजे असा प्रधानमंत्री म्हणून माझा निर्णय कायम आहे. राष्ट्राध्यक्ष या नात्यानं तुमचा निर्णय काय आहे तो मला कळवा."

लेब्रन चाचरत म्हणाला, " तुझा निर्णय मान्य होणार नाही आणि जे मंत्रिमंडळाला मान्य नाही त्याबाबत मी माझा हेका धरणार नाही."

रेनॉने खिशातून पत्र काढून ते लेब्रनच्या हाती दिले. रेनॉने प्रधानमंत्रिपदाचे त्यागपत्र सादर केले होते.

रात्री दहा वाजता मंत्रिमंडळाची बैठक भरली तेव्हा लेब्रन एकच वाक्य म्हणाला,

" रेनॉनं राजीनामा दिला असून मी पेतॉंला नवं मंत्रिमंडळ बनवायला सांगितलं आहे."

रेनॉं मंत्रिमंडळाची अखेरची बैठक आटोपली. तासाभराच्या आत पेतॉं याने आपल्या सहकाऱ्यांची नावे लेब्रनला सादर केली. लागलीच पेतॉं–मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला आणि साडे अकरा वाजता या नव्या मंत्रिमंडळाची पहिली बैठक भरली.

१८७० मध्ये अस्तित्वात आलेल्या तिसऱ्या फ्रेंच प्रजासत्ताकाचे हे एकशे सातवे मंत्रिमंडळ होते आणि ते शेवटचेच ठरणार होते. कारण या मंत्रिमंडळाची पहिली बैठक भरताच नवा प्रधानमंत्री पेतॉं म्हणाला, " जर्मनी कोणत्या अटींवर फ्रान्सची शरणागती स्वीकारायला तयार आहे यासंबंधी हिटलरकडे विचारणा करण्याचं मी ठरविलं आहे."

सर्व मंत्र्यांनी माना डोलाविल्या आणि ते आपापल्या निवासस्थानाकडे परतले.

ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या एकीकरणाला चर्चिलची संमती मिळवून द गॉल रात्री साडेनऊ वाजता बोर्दो येथे परतला. आपली कामगिरी यशस्वी झाली याबद्दल त्याला केवढा अभिमान आणि आनंद वाटत होता. पण विमानतळावरच त्याला बातमी समजली–" रेनॉंने राजीनामा दिला."

द गॉलचा सारा आनंद आणि उत्साह मावळला. त्याने स्वतःलाच बजाविले–" नवं फ्रेंच सरकार शरणागती स्वीकारणार हे उघडच आहे. मला इथं राहून चालणार नाही. मला फ्रान्सबाहेर गेलं पाहिजे–तातडीनं गेलं पाहिजे."

आपण बोर्दो येथे आल्याचे पेतॉं सरकारला कळले तर ते आपल्याला नक्कीच अटक करील हे माहित असल्यामुळे द गॉल रात्रभर विमानतळाजवळच्या एका हॉटेलात लपून बसला.

सतरा जूनला सकाळी साडेसात वाजता द गॉलने लंडनकडे प्रयाण केले–स्वतंत्र फ्रान्सचा ध्वज फडकवत ठेवण्यासाठी.

पेतॉंच्या राजवटीत होणारी मायभूमीची विटंबना पाहण्याची त्याची मुळीच इच्छा नव्हती.

(क्रमशः)


## विज्ञानखबरी

दत्तप्रसाद दाभोळकर

# ल्युनाची घोडदौड—ल्युना १७

अपोलो १५ मध्ये, चित्रात दाखवलेली गाडी असेल. या गाडीत बसून अंतराळवीर चंद्रावर अनेक मैल प्रवास करेल—अपोलो १५ भले जेव्हा केव्हा उड्डाण करणार असेल तेव्हा करो! आज तरी पुन्हा एकदा अपोलोचा पराभव झाला आहे! ल्युना १७ मधून अलगदपणे चंद्रावर उतरलेल्या रशियन कासवाने आतापर्यंत चंद्रावरची सहाशे फूट भूमी पायाखाली घातली आहे—चंद्रावरची पंधरा दिवसाची रात्र ज्यावेळी संपेल त्यावेळी दिवसा उजेडी पुन्हा त्याचा प्रवास सुरू होईल. अशी जाग आणून जर त्याचा प्रवास पुन्हा सुरू झाला, तर हे कासव कदाचित शेकडो मैल प्रवास करू शकेल!


ल्युना १७ मधील या कासवाचे स्वतःचे असे काही खास विशेष आहेत. ल्युना



**ल्युना १७ मधील कासव** (Moon Walker)

१६ ज्या जागी उतरले होते त्यापासून चौदाशे मैल अंतरावरील 'सी ऑफ रेन' या चंद्रावरच्या भागावर हे कासव बाहेर पडले. 'सी ऑफ रेन' हा चंद्रावरचा सर्वात जुना भाग. या भागाचा काहीही अभ्यास आजवर झालेला नाही. हे कासव सूर्यशक्तीवर चालणाऱ्या विजेऱ्यावर काम करते. चंद्रावरची रात्र पंधरा दिवसांची असते. त्यावेळी तपमान शून्याखाली अडीचशे फॅरनाइट या आकड्यावर जाऊन स्थिरावते. या रात्रीच्यावेळी कासवाच्या अंगावर बसवलेले संरक्षक कवच काम करू लागते. आपल्या यंत्राचे सारे भाग, साऱ्या विजेऱ्या त्या आवरणाखाली घेऊन हे कासव १५ दिवसासाठी म्हणून जणू समाधी अवस्थेत जाते! चित्रात दाखविल्याप्रमाणे या कासवाला एकूण आठ पाय आहेत. खास काळजी म्हणून रशियन शास्त्रज्ञांनी हे एवढे पाय ठेवले आहेत. यातील प्रत्येक बाजूच्या फक्त एकेका चाकाच्या जोरावरही हे यंत्र चालू शकते. चंद्रावरच्या अपरिचित भूमीत या कासवाचा एखादा पाय जरी घसरला, रुतून बसला तरी हे यंत्र बंद पडणार नाही. अशावेळी पृथ्वीवरून शास्त्रज्ञ त्या पायात बसवलेला छोटा सुरूंग उडवतील. ते चाक बाकीच्या यंत्रापासून अलग होईल. आणि पुन्हा धीम्या गतीने कासवाचा प्रवास सुरू होईल.

त्या कासवाच्या चारी बाजूला छायालेखन करणारी यंत्रे आहेत. कासवाच्या सभोवताली असलेल्या भूमीचे चित्र या यंत्रानी टिपले जाते. वितनर संदेशा [ Radio



अपोलो १५ मधील ससा (Moon Rover)

Signals ] द्वारा ते चित्र पृथ्वीवरच्या शास्त्रज्ञांना कळते. पृथ्वीवरचे शास्त्रज्ञ मग त्या कासवाला मार्ग कोणता घ्यावयाचा ते सांगतात. आजपर्यंत पृथ्वीवरून झालेले मार्गदर्शन अगदी अचूक आहे. तीन दिवसात या कासवाने सहाशे फूट अंतर तोडले. काही उंचवटे पायाखाली घातले. मार्गात आलेली दोन विवरे सफाईने टाळली. हे सारे करताना आपला एकही पाय या कासवाने गमावला नाही! –गोगलगाईप्रमाणे या कासवाचे सारे बिऱ्हाड पाठीवर आहे. प्रवास करताना चंद्रावरची माती हे कासव गोळा करते. क्ष किरणाचा प्रकाशपट [ X–ray Spectro meter ] वापरून त्या मातीचे पृथ:करण करते. ते पृथ:करण पृथ्वीवरच्या शास्त्रज्ञांना कळविते. फ्रेंच शास्त्रज्ञांनी बनविलेला, चौदा कोन असलेला, एक आरसा या कासवाच्या पाठीवर आहे. फ्रान्समधल्या क्रिमीया येथील प्रयोग शाळेतून चंद्रावर सोडलेले लेसरकिरण, या आरशामुळे परावर्तीत होतात. हे किरण असे परावर्तीत केल्यामुळे चंद्र आणि पृथ्वी यांच्यामधील अंतर अगदी सेंटीमीटरपर्यंत अचूक मापता येईल. अपोलो ११ ने चंद्रावर टाकलेल्या आरशाने, एका फूटाच्या चुकीपर्यंत हे अंतर अचूक मापलेले आहे.

–ल्युना १७ वरचे कासव १५ दिवसाच्या झोपेतून जागे होईल का? त्यानंतर ते तेवढ्याच कार्यक्षमतेने काम करेल का? या अगदी थोड्या वर्षाच्या कालावधीत ही रशियन कासवे मंगळावर आणि शुक्रावर मजेत संचार करू लागतील. या साऱ्या प्रश्नांची उत्तरे अगदी लवकरच आपणाला मिळतील. पण ल्युना १७ मधील कासव बंद पडले तरी त्याचे यश कमी होऊ शकणार नाही. अमेरिकन अंतरिक्ष कार्यक्रमाचे प्रमुख डॉ. जॉर्ज लो यांनी म्हटल्याप्रमाणे, 'गेल्या दोन महिन्यात दोन ल्युना आणि वीस उपग्रह अवकाशात सोडून रशियाने भली मोठी घोडदौड केली आहे–अगदी थोड्या वर्षाच्या कालावधीत ही रशियन कासवे मंगळावर आणि शुक्रावर अगदी मजेत संचार करू शकतील.'

## एक होती परी...

एक होती परी. इवली, इवली, अगदी लहान. ती मुळी पापी माणसांना दिसायचीच नाही. ती परी दवबिंदूमधील मध प्यावयाची. चांगल्या माणसांच्या खूप उपयोगी पडायची...ढगांच्या विमानात बसून ती खूप खूप भटकायची.

–लहानपणी आपण गोष्टीत पाहिलेली ही परी, थोड्या वेगळ्या स्वरूपात परवा चक्क एका शास्त्रज्ञाला आढळली. त्याचे असे आहे. जीवन ही एक विलक्षण गोष्ट आहे! सजीव म्हणजे नक्की काय याचाही विज्ञानाला अजून पुरता पत्ता लागावयाचाय. या सजीवांची जीवनकलहात जगावयाची ताकद आणि चिवटपणा

तर जबरदस्त असतो. रामदासस्वामींनी शिळेला बंद खडकातून जिवंत बेडकी काढून दाखविली. आजचे शास्त्रज्ञ त्यांच्याही पुढे गेलेत. सजीव काय वाटेल तिथे जगतात. उकळणाऱ्या तीव्र सल्फ्युरिक ॲसिडमध्ये जगणारी एक छोटी वनस्पती शास्त्रज्ञांना माहित आहे. शून्याखाली दहा अंश फॅरनाइट या तपमानालाच वाढू शकणारे शेवाळे शस्त्रज्ञांना माहित आहे – आणि परवा तर प्रख्यात जंतूशास्त्रज्ञ डॉ. पार्कर यांना फक्त ढगातच राहू शकणारी परी भेटली !

नॅचरल हिस्टरी या प्रख्यात मासिकात डॉ. पार्कर यांनी स्वतःच हा किस्सा सादर केलाय. सध्या आपण दूषीत वातावरण, दुषित पाणी [ Water and Air pollotion ] याबाबत खूप ऐकतो. हे सारे विज्ञानाच्या शिवशक्तीने निर्माण केलेल्या भस्मासुराचे प्रताप आहेत. आपले कारखाने हवेत व पाण्यात एवढी अपायकारक द्रव्ये सोडत असतात की पुढे मागे माणसाला या पृथ्वीवर राहणेच अशक्य होऊन जाईल ! ही अशी प्रामाणिक भिती बाळगून त्याविरुद्ध काम करणारा डॉ. पार्कर हा एक शास्त्रज्ञ आहे. आपल्या शहरातील हवेत व पाण्यात असलेले दूषित आणि उपकारक घटक मापण्याचे कार्य डॉ. पार्कर दररोज इमाने-इतबारे करीत होता. आणि काही दिवसांनी डॉ. पार्कर यांच्या लक्षात एक विलक्षण गोष्ट आली. पाऊस पडल्यावर त्यांच्या बागेत असलेल्या तळ्यातील पाण्यात काही अनपेक्षित बदल होत होता. पाऊस पडल्यावर लगेच त्या पाण्याचे पृथःकरण केले तर त्या पाण्यातील उपकारक घटकांचे (उदाहरणार्थ जीवनसत्त्व क्रमांक १२) प्रमाण वाढत होते. काही काळांनी डॉ. पार्कर यांच्या लक्षात आणखी एक गोष्ट आली. ज्यावेळी पाऊस पडण्यापूर्वी विजेचा गडगडाट होत असे त्यावेळी तर हे प्रमाण खूपच वाढत होते. – होय ! त्या पाण्यात असे काहीतरी होते की ज्यामुळे जीवनसत्त्वे मिळत होती. सर्वसामान्यपणे ही जीवनसत्त्वे फक्त सजीवांच्यापासूनच मिळण्यासारखी होती. म्हणजे पृथ्वीच्यावर दूर कठेतरी मोठ्या प्रमाणात हे सजीव राहात असण्याची शक्यता होती.

आताही शक्यता तपासून घ्यावयास हवी. या सजीवांची वसतिस्थानेच वर असतात की ते तात्पुरते वर गेलेले असतात ? वर असताना प्रथम सजीव असलेले ते कण, जिवंत अवस्थेत असतात का मृत ? हे सारे तपासावयास हवे. एक सोपा प्रयोग करून डॉ. पार्कर यांनी या गोष्टीचे उत्तर मिळविले. रासायनिक पदार्थ 'टी. टी. सी.' याचा एक गुणधर्म आहे. एखाद्या जिवंत पेशीतील वितंचका [ enzyme ] बरोबर ज्यावेळी त्याचा संयोग होतो त्यावेळी प्रथम पिवळा असलेला टी. टी. सी. चा रंग गुलाबी होतो. आणि ढगांचे पकडून आणलेले नमुने नेमकी हीच गोष्ट करत होत्या. ढगांच्या पाठीवर जगणाऱ्या आणि वाढणाऱ्या या अति-सूक्ष्म शेवाळ्याचे अस्तित्व डॉ. पार्कर यांनी वेगळ्या प्रकारेही पडताळून ठेवले. हे नमुने त्यांनी किरणोत्सर्गी कर्बद्विप्राणिल वायू असलेल्या भांड्यात ठेवले. हा

वायू तर कमी झालाच पण तो नेमका कोठे जातो आहे हे पण पार्कर यांना समजून आले. सजीवांचे अस्तित्व सिद्ध झाल्यावर ते ढगात जगत कसे असतील याचेही काही अंदाज डॉ. पार्कर यांनी केलेत. त्यांच्या मते या अतिसूक्ष्म शेवाळ्यातले काही भाग तसे मोठे असतात. किमानपक्षी ढगातील वाफेचे अतिसूक्ष्म दवबिंदूत रूपांतर करावयास प्रकलक [ Nucleia ] म्हणून उपयोगी पडावेत येवढे ते मोठे असतात. आणि एकदा पाणी मिळाल्यावर सजीवाची निम्मी कटकट संपते. भोवतालच्या हवेत आणि ढगात अतिसूक्ष्म स्वरूपात असलेला प्राणवायू, कर्बद्विप्राणिल वायू, नत्रवायू, मिथेन, ब्यूटेन आणि असिटोन त्यांना मिळतो. हवेत तरंगणारे धुलीकण त्या शेवाळ्याला, पॉटॅशिअम, आयर्न, कॅलशिअम, मॅगनेशिअम आणि फॉस्फरस पुरवते. या सर्वांच्या जोरावर मजेत ते शेवाळे जगत असते.

नॅचरल हिस्टरी मधील या लेखाने शास्त्रीय जगात तशी थोडी खळबळ माजली आहे.--डॉ. पार्कर यांचे सारे म्हणणे मुळापासूनच चूक आहे असे म्हणणारे शास्त्रज्ञही आहेत. पण डॉ पार्कर मात्र इतरांचे काही ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत-- परी भेटलेला माणूस इतरांचे थोडेच ऐकणार? ते आपले स्वतःच्या तंद्रीत काम करताहेत. या शेवाळ्यांचे त्याना आता प्रकार ठरवायचेत. हवेत आपण सोडलेल्या दूषित धुरांचा खुराक म्हणून उपयोग करून ढगावर जगू शकणारे शेवाळे ढगात वाढवता येईल का हे त्यांना अभ्यासायचंय. कारण असले एखादे शेवाळे जर मिळाले तर दूषित हवेचा आणि पाण्याचा प्रश्न लगेच निकालात निघेल. कारण ढगावर वावरणाऱ्या या पऱ्या आपल्या शहराभोवती पसरलेल्या दूषित हवेचा फन्ना पाडतील. पुन्हा आपणाला जीवनसत्त्वे पुरवतील.-- डॉ. पार्कर यांना स्वप्नात भेटलेली ही परी सत्यसृष्टीत अवतरो.

□ □ □

---

दूरचे तारे

लेखक : श्रीकांत आंबेकर

लेखांक चार

जागेअभावी पुढील अंकी

---

एक बराचसा गैरशिस्त कारभार

# महाराष्ट्र राज्य क्रीडामहोत्सव

क्रीडाक्षेत्रात ज्या परंपरा महाराष्ट्र शासनाने सजविल्या त्यामध्ये महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. मुंबईप्रांत असतानाच हा क्रीडामहोत्सव चालू झाला. पुढे महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर मूळ चौकटीत बदल न करता पण अधिक सुव्यस्थितपणे त्याला स्वरूप देण्याचे प्रयत्न झाले. परंतु निर्माण केलेल्या चौकटीमुळेच ज्या उद्देशाने क्रीडामहोत्सव चालू केला तो साध्य होण्यात अनेक अडचणी येतात हे लक्षात आल्यावर त्याची सपूर्ण पुनर्रचना यावर्षीपासून करण्यात आली.

ग्रामीण भागातील जनतेत खेळाची आवड निर्माण व्हावी, त्यांना स्वतःचे कौशल्य दाखविण्यास संधी मिळावी, होतकरू तरुण खेळाडूंना योग्य ते मार्गदर्शन व उत्तेजन मिळावे ही या क्रीडामहोत्सवामागची कल्पना होती. शहरातील खेळाडूंना अनेक प्रकारे सहकार्य व संधी मिळते. बहुसंख्य लोक खेडेगावात राहणारे असून आणि त्यामध्ये खरोखरच कौशल्य अंगी असलेले तरुण असून केवळ वाव नाही म्हणून त्यांची कुचंबणा होऊ नये ही खरी भूमिका.

यासाठी गट, तालुका जिल्हा व राज्य या चार पातळ्यांवर १७ वर्षे वयाखाली व २१ वर्षे वयाखाली या गटात सामने होत. प्रत्येक पातळीवर चमकणारे खेळाडू निवडून त्यांचा संघ बनविण्यात येई.

या पद्धतीत काही दोष ठळकपणे होते. वयाचा दाखला हा गावच्या तलाठ्यापासून ते प्राथमिक शाळेच्या हेडमास्तरापर्यंत कोणाचाही चाले. यामुळे वयाच्या अटीला काही अर्थच उरला नव्हता. फक्त खोटेपणाला प्रोत्साहन मिळत होते. आजकाल बहुतेक तालुक्यातून कॉलेजे निघाली आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्रात आज खूपच संधी उपलब्ध आहे. त्यामुळे या संघाचा, खेळाडूंचा दर्जाही बरा असे. त्यामुळे पुन्हा हेच विद्यार्थी तालुक्याचे नेतृत्व करत; आणि अविद्यार्थी असा बहुसंख्य तरुण गट शेवटी डावललाच जाई. त्यामुळे ग्रामीण विभागाला

प्रोत्साहन देण्यासाठी चालू केलेल्या या सामन्यात शहरी संघाचेच प्राबल्य उघड-उघड दिसून येई. गेल्या दहा वर्षांत अजिंक्यपद मिळवलेल्या संघाचा वा वैयक्तिक स्पर्धेतील खेळाडूंचा आढावा घेतल्यास हे शंभर टक्के सिद्ध होईल.

यावर्षी पासून वरील पद्धतीत दोन महत्त्वाचे बदल करण्यात आले. शालेय स्पर्धाचा एक विभाग पाडण्यात आला आणि १६ वर्षावरील पण अविद्यार्थी असा सर्वांसाठी खुला हा दुसरा गट करण्यात आला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे यामुळे या सामन्यावर होणारे आक्रमण थांबेल ही कल्पना. तसेच वयाची अटच काढून टाकल्याने सर्वांना मार्ग खुला झाला. याशिवाय लेझीम हा खेडेगावात सर्वात अधिक लोकप्रिय व्यायामप्रकाराचा समावेश केल्याने ते लोक या सामन्याच्या खरे-खुरे अधिक जवळ आले. याबरोबरच महिलांची कबड्डीही चालू झाली.

जिल्हापातळीवर होणारे हे महोत्सव नोव्हेंबर महिन्याअखेरीस संपावेत अशी सूचना होती. त्याप्रमाणे बहुतेक जिल्ह्यातले क्रीडामहोत्सव संपले. यापैकी अनेक क्रीडामहोत्सव मी जवळून पाहिले. एक खेळाडू म्हणून आणि निरीक्षक म्हणूनही.


सामन्याचे उद्‌घाटन बहुतेक ठिकाणी ठरलेल्या वेळेप्रमाणे होई. अध्यक्षमहाराज येऊन दाखल झाल्यावर निरुपायाने ते घेत असावे. खेळाडूंचे होणारे संचलन हा अक्षरशः एक फार्स असे. जिल्ह्यातले निम्म्याशिम्या तालुक्याचेच संघ मुळात स्पर्धे-साठी संघ पाठवीत. त्यापैकी तीन-चार संघ संचलन हा स्पर्धेचाच आवश्यक भाग मानून या कार्यक्रमाला उपस्थित रहात. बाकीचे संघ आपल्या सामन्यापुरतेच क्रीडांगणावर उगवत. संचालनाची रंगीततालीम ही नुसतीच कागदोपत्री राही आणि मग अध्यक्ष आणि पाहुण्यांच्या पुढे सादर केली जाई ती रंगीबेरंगी पोषाखा-तील विदुषकी फॅन्सी परेड. प्रत्येक खेळाडूने आपापल्या सोयीप्रमाणे लेंगा शर्ट, पँट, पटका, स्वेटर आणि इतर काहीही घातलेले असे आणि रस्त्यातून चालताना चालावे इतक्याच निष्काळजीपणे तो संचलनातही चालत असे.

खरे म्हटले तर थोडे कडक धोरण आणि थोडे परिश्रम घेतले तर संचलन यशस्वी करणे आणि सामन्याची शानदार सुरवात करणे सहज शक्य आहे. पण तसा उत्साह कोणत्याच ठिकाणी संयोजकाच्यात दिसून आला नाही. सरकारी कार्यक्रमात चैतन्य अभावानेच आढळते हा कटु पण सत्य अनुभव क्रीडास्पर्धेच्या उत्साही मैदानावरही यावा हे दुर्दैव. जबाबदारी अंगावर टाकलेले जिल्हापरिषदेचे पदाधिकारी आणि त्यांना मदत करण्यासाठी सरकारी हुकमाने बोलविलेले शाळे-तील N. F. C. चे शिक्षक हे स्पर्धेचे संयोजक.. पाटी टाकण्याच्या त्यांच्या वृत्ती-मुळे कार्यक्रमात अनेक ठिकाणी वैगुण्ये येतात. यापेक्षा त्या त्या जिल्ह्यातील एखाद्या उत्साही क्रीडासंस्थेवर ही जबाबदारी टाकल्यास ते ही जबाबदारी कितीतरी अधिक समर्थपणे पार पाडतील. आज महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात अशा क्रीडासंस्था अस्तित्वात आहेत.

खेळाचे मैदान तयार करणे क्रीडांगणावर प्रेक्षकाची बसण्याची व्यवस्था करणे, निष्णात पंच, खेळाडूंना कपडे बदलण्यासाठी तंबू यापैकी कशाचाच पत्ता बहुतेक ठिकाणी नव्हता. कुठल्याही साधारण सपाट जागेवर जर चार रेघा ओढल्या तर कबड्डी, खोखोची मैदाने आणि पळण्याचे मार्ग तयार होतात ही कल्पना. ती जागा कितपत खडकाळ आहे, गवताळ आहे, त्यावर काचा वगैरे पडलेल्या आहेत का याची चौकशी करतो कोण ? जिल्हा सामन्याला बावीसशे रुपये खर्च सरकारकडून मंजूर असतो. यापैकी खेळाडूंचा येण्याजाण्याचा खर्च वगळता (ज्यासाठी भाड्यातील सवलत मिळते) खेळाच्या मैदानाची उत्तम तयारी हे पहिले लक्ष हवे. पण ते अभावानेच आढळते. प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था म्हणजे खेळाच्या मैदानाभोवतीचे गर्दी करून केलेले कोंडाळे. उत्साही प्रेक्षक काही वेळा क्रीडांगणाच्या राखीव क्षेत्रावरही आक्रमण करतात. कळत नकळत. या गोष्टी वारंवार निदर्शनाला आणूनही हे असे होणारच अशी संयोजकांची भूमिका दिसते. निष्णातपंच ही खेळाच्या यशस्वीतेसाठी आणखी एक आवश्यक बाब. कबड्डी, खोखो, व्हॉलीबॉल यांच्या असोसिएशन महाराष्ट्रात जोरात असून त्यांच्या पंचपरीक्षा पास झालेले काही खेळाडू आज प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध आहेत. काही जुने तज्ञ अनुभवी क्रीडाशिक्षकही प्रत्येक ठिकाणी असतातच. त्यांना मानधन द्या वा देऊ नका (माझ्या मते द्यावयास हवे. पण तो मुद्दा सोडून देऊ) पण -निदान आग्रहाने विनंति करून बोलवा तरी. न।हीतर संघ उतरल्यावर पंच शोधण्याची धावपळ, मग कुणा सोम्यागोम्याला वेठीला धरून उभे कर. आणि मग त्याच्या अर्ध्या कच्च्या ज्ञानातून निर्माण होणारे वाद आणि भांडणे. याशिवाय कुस्ती एके ठिकाणी, वैयक्तिक स्पर्धा दुसऱ्या मैदानावर तर सांघिक सामन्याचे मैदान निराळेच असाही कारभार काही जिल्ह्यात दिसून आला.

उणीवा दाखविणे सोपे असते याची जाणीव मलाही आहे. हा पहिलाच क्रीडामहोत्सव असल्याने काही अधिक अडचणी असणार हेही खरे आहे. यातील एक अडचण खरोखरच महत्त्वाची आहे. पूर्वी तालुक्यातले संघ हे खऱ्या अर्थाने तालुक्याचे निवडलेले संघ असत आणि त्यामुळे त्या पन्नासजणांवर देखरेख ठेवणारा व्यवस्थापक सामन्याच्या दिवसात आपलें सहकार्य देऊ शकत असे. यावर्षीच्या नवीन पद्धतीप्रमाणे कबड्डी, खोखो, व्हॉलीबॉल, लेझीम, हे चारी संघ चार निरनिराळ्या खेड्यातले. कारण निवड होत नाही, अजिंक्य संघच पुढे जातो.तर वैयक्तिक स्पर्धातले स्पर्धक हे असेच स्वतंत्रपणे आलेले. स्वभाविकपणेच विकेंद्रीकरणातून देखील सामन्याचे सुसुत्रसंचलन करण्यासाठी काही अधिक सुधारणा कराव्या लागतील.

स्पर्धेत जमेच्या बाजूही आहेत. त्यापैकी महत्त्वाची म्हणजे लेझीमचा समावेश. सोळा जणाच्या संघात सगळीकडेच सोळावर्षापासून शब्दशः साठ वर्षापर्यंतचे खेळाडू



भीमराव मांडके । शशिकांत शिंदे । संभाजी कदम । सूर्यकांत शिंदे

दृष्टिला आले. ऐटदार पोषाखात वाद्यांच्या साथीवर लयबद्धपणे त्यांनी केलेले डाव बघितले की त्यांनी घेतलेल्या परिश्रमाची कल्पना येई. बहुतेक जिल्हा सामन्यात हे एकच सांघिक बक्षिस खेड्यातल्याच संघांना हमखासपणाने मिळाले. पण त्यामुळे ते लोक खूष झाले. त्यांना श्रमाचे चीज वाटले. विजयी आणि पराभूत दोन्ही संघांनी पुढच्या तयारीने कमरा कसल्या. तो जिवंत रांगडा उत्साह खराखुरा ग्रामीण वाटला. लेझीमने चालू केलेला हा खेळातील विजयाचा सूर एकदा खेडेगावातल्या लोकांच्या डोक्यात भिनला की मग कबड्डी, व्हॉलीबॉल, वैयक्तिक स्पर्धा या साऱ्यामधली आव्हाने स्वीकारण्यासाठी त्यांचे मन आणि बाहु स्फुरू लागतील. प्रयत्नाने हे घडू शकते याचा प्रत्यय सांगली जिल्ह्यातील वाळवे गावाने आपल्या खोखो कौशल्याने या पूर्वीच्या काही क्रीडामहोत्सवात दिलाच आहे. गरज आहे ती मोठ्या प्रमाणावर त्याचे अनुकरण होण्याची. महाराष्ट्र राज्य क्रीडामहोत्सव ग्रामीण भागातील ही सुप्त क्रीडाशक्ती किती जागृत करू शकतो यावरच या नवीन बदलाचे मूल्यमापन होणार आहे.

अंतरविद्यापीठ सामन्यात नेमबाजीचा समावेश शिवाजी विद्यापीठामुळे झाला. खेळाच्या विकासासाठी आपले सारे आयुष्य वेचलेल्या मेघनाथ नागेशकरांच्या

प्रयत्नामुळे हे घडू शकले. या स्पर्धेत पहिल्या वर्षी तर अखिल भारतीय अंतर-विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या चमूने पहिला नंबर पटकावला.

या पार्श्वभूमीवर सातारा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अंतरविभागीय नेमबाजी स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद फारसा उत्साहवर्धक नव्हता. सातारा, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी व सांगली या पाच विभागापैकी फक्त पहिल्या दोनच विभागांचे संघ आले होते, खरे म्हटले तर सर्वच कॉलेजातून N. C. C. चालू असताना संघ येण्यास अडचण पडणे हे कॉलेज वा खेळाडूंच्या उदासीनतेचेच लक्षण नव्हे काय ?

संघ एकूण चार खेळाडूंचा असतो—पाचवा गडी राखीव—नेमबाजी दोनशे यार्डा-वरून करावयाची. त्याचे पाच प्रकार, (१) आडवे पडून, (२) गुडघे टेकून, (३) उभे राहून, (४) पंधरा सेकंदात चार गोळ्या चालविणे, (५) या प्रकारात चार सेकंदाचं लक्ष्य डोळ्यासमोर धरले जाते तेवढ्यात अचूक वेध घ्यायचा. या पाची प्रकारांना मिळून एकूण शंभर गुण. चार खेळाडूंच्या चारशे गुणांपैकी सातारा संघाला दोनशे बासष्ट गुण मिळाले. कोल्हापूरला त्यापेक्षा पाचच कमी म्हणजे दोनशे सत्तावन्न गुण मिळाले.

छत्रपती शिवाजी कॉलेजचे वैशिष्ट्य म्हणजे गेले सतत चार वर्षे हा संघ विद्या-पीठात अजिंक्यपद मिळवत आहे. यंदाचे मानकरी आहेत, (१) भीमराव मांडके, (२) शंकर चव्हाण, (३) सूर्यकांत शिंदे, (४) शशिकांत शिंदे, (५) संभाजी कदम. यापैकी मांडके तर चौऱ्याऐंशी गुण मिळवून विद्यापीठातले पहिल्या नंबरचे नेमबाज ठरले.

सामन्याचा सराव तसा या मंडळींनी थोडेच दिवस केला. सामन्याच्या आधी फक्त चार दिवस दररोज सुमारे दीडशे काडतुसे उडविण्यासाठी या संघाला मिळाली. सुभेदार मुकुटराव निकम यांचे गुरु. N. C. C. मधील विभागाचे जे सामने नागपूरला झाले त्यासाठी केलेला सरावही या संघाला उपयोगी पडले.

शिवाजी विद्यापीठाचा संघ आता १९ डिसेंबरला अलाहाबादला खेळेल. कुस्ती, कबड्डी, नेमबाजी या खेळात अंतरविद्यापीठीय सामन्यात आतापर्यंत शिवाजी विद्यापीठाचे संघ चमकले आहेत. (अनेक वेळा अंतिम फेरी गाठणारा कबड्डीचा दर्जा मात्र गेल्या दोन तीन वर्षात पार घसरला. यंदा तर पहिल्याच सामन्यात प्रचंड गुणसंख्येने पराभव त्यांच्या पदरी आला.) यश मिळवणे सोपे असते पण ती परंपरा जोपासणे फार कठीण. नेमबाजीच्या संघाला ही कठीण जबाबदारी पार पाडायची आहे. शिवाजीचे मावळे हे आव्हान यशस्वीपणे स्वीकारतील का हे समजेलच.

□ □ □

शरद गोखले

राज्य नाट्य महोत्सव

# केंद्र पुणे

लेखांक दोन

## आपण क्लबात भेटलो होतो

परकीय कल्पनेवर आधारलेलं हे नाटक आराधना नाट्यसंघ या संस्थेने सादर केले. कलाकार तसे नवीन. नाटकही अगदीच सुमार. त्यामुळे प्रयोग रंगू शकला नाही. लेखन आणि प्रयोग या दोन्ही दृष्टिने पहिल्या अंकाची बैठक छान जमली होती. त्यानंतर मात्र नाटक एकदम कोसळले. त्यात पुन्हा पाठांतराची बोंब असल्याने कलाकारांचे कान पडद्यामागे लागलेले. मग प्रयोगाची काय अवस्था होणार ? शेठ धरमदास हा महत्त्वाकांक्षी, हुशार, परंतु मानसिक विकृती असलेला गृहस्थ. आपल्या कंपनीतील पैठणकर नावाच्या गृहस्थाला एका 'बोगस' प्रकरणात गुंतवून दुसऱ्या कंपनीमध्ये हेरगिरी करण्यासाठी पाठवतो. पहिल्या अंकाच्या शेवटी या शेटजींचा खून होतो. आपला मुलगाच आपला खून करायला येतो आहे अशी शेटजींची खात्री असल्याने आपल्या हुशारीचा पुरावा म्हणून मुलाच्या मनातील हेतू आपण ओळखला आहे हे दर्शवणारे स्वतःचे भाषण रेकॉर्ड करून ठेवतात. आपला मुलगा ते आपोआप ऐकेल, आणि मग आपली हुशारी, श्रेष्ठत्व सिद्ध होईल, अशी त्यांची अपेक्षा असते. याला मनोविकृती म्हणायचे नाही तर काय ?— शेठजी स्वतःला समजतात तितके हुशार नसतात. कारण त्यांना अपेक्षित नसलेल्या व्यक्तीकडून त्यांचा खून होतो. दुसरा व तिसरा अंक हे रटाळ चर्चेने भरले आहेत. खुनासंबंधीच्या चर्चेला खुनी सापडण्याचे दृष्टिने जी गती – जे टोक असायला पाहिजे ते नसल्याने त्याच त्याच मुद्यांभोवती पात्रे बोलत रहातात आणि एकमेकांवर प्रश्नांची सरबत्ती करत राहतात.

अराधना नाट्य-संघाने निर्मितीची बाजू चांगली संभाळली होती. रंगमंचाचे दोन भाग करून एकावेळी अर्ध्याच रंगमंचाचा वापर करण्याची कल्पना नाट्य-

विषयाच्या दृष्टीने सोईस्कर वाटली. विशेषतः, पात्रांच्या हालचालींना फारसा वाव न दिल्याने या प्रकाशयोजनेमुळे उपलब्ध होणारा रंगमंचाच्या भागाचा उपयोग व्यवस्थित करून घेतलेला दिसला. तिसऱ्या अंकातील टेप ऐकवण्याच्या वेळची फ्लॅश-बॅकची कल्पना चांगली वाटली. प्रकाशयोजनाही त्या दृष्टीने केलेली दिसली. नाटकाचा विषय रहस्यप्रधान असल्याने त्या पद्धतीच्या पाश्चात्य चित्रपटांना आढळते तसे पार्श्वसंगीत दिलेले दिसले. एकंदर वातावरणाशी ते अनुरूप वाटले.

मंगेश तेंडूलकर, रोहिणी ओक या दोन कलावंताच्या अभिनय-कौशल्याचे दर्शन या नाटकात झाले. तेंडूलकर लक्षात राहिले ते त्यांच्या संवाद-फेकीच्या तंत्रामुळे. रोहिणी ओकने आपली भूमिका समजून केली. पात्रांना कित्येक वेळा रंगमंचावर संवादाखेरीज वावरावे लागते. अशा वेळी आपल्या अस्तित्वाची जाणीव प्रसंगाच्या संदर्भात योग्य अशा चेहऱ्यावरील भावदर्शनाने अथवा योग्य जागी अन्य पात्रांना प्रतिसाद देऊन करून द्यावी लागते. रोहिणी ओक यांची ही अलका दुसऱ्या अंकात बाजूच्या जिन्यावर कितीतरी वेळ नुसती बसून राहते. या वेळी रोहिणी ओक यांनी दाखवलेले चेहऱ्यावरील भावदर्शन दीर्घकाळ लक्षात राहील.

## दुरितांचे तिमिर जावो

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने श्री. बाळ कोल्हटकर यांच्या 'दुरितांचे तिमिर जावो' या नाटकाचा प्रयोग सादर केला. व्यावसायिक रंगभूमीवरील कलाकारांची सही सही नक्कल करण्याचा प्रयत्न कलावंत करत होते. मधू जोशी यांचे दिग्दर्शनही व्यावसायिक प्रयोगावरून बेतले होते. स्वाभाविकपणेच प्रयोगाची तुलनाही त्या दृष्टीने केली गेली. प्रयोगाच्या प्रारंभी असलेले 'डमडम बाजे' हे गीत अनावश्यक वाटले. दिगूची गाणी बरी झाली. रंगतीच्या दृष्टीने तिसरा अंक सरस झाला. शांताराम दीक्षित, शरद करमरकर आणि सुधाकर कळमकर या कलावंतांची कामे त्यातल्या त्यात सरस झाली. पोस्टमनची छोटी भूमिका विष्णू अत्रे यांनी चांगली केली. विद्याधर नाएगांवकर व सुलभा कानिटकर हे दोन्ही कलावंत फारच कमी पडले. संघाचा समतोल बिघडला की प्रयोग घसरतो. तसेच येथेही झाले. पहिल्या कलाकाराचे बोलणे पुरे होण्यापूर्वीच दुसऱ्या पात्राने बोलणे, रंगभूमीवरील प्रवेशाची अचूक वेळ चुकणे यांसारखे दोषही आढळले.

हौशी कलाकार संघ या संस्थेने रमाकांत नंदर्गीकर यांनी लिहिलेल्या 'जावयाला जेव्हा जाग येते' हे नाटक स्पर्धेत उतरवले. स्पर्धेच्या दृष्टीने गंभीरपणे विचार करणे शक्य नसले तरी संस्थेने एक मनोरंजक, नीटस प्रयोग दिला हे मान्य करावे लागेल.

चित्रपटामध्ये फ्रीझ फ्रेम पद्धतीचे जे तंत्र आढळते, त्या पद्धतीने सुरुवात करण्याची कल्पना चांगली वाटली.

पहिल्या अंकातील जावयाचे परावलंबित्व वाजवीपेक्षा जास्त दाखवले गेले. लिखाणाच्या दृष्टीने नाटक कौतुक करण्याइतके चांगले बसले, तरी हौशी कलाकार संघाने सादर केलेला प्रयोग पुष्कळच नीटस होता. या यशाचे मोठे श्रेय जावयाची भूमिका करणारे विनायक गोडबोले यांना द्यावे लागेल. पहिल्या अंकातील त्यांचे काम फारच चांगले झाले. त्यांचा अशोक थोडा जास्त कृत्रिम वाटला. वासंती फडणीस यांची. माधवी चांगली वाटली. प्रेक्षकांशी बोलायची सवय सोडल्यास रघुनाथ खानवलीकर यांनी उभा केलेला भिकू ठीक वाटला. तात्याची भूमिका करणारे सदाशिव बोडस 'आपण नाटकात काम करत आहोत' ही जाणीव सतत ठेवून आणि प्रेक्षकांना त्याची प्रचीती देऊन काम करत होते. निर्मितीची बाजू चांगली सांभाळली होती. नेपथ्य नाटकाची गरज पूर्ण करणारे होते. वाघ, कोल्हा, शेळी, यांच्या चित्रांचा प्रतीकात्मक उपयोग करण्याची कल्पना हास्यास्पद वाटली.

## जीव झाला मोकळा

सरस्वती नाट्यसंघाजवळ बऱ्यापैकी कलाकार आहेत. गेल्या वर्षी या संघाने पुणे केंद्रात प्रथम पारितोषिक संपादन केले होते. यंदा संघाचे दिग्दर्शक वसंत लोणकर यांना स्वतःचे नाटक घेण्याची इच्छा झाली आणि चुकीच्या दृष्टीने पहिले पाऊल पडले. 'जीव झाला मोकळा' या त्यांच्या नाटकामागील वैचारिक बैठक चांगली असली तरी रंगभूमीवर त्यांनी जे दाखविले, त्यामधून त्यांना जे अपेक्षित होते ते प्रेक्षकांपर्यंत पोचू शकले नाही. पहिला अंक तर अतिशय तुटक वाटला. जुगाराच्या अड्ड्याचे दृष्य चांगले उभे केले. कलाकारांनी कामेही बरी केली, परंतु कथाविषयाशी त्याचा संदर्भ लौकर लागेना. त्यामुळे अपेक्षेइतके यश अंकाला आले नाही. दुसऱ्या अंकात काही चांगली कॉंपोझिशन्स पाहावयास मिळाली.


**पांढऱ्या डागांवर मोफत इलाज**

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

तिसऱ्या अंकाच्या अखेरीस न्यायाधीशाच्या आत्महत्येनंतर जो परिणाम व्हायला पाहिजे होता तो मुळीच झाला नाही. न्यायाधीश सर्वसाधारणपणे आपल्या आप्तेष्टांवरील खटल्याचे कामकाज चालवीत नाहीत. एखादा खटला नजरचुकीने पुढे आला, तरी कोर्ट स्वत: विनंती करून खटला दुसऱ्या कोर्टासमोर चालवण्याची विनंती करते. अशी या खात्याची सर्वसाधारण प्रथा आहे. मग या नाटकातील कर्तव्यदक्ष न्यायमूर्ती स्वत:च्या एकुलत्या एक मुलावरील खटला चालवतात, हे कसे ? जुगारीच्या अड्ड्यात दारूबरोबर सफरचंदे खाताना दाखवले आहे. हे पाहण्यात, ऐकण्यात अथवा अनुभवात नाही. एक सामान्य नागरिक स्वत:च्या घरातील समस्येवर मार्गदर्शनासाठी अपरिचित न्यायाधीशाकडे जातो हे पटत नाही.

नाटकाच्या निर्मितीची बाजू ठीक होती. पहिल्या अंकातील तुरुंगदृष्यानंतर निर्मितीबाबतचे आधुनिक तंत्र वापरले जाईल, अशी अपेक्षा होती. परंतु दुसऱ्या अंकात चक्क न्यायमूर्तींच्या घराचा झकास सेट लावलेला दिसला. ही तफावत निश्चितपणे खटकली.

कलाकारांपैकी नरेंद्र डोंगरे (प्रताप) फारच कृत्रिम बोलत होते. विनायक गोडसे सालोमनच्या भूमिकेला योग्य वाटले. पी. डी. ए. च्या रंगभूमीवर काही काळ वावरलेल्या सहस्रबुद्धे कुटुंबियांपैकी सुहास सहस्रबुद्धे (अंजू) चांगले काम करून गेल्या. न्यायमूर्ती रावसाहेब कामत यांच्या व्यक्तिरेखेला न्याय देण्याचा प्रयत्न श्री. पुरुषोत्तम सहस्रबुद्धे यांनी केला. दिग्दर्शक वसंत लोणकर यांनी प्रयोगावर मेहनत घेतल्याचे जाणवले.

आपण स्पर्धेमध्ये नाटक करत आहोत, याची जाणीव ठेवून, प्रामाणिकपणे प्रयत्न केलेल्या नाट्यसंस्थांच्या प्रयोगांची दखल विस्ताराने घेतली. या सात प्रयोगांखेरीज जे सहा प्रयोग झाले, ते 'आम्हीसुद्धा पळालो' या थाटाचे होते. संपदा थिएटर्सचे 'गारंबीचा बापू' सर्व दृष्टीने उपेक्षणीय झाले.

संस्कृत विद्या मंदिरचे 'बेबंदशाही' आणि औद्योगिक ललित कला मंडळाचे 'भाग्यवान' या दोन प्रयोगांमध्ये हौस, उत्साह दिसून आला. भाग्यवानमधील केशव घुळे यांचा संभा चांगला वाटला, तर 'बेबंदशाही'मध्ये अं. शि. सूर्यवंशी (खाशावा), प्र. बा. गोडसे (कब्जी) हे कलावंत त्या टीमच्या संदर्भात उजवे वाटले. सातारा येथील अभिनव कला मंदिर या संस्थेचे 'तुझे आहे तुजपाशी' अगदी बेताचे झाले. काकाजींचे काम करणाऱ्या डॉ. बाळासाहेब माजगावकर यांना फिगर चांगली होती. पण संवाद-फेकीचे तंत्र अवगत नव्हते. ते प्रेक्षकांशी का बोलत होते ते समजू शकले नाही. या संघाच्या संदर्भात पी. अनंत (वासुअण्णा) व विजयकुमार निकम (सतीश) हे कलावंत ठीक वाटले. शांता देवधर (उषा) व सुनंदा साठे (गीता) ह्या दोन्ही स्त्री कलावंत अगदीच सामान्य होत्या.

## सोलापूरचे प्रयोग


नाटक कसे करू नये, याचे प्रात्यक्षिक सोलापूरच्या नटसंघांनी दाखवले. ' नवरे चालत येतात ' आणि ' हे वेड पामरांचे ' ही दोन नाटके सोलापूरच्या मंडळींनी रंगभूमीवर आणली. पाठांतराची बोंब, चुकीच्या शब्दांवर भर देऊन बोलण्याची पद्धत, निवडलेल्या नाटकांचा सुमार दर्जा, यामुळे हे प्रयोग कंटाळवाणे झाले. प्रयोगांचा दर्जा पाहून स्पर्धेमध्ये ही मंडळी आली नसती तर बरे झाले असते असे वाटले.

## कलावंत

स्पर्धेमध्ये झालेल्या नाटकांमध्ये जे पाच उत्कृष्ट पुरुष व स्त्री कलावंत आढळले त्यांचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. उत्कृष्ट पुरुष कलावंत :–(१) जब्बार पटेल–अशी पाखरे येती–अरुण सरनाईक, (२) मोहन आगाशे–अशी पाखरे येती–अण्णा, (३) विनायक गोडबोले–जावयाला जेव्हा जाग येते–रत्नाकर अशोक. (४) शाम पटवर्धन–निखारे–एक ज्यूरी. (५) राजाभाऊ फडणीस–हिरा जो भंगला नाही–गणाचार्य. उत्कृष्ट स्त्री कलावंत :–(१) कल्पना भालेराव–अशी होती–अलका. (२) रोहिणी ओक–आपण कलबात भेटलो, (३) पद्मजा केतकर–हिरा जो भंगला नाही–नंदिनी. (४) सौ. सरोजिनी उमराणीकर–हिरा जो भंगला नाही–राणी दुर्गादेवी. (५) मीना पुराणिक–अशी पाखरे येती–आई.

## ' मनोरंजन 'चे सहकार्य

हौशी व व्यावसायिक मंडळींना रंगमंच, प्रसिद्धी, या बाबतीत सर्वतोपरी साहाय्य करणारी ' मनोरंजन ' ही संस्था. मनोहरपंत कुलकर्णी, डॅडी लोणकर आणि राईरकर या त्रिमूर्ती संस्थेचा आधारस्तंभ. जवळजवळ सहा नाटकांच्या नेपथ्याची आणि स्पर्धेच्या संपूर्ण तिकीटविक्रीची व्यवस्था ' मनोरंजन 'ने व्यवस्थितपणे सांभाळून स्पर्धा यशस्वी करण्यात मोठे सहकार्य दिले. व्यावसायिक आणि हौशी मंडळी ' मनोरंजन 'चे महत्त्व जाणून आहेतच; पण नाट्य रसिकांनाही त्यांच्या कार्याची माहिती व्हावी म्हणून मुद्दाम ' मनोरंजन 'चा उल्लेख केला.



**पंडित वि. म. जोशी**
**ज्योतिष विशारद**

# अंदाज

## १२ ते १८ डिसेंबर १९७०

**मेष :** सप्ताहाच्या सुरुवातीलाच गुरू पालट होतो आहे. तो भाग्येश अष्टमात व त्याचे जवळ पंचमेश रवी आहे. हट्टीपणामुळे सरकारी कामात अपयश येईल. घरात काही शुभसमारंभ होण्याचा योग आहे. राग अनावर होईल. स्त्रियांच्या आधीन व्हावे लागेल. त्याकरता शंकराचे दर्शन घ्यावे.

विद्याभ्यासात यश येईल. संततीची प्रगती होईल. साहित्यिक, लेखक, प्रकाशक यांना चांगला काळ आहे. जमिनींचे व घरांचे व्यवहार करणारांना फार फायदा होईल. फॅन्सी वस्तूंच्या व्यापारात अमाप पैसा मिळेल.

चंद्राचे भ्रमण २।३।४।५ या स्थानांतून आहे, ते चांगले आहे. बुधवारी अचानक धनलाभ होईल. शुभ तारखा १५।१६।१७.

**वृषभ :** शनिवारी सरकारकडे गुंतलेल्या रकमेची वसुली होईल. धनस्थिती चांगलीच राहील. हातून पराक्रम होईल. सार्वजनिक कामाकरता प्रवास होईल. मंगळ-शनी दृष्टियोग शत्रुनाश करील. मातुल घराण्याकडून अगर सासुरवाडी कडून अचानक सर्व बाजूंनी मदत होईल.

विद्याभ्यासात, विशेषतः मेडिकलच्या विद्यार्थ्यांना सर्व बाबतींत शुभ आहे. संततीकडून त्रास होईल. सार्वजनिक कामात यश मिळेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह ठरतील. मानसिक यातना होतील.

चंद्राचे भ्रमण १।२।३।४ या स्थानांतून आहे, ते चांगलेच आहे. शुक्रवार जरा अडचणीचा जाईल. अचानक धनलाभ होईल. शुभ तारखा १४।१५।१६।१७.

**मिथुन :** शरीरप्रकृती सुधारेल. शनिवारी पैशाची अडचण भासेल. प्रवासात त्रास होईल. बुधवारी अचानक धनलाभ होईल. घराचे व्यवहार ठरत असल्यास ते यशस्वी होतील. बौद्धिक व्यवसायातील लोकांना माघार घ्यावी लागेल. मित्रांकडून फसवणूक होईल.

विद्याभ्यासात मनाप्रमाणे घटना घडल्यामुळे दिवस आनंदात जातील. शुक्रवारी हा अनुभव येईल. संशोधकांना दिवस चांगले आहेत. संततीचा उत्कर्ष होईल. २७ ते ३२ वयातील व्यक्तींना जबरदस्त विवाहयोग आहे. चंद्राचे भ्रमण १२।१।२।३ या स्थानांतून आहे, ते चांगले आहे. ता. १८ ला प्रवास टाळावा. सरकारी कामे पुढे ढकलावी. शुभ तारखा १३ ते १७.

**कर्क :** सप्ताहाच्या सुरुवातीलाच पैशाची अडचण उभी राहील. भागीदारांकडूनच पतीला धक्का बसण्याचा योग आहे. बुधवारी हा योग जास्त जोरदार आहे. गुरूच्या शुभयोगामुळे व रवीमुळे सर्व संकटांतून मुक्तता होईल. वाचाशुद्धी कमी होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्ती होईल. शास्त्रीय संशोधकांना सरकारी अनुदान मिळेल. सरकारी अधिकाऱ्यांना परदेशगमनाचा योग येईल. मित्रमंडळींकडून सर्व प्रकारची मदत होईल.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१।२ या स्थानांतून आहे, ते चांगलेच आहे. फक्त शुक्रवारी पैशाची तीव्र अडचण भासेल. पंचमातील रवी-गुरू ती अडचण निवारण करतील. शुभ तारखा १३ ते १७.

**सिह :** सप्ताहाच्या सुरुवातीलाच घरात काहीतरी शुभसमारंभ घडून येईल. काही महत्त्वाच्या सार्वजनिक कामांकरता प्रवास घडेल. त्यात संपूर्ण यश येईल. भावंडांकडून सव बाबतींत मदत होईल. मित्रपरिवार मदतीला धावून येईल. मानसन्मान होण्याचा योग बुधवारी येईल.

विद्याभ्यासात भरघोस यश येईल. विशेषत: मेडिकल, इंजिनीअरिंग, शास्त्रीय संशोधकांना सर्व बाजूंनी मदत मिळेल. सरकारी अनुदान व इतर सर्व तऱ्हेची मदत मिळेल.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२।१ या घरांतून आहे. ते चांगले आहे. रवी-चंद्रांना ६।८।१२ स्थानीच दोष नसतो. बुधवार-गुरुवारी अचानक धनलाभ होईल. शुभ तारखा १३ ते १७.

**कन्या :** सोमवारी सार्वजनिक कामांत भाग घ्यावा लागेल. शरीरस्वास्थ्य चांगलेच राहील. मानमान्यता वाढेल. घरासंबंधी व्यवहार अत्यंत फायदेशीर होतील. अचानक धनलाभ घडेल. प्रवासयोग येईल. त्यात फायदाच होईल. भावंडांचे व मित्रांचे सर्व बाबतींत साहाय्य होईल. विद्याभ्यासात अपयश येईल. संततीकडून फारच त्रास होईल. त्यांनी केलेल्या घातुक कृत्यांतून त्यांना सोडवण्याकरता बराच पैसा व कष्ट पडतील.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११।१२ या घरांतून आहे. ते चांगले आहे. शनिवारी मित्रमंडळीसह एकाद्या सफरीला जावे लागेल. शुभ तारखा १३ ते १७.

**तूळ :** तूळ राशीचे वाईट दिवस गेले. गुरू-शनी दृष्टियोगाने सर्व कामे अपुरी राहत होती. घरात नेहमी कलह होत होता. पत्नीचे अगर भागीदारांचे मतभेद होत होते. या सर्व गोष्टी आता संपतील. प्रवासाची व पराक्रम दाखविण्याची संधी शनिवारपासूनच मिळेल.

विद्याभ्यासात अपयश येईल. मनाची द्विधा स्थिती होईल. स्त्रियांच्या प्रेमपाशात सापडण्याचा योग आहे. ता. १६ ला तीन केंद्रांचे अधिपती समोरासमोर व चवथ्या केंद्राचा अधिपती चंद्र केंद्रात येतो आहे. काहीतरी अनपेक्षित मोठी गोष्ट आयुष्यात घडेल.

चंद्राचे भ्रमण ८।९।१०।११ या स्थानांतून आहे, ते चांगले आहे. शुभ तारखा १४।१५।१६।१७.

वृश्चिक : शनिवारी घरात अचानक काही तरी भांडण होऊन पति-पत्नींपैकी कोणी एक रागाने निघून जाईल. २७ ते ३२ वयातील प्रेमविवाहित व्यक्तींना हा अनुभव येईल. सार्वजनिक काम करणाऱ्या व्यक्तींना हा योग आहे. इंडिकेटमध्ये तडे जाण्याचा योग आहे.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. साहित्यिक, लेखक, अध्यात्मवादी व्यक्तींना यश प्राप्त होईल. प्रेमिकांचे मतभेद होण्याचा योग आहे. त्यावर उपाय देवीचा जप करावा. भांडणाचे परिणाम वाईट होतील.

चंद्राचे भ्रमण ७।८।९।१० या स्थानांतून आहे, ते चांगले आहे. शुक्रवार मानसिक यातना होतील. शुभ तारखा १३।१४।१५।१६।१७.

धनू : रविवारपासून सर्वच आठवडा चांगला आहे. शरीरप्रकृती चांगली राहील. मानमान्यता वाढेल. गुरू सुखस्थानावर पाहतो. त्याची वृद्धी करील. शिवाय त्याच्या जवळ भाग्येश रवी आहे. सप्तमेश बुध लग्नी आहे. त्याला भाग्येश रवी मिळाल्यावर, व बुधवारी रवी धनेत गेल्यावर विवाहाची मागणी घर चालून येईल.

विद्याभ्यासात अपयश. संततीचा उत्कर्ष होईल. परदेशगमनाचा योग येईल.


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

**ब. मो. पुरंदरे**

**किमत : तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींना साहित्यिक, लेखक, प्रकाशक यांना पुढे जाण्याला योग्य संधी मिळेल.

चंद्राचे भ्रमण ६।७।८।९ या स्थानांतून आहे, ते फारच चांगले आहे. सर्व आठवडा यशस्वी आहे.

**मकर :** शरीरप्रकृती चांगली राहील. पैशाची ओढाताण होईल. स्वभावात व भाषेत उद्धटपणा येईल. प्रेमप्रकरणात प्रगती होईल. बुधवारी–गुरुवारी सर्व काही मनासारखे होईल. घरात मतभेद होतील.

विद्येत संपूर्ण यश मिळेल. संततीची मनात भरण्याजोगी प्रगती होईल. राजयोगकारक एकच एक ग्रह शुक्र दशमात चतुर्थेश मंगळाबरोबर आहे. तो सुखवृद्धी करील.

चंद्राचे भ्रमण ५।६।७।८ या स्थानांतून आहे. ते चांगलेच आहे. शुक्रवारी भागीदारांशी जरा मतभेद होण्याचा संभव आहे.

**कुंभ :** स्वभावात हट्टीपणा वाढेल. शुभ कार्याकरता प्रवासयोग येईल. शरीरप्रकृती चांगली राहील. पैशाची परिस्थिती समाधानकारक असेल. सरकारी कामात यशप्राप्ती होईल. भाग्योदयाला सुरुवात होईल. अडलेली सर्व कामे मार्गी लागतील.

विद्येत संपूर्ण यश येईल. साहित्यिक, लेखक, प्रकाशक, ज्योतिषी यांना प्रगतिपथावर नेणारे दिवस आहेत. एकच एक राजयोगकारक ग्रह भाग्यात मंगळाबरोबर आहे. हा योग मानमान्यता मिळवून देईल.

चंद्राचे भ्रमण ४।५।६।७ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. शुक्रवारी गृहकलहामुळे जरा मानसिक त्रास होईल. शुभ तारखा १२ ते १७.

**मीन :** धनस्थिती नाजुक राहील. येणारी रक्कम बुधवारपर्यंत येणार नाही. भाग्यातील गुरू–रवी सर्व अडचणी नाहीशा करतील. अष्टमातील शुक्र-मंगळ अचानक धनलाभ घडवून आणतील. आत्मघातकी विचार वाढतील.

विद्येत संपूर्ण यशप्राप्ती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. प्रवासाचा योग येईल व त्यात कायम स्वरूपाचा फायदा होईल. घराचे प्रश्न सुलभरीतीने सुटतील. पत्नीकडून सर्व प्रकारची मदत होईल. अनेक दिवसांच्या अडचणी हळूहळू नाहीशा होतील.

चंद्राचे भ्रमण ३।४।५।६ या स्थानांतून होणार आहे, ते चांगलेच आहे. शुक्रवारखेरीज सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

□ □ □

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649

रशियन राज्यक्रांतिविषयी प्रचारात्मक साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे